Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

* वर्ष ५४ * अंक २०३ * * नागपूर *

बुधवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२४

पुरवणीसह पाने ८

किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## शरियत कौन्सिल काही कोर्ट नाही

■ **वृत्तसंस्था, चेन्नई, दि. २८ :**
मद्रास उच्च न्यायालयाने सोमवारी तिहेरी तलाक प्रकरणाशी संबंधित दिवाणी पुनरावृत्ती याचिका फेटाळली. उच्च न्यायालयाने म्हटले, शरीयत कौन्सिल म्हणजे न्यायालय नाही. ही खासगी संस्था आहे.
न्यायमूर्ती जीआर स्वामीनाथन म्हणाले, ही कौन्सिल कौटुंबिक आणि आर्थिक समस्या दूर करण्यात मदत करू शकते, परंतु घटस्फोटाचे प्रमाणपत्र जारी करण्याचा आणि दंड आकारण्याचा अधिकार कौन्सिलला नाही. हे प्रकरण मुस्लिम जोडप्याच्या घटस्फोटाशी संबंधित आहे. २०१० मध्ये त्यांचे लग्न झाले, काही वर्षांनी पतीने पत्नीला तिहेरी तलाक दिला. शरिया कौन्सिलने या जोडप्याला घटस्फोटाचे प्रमाणपत्र जारी केले होते.

अग्राग्रलेख **खरीखरी...**

## पुतण्या विरुद्ध पुतण्या

अखिल भारताचे सर्वाधिक लोकसंग्रह असलेले नेते शरदचंद्र पवार यांच्याबरोबर त्यांच्याच सख्ख्या भावाच्या पुत्राने म्हणजे शरदराव यांच्या पुतण्याने उभा दावा मांडला होता. आता शरद पवार यांनी त्याच बंडखोर पुतण्याविरुद्ध त्यांच्याच पुतण्याला बारामतीतून उभे केले आहे. ज्या वयात शरदचंद्र पवार यांना, तत्कालीन महाराष्ट्राचे नेते यशवंतराव चव्हाण यांनी शेतकरी कामगार पक्षाचे घराणे असलेल्या पवार घराण्यातून आलेल्या शरद पवार यांना तिकीट दिले होते. त्यानंतर म्हणजेच 1967 नंतर शरद पवार यांनी महाराष्ट्रात अधिराज्य गाजविले आणि त्यानंतर अवघ्या पाच वर्षात वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात मंत्रिपदही मिळवले. त्यानंतर त्यांनी केवळ बारामतीचाच विकास केला नाही. तर महाराष्ट्राच्या सर्वांग, परिपूर्ण विकासासाठी कृषी ते व्यवसाय उपयोगी शिक्षण अशा विविधांगी विषयात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून मोलाची कामगिरी बजावली. महाराष्ट्रातील किंवा देशातील मोठमोठ्या उद्योगपतींबरोबर जसे त्यांचे स्नेहाचे संबंध आहेत. तसेच संबंध त्यांनी विविध विचारांच्या आणि इतर पक्षांच्या नेते आणि कार्यकर्त्यांच्या बरोबरही स्थापन केले. त्यामुळेच पुढील दशकात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली. अशा शरदचंद्र पवार साहेबांच्या नेतृत्वाला आव्हान दिल्यामुळे लोकसभेच्या निवडणुकीत पुतणे दादासाहेबांच्या घड्याळ्यात 10:10 ऐवजी चक्क कडकडीत बाराच वाजले. केवळ एकमात्र तटकरे स्वबळावर निवडून आले, हाच काय तो दिलासा. वय कितीही असले तरी मोठे पवारसाहेब आजही तितक्याच तडफदारपणे कार्यरत आहेत. याचा धसका घेऊन अजितरावांनी आपण सुद्धा विजीत राहू शकतो. असा विचार करून 40 च्या आसपास काकांचे शिलेदार सोबत घेऊन पाचव्यांदा उपमुख्यमंत्री बनले. एवढे सगळे करूनही त्यांच्या पदामागील 'उप' अजून काही जायला तयारच नाही. असे आपले उपमुख्यमंत्री दादा बारामतीच्या रणांगणात विजय मिळवण्यासाठी सज्ज झालेले आहेत. त्यांच्या विरुद्ध त्यांच्या सख्ख्या भावाचा मुलगा, म्हणजेच त्यांचा पुतण्या, म्हणजेच मोठ्या साहेबांचा नातू मोठ्या पवार साहेबांच्या पक्षाकडून उभा आहे. या पुतण्याचं नाव युगेंद्र आहे आजोबांचे नाव शरदचंद्र असल्याने त्यांच्या नावात चंद्र आहे. तर युगेंद्र यांच्या नावात इंद्र आहे. आता हे इंद्र आणि चंद्र मिळून दादा नामक ग्रहाला ग्रहण लावण्यासाठी सज्ज झालेले आहेत. असे म्हणतात की, युगेंद्रला आपल्या विरुद्ध उभे करू नये. म्हणून युगेंद्रच्या सख्ख्या आज्जीने सांगितले होते. असे त्याच्या सख्या काकांचे म्हणजेच आपल्या दादांचे म्हणणे आहे. पण तिकडे अजितरावांचे सख्खे भाऊ श्रीनिवास पवार यांनी आपल्या आईबाबत जे वक्तव्य दादांनी केले आहे. ते धादांत खोटे आहे, असा खुलासा केला आहे. अशा एकूण परिस्थितीत परवा अजितदादांनी बारामतीत सभा घेऊन भाऊबंदकीवर टीका केलेली आहे. आपण चूक केली. हे मान्य करून निदान मोठ्या साहेबांनी ही चूक करू नये. असे आवाहन त्यांनी केले आहे. मात्र बारामती जवळच्या कऱ्हा आणि निरा या दोन्ही नद्यांमधून, यादरम्यान कितीतरी पाणी वाहून गेलेले आहे. त्यामुळे आता कितीही भावनात्मक होण्याच्या गुगल्या टाकल्या. तरी जुन्या चुकल्यांना आणि चुकल्यांना क्षमा नाही. हेच आता बड्या साहेबांनी न बोलता प्रत्यक्ष कृती करून ठासून सांगून टाकले आहे. त्यातच आज सुप्रिया सुळे म्हणाल्या की, पहिली निवडणूक मी वडिलांच्या आशीवार्दाने जिंकले. त्याचप्रमाणे युगेंद्रही त्यांची पहिली निवडणूक आजोबांच्या आशीर्वादाने जिंकण्यासाठी सज्ज आहेत. आयुष्यभर घरातील राजकारणाचा अनुभव घेतलेल्या युगेंद्रांना राजकारण कसे करावे. मतदारांना कसे सांभाळावे, याची उपजतच जाण आहे. अर्थात असे त्यांच्या वक्तृत्व आणि वक्तव्यावरून वाटते. असे हे युगेंद्र आता एखाद्या कसलेल्या राजकारण्याप्रमाणे आपल्या प्रेमळ काकांविरुद्ध अतिशय हळुवारपणे भाषण करत करत उभे ठाकलेले आहेत. किंबहुना, युगेंद्र यांच्या आवरणाखाली खुद्द मोठे पवार साहेबच निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले दिसतात. म्हणजे मधले पवार विरुद्ध छोटे पवार व्हाया मोठे पवार अशी ही पवारांच्या बारामतीची निवडणूक आहे.

इति लेखन सीमा !

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## सिंचन घोटाळ्यातील चौकशीवरून दादांची आगपाखड

# आबांनी केसाने गळा कापला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.२९ :**
उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा एकदा धक्कादायक गौप्यस्फोट केला आहे. भाजपने आरोप केलेल्या सिंचन घोटाळ्याच्या चौकशीचे खापर त्यांनी तत्कालीन गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्यावर फोडले आहे.
त्यावेळी माझ्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले. आणि चौकशी करण्यासाठी फाईल तयार करण्यात आली. त्या फाईलवर आर. आर. आबांनी सही केली असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर हा केसाने गळा कापण्यासारखा प्रकार असल्याचेही ते म्हणाले. तासगावमध्ये आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते.
अजित पवार म्हणाले की, माझ्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले. मला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. मात्र त्या फाईलवर आर. आर. पाटलांनी सही केली होती. इतक्या वर्षात केवळ ४२ हजार कोटी रुपयांची कामे झाली होती. तरी माझ्यावर ७० हजार कोटींचा आरोप झाला. मात्र आकडा जेवढा मोठा आकडा, तितके लोक गंभीरतेने घेतात. म्हणून आकडा मोठा केल्ल्याचे अजित पवार म्हणाले.
या आरोपांमुळे माझ्या चौकशीची फाईल तयार झाली. ती फाईल सही करण्यासाठी गृह विभागाकडे गेली. त्यावर आर. आर. पाटील यांनी सही देखील केली. त्या नंतर ही फाईल मुख्यमंत्र्यांकडे गेली. मात्र, पृथ्वीराज चव्हाण यांनी त्यावर सही केली नाही. त्याच वेळी आम्ही सरकारचा पाठिंबा काढला आणि सरकार पडून राष्ट्रपती राजवट लागू झाली. त्यानंतरच्या निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांचे सरकार आले. देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर सही केली आणि मला बोलवून आर. आर. पाटील यांनी सही केल्याचे दाखवले, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे.



### आबा हयात असते तर...

अजित पवारांच्या या विधानावर आर. आर. पाटील सुपुत्र रोहित पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवारांनी आबांवर केलेली टीका आमच्यासाठी दुःख आहे. आबांना जाऊन ९ वर्षे झालेले आहेत. ते आज हयात असते तर त्यांनी अजित पवारांना चांगल्या भाषेत उत्तर दिले असते, असे रोहित पाटील म्हणाले. त्यांनी अशापद्धतीने टीका करणे आमच्यासाठी दुःखद आहे. एखादा घोटाळा आपण केला नसेल तर घाबरण्याचे कारण नाही, अशी पुश्तीही त्यांनी जोडली.



## ७०+ वृद्ध लोक आजपासून आयुष्मान योजनेच्या कक्षेत




■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :**
आता ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सर्व लोकांना आयुष्मान भारत योजनेचा लाभ मिळणार आहे. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी आज त्याची सुरुवात करणार आहेत. या योजनेंतर्गत दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार दिले जाऊ शकतात.
या योजनेत मोफत उपचारासाठी कोणत्याही अटी असणार नाहीत. उत्पन्न, पेन्शन, बँक बॅलन्स, जमीन किंवा जुनाट आजार या आधारावर कोणत्याही वृद्ध व्यक्तीला या योजनेच्या कक्षेतून वगळले जाणार नाही. देशातील ७० वर्षांवरील सुमारे ६ कोटी लोकांना याचा फायदा होणार आहे.
सध्या ३५ कोटींहून अधिक लोक आयुष्मान योजनेचा लाभ घेत आहेत. या घोषणेनंतर त्यांची संख्या ४० कोटींच्या आसपास पोहोचेल. म्हणजे हे लोक खाजगी रुग्णालयात जाऊन ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार घेऊ शकतात. त्यांच्या उपचाराचा खर्च सरकार करते. या योजनेत जुनाट आजारांचाही समावेश आहे.
कोणत्याही आजारासाठी रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी आणि नंतरचा खर्च कव्हर केला जातो. याशिवाय सर्व वैद्यकीय चाचण्या, ऑपरेशन्स आणि औषधांचा खर्चही त्यात समाविष्ट आहे. केंद्राने २०१७ मध्ये ही योजना सुरू केली आयुष्मान भारत ही जगातील सर्वात मोठी विमा योजना आहे, जी देशातील सर्वात गरीब ४० टक्के लोकांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार प्रदान करते.

## एकनाथ शिंदेंच्या संपत्तीत पाच वर्षांत तिप्पट वाढ

### १३ कोटींवरून थेट ३७ कोटी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि.२९ :**
उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माघारी घेण्याची पहिली प्रक्रिया पार पडत असून उमेदवारी अर्जासोबत उमेदवारांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून त्यांच्यानावे असणारी संपत्ती उघड होत आहे.



राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यासोबतच्या प्रतिज्ञापत्रातून त्यांची संपत्ती समोर आली आहे. त्यांच्यासमोर उभ्या असलेल्या केदार दिघे यांच्यापेक्षा एकनाथ शिंदेंची संपत्ती तब्बल १६ कोटींनी जास्त आहे!
एकनाथ शिंदेंनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार त्यांच्या संपत्तीत २०१९ च्या तुलनेत तब्बल तिप्पट वाढ झाली आहे. २०१९ च्या निवडणुकीवेळी एकनाथ शिंदेंनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांची संपत्ती १३ कोटी ६६ लाख ७४ हजार ९३२ इतक्या मूल्याची होती. सोमवारी त्यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात हा आकडा थेट ३७ कोटी ६८ लाख ५८ हजार १५० इतका वाढला आहे. एकनाथ शिंदेंच्या नावे असणाऱ्या ३७ कोटींहून अधिकच्या संपत्तीमध्ये ९ कोटी २१ लाख ७८ हजार १५० रुपये मूल्य असणारी जंगम मालमत्ता तर २८ कोटी ४६ लाख ८० हजार रुपए मूल्य असणारी स्थावर मालमत्ता आहे.
शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात आनंद दिघे यांचे पुतणे केदार दिघे यांना उमेदवारी दिली आहे. केदार दिघें यांच्यानावे एकूण संपत्ती १ कोटी २० लाख ५६ हजार २५५ रुपये मूल्याची आहे. त्यात ६५ लाख ५६ हजार २५५ रुपये मूल्याचं जंगम मालमत्ता आहे. केदार दिखे वाणिज्य शाखेचे पदवीधर आहेत.

## अजित पवारांनी बिनकामी माझे सरकार पाडले...

### पृथ्वीराज चव्हाण यांचा खुलासा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि.२९ :**
सिंचन घोटाळा अजित पवारांची पाठ सोडत नाही, अशी मिश्किल टिप्पणी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. माझ्या कार्यकाळात कधीही ७० हजार कोटींचा घोटाळा झाला नाही.
माझ्या कार्यकाळात सिंचन खात्याला सिंचनाची श्वेतपत्रिका काढण्याचा आदेश देताना ७० हजार कोटींचा घोटाळा शब्द वापरला नव्हता, अजित पवारांनी माझे सरकार पाडले, असा दावाही पृथ्वीराज चव्हाण यांनी केला.
पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, सिंचन घोटाळा अजित पवारांची पाठ सोडत नाही. मी सिंचनाची श्वेतपत्रिका काढण्याचा आदेश सिंचन खात्याला दिला होता, तेव्हा मी माझ्या कार्यकाळात कधीही ७० हजार कोटीचा घोटाळा शब्द वापरला नव्हता. ती फाईल माझ्याकडे आली नाही. त्या फाईलवर माझी कुठलीही सही नाही. त्यामुळे सिंचन घोटाळा प्रकरणात मी चौकशी लावली नव्हती. नाहक माझा बळी घेतला. अजित पवारांनी २०१४ ला माझे सरकार पाडले आणि भाजपच्या राजवटीची मुहूर्तमेढ केली, असे त्यांनी सांगितले.



### शरद पवारांकडून आणखी
## पाच नावांची घोषणा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.२९ :**
आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून उमेदवारांची पाचवी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत पाच जणांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.
यामध्ये माढा मतदारसंघातून अभिजीत पाटील, मुलुंडमधून संगीता वाजे, मोर्शीमधून गिरीश कराळे, पंढरपूरमधून अनिल सावंत, मोहोळमधून राजू खरे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

### भाजपचे आणखी २ उमेदवार जाहीर

राज्यातील सत्ताधारी भाजपने राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी आणखी २ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली आहे. त्यात त्यांनी मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातून माजी आमदार नरेंद्र मेहता यांना उमेदवारी दिली असून, उमरेड राखीव मतदारसंघातून सुधीर पारवे यांना संधी दिली आहे.
भाजपने मंगळवारी सकाळी आणखी २ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. यापूर्वी भाजपाने सुमारे दीडशे उमेदवारांची घोषणा केली आहे.

## भरधाव कंटेनरची धडक, तीन मजूर ठार

■ **महासागर प्रतिनिधी बुलढाणा, दि.२९ :**
राष्ट्रीय महामार्ग ६ वर नांदुरा ते मलकापूरदरम्यान वडी फाट्यावर झालेल्या भीषण अपघातात तीन मजूर ठार, तर चार मजूर गंभीर जखमी झाले. इतर नऊ ते दहा मजूर किरकोळ जखमी झाले आहेत.
सर्व जखमींना बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालय येथे उपचारासाठी हलवण्यात आले आहे. जखमींपैकी चौघांची प्रकृती अत्यावस्थ असल्याने अपघातबळींची संख्या वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.
घटनेतील सर्व मृत आणि जखमी मजूर नांदुरा तालुक्यातील वडी या गावाचे रहिवासी आहेत. जिल्ह्यात ठिकठिकाणी सुरू असलेल्या बांधकामावर मजुरी करून ते आपला आणि परिवाराचा उदरनिर्वाह करतात. आजही गावातील पंधरा मजूर नेहमीप्रमाणे कामावर निघाले तेंव्हा त्यांना आपल्यासमोर नियतीने काय मांडून ठेवले, याची कल्पनाही नव्हती.
आज सकाळी पंधरा मजूर घेऊन एक ट्रॅक्टर राष्ट्रीय महामार्ग ओलांडत होता. यावेळी भरवेगात येणाऱ्या कंटेनरने ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. यात दोघा मजुरांचा जागीच तर अन्य मजुराचा उपचारासाठी नेताना मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. नांदुरा आणि अन्य पोलीस ठाण्याचे अधिकारी देखील दाखल झाले.
घटनेची माहिती मिळताच ओम साई फाउंडेशनच्या रुग्णवाहिकेसह स्वयंसेवक व नांदुरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार विलास पाटील, नांदुरा तहसीलदार मुकुंदे सर्व यांची चमू घटनास्थळी मदत करण्यासाठी दाखल झाली. यावेळी संतप्त गावकऱ्यांनी राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको सुरू केले.



## या वयातही इतके खोटे...

### फडणवीसांचे शरद पवारांना प्रत्युत्तर

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि.२९ :**
दिवंगत उद्योगपती रतन टाटा महाराष्ट्रात उद्योग आणणार होते. पण भाजप आणि राज्य सरकारने हे उद्योग गुजरातमध्ये नेले, असा आरोप शरद पवार यांनी आज बारामती येथे केला होता. शरद पवार यांच्या आरोपाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावरुन प्रत्युत्तर दिले आहे.



या वयात इतके खोटे बोलायचे नसते, ज्यांच्या काळात गुंतवणूक आणण्यात कधी गुजरात तर कधी कर्नाटक नंबर 1 वर होते, ते आज महाराष्ट्र क्रमांक 1 वर आल्यावर जरा अधिकच अस्वस्थ झालेत, असा टोला फडणवीसांनी लगावला आहे. टाटा एअरबस, फॉक्सकॉन असो, किंवा अन्य प्रकल्प सातत्याने खोटे बोलून मविआच्या नेत्यांनी दिशाभूल केली, असेही फडणवीस म्हणाले.

## ७ भारतीय मच्छीमारांचा पाकिस्तानच्या तुरुंगात मृत्यू

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :**
गेल्या वर्षी मे महिन्यापासून पाकिस्तानच्या तुरुंगात सात भारतीय मच्छीमारांचा मृत्यू झाला असून तीन दिवसांपूर्वी मृत्यूची ताजी घटना समोर आली आहे. पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या एकूण भारतीय मच्छीमारांची संख्या 209 आहे.
यापैकी 181 मच्छीमारांनी सहा महिन्यांचा शिक्षेचा कालावधी पूर्ण केला आहे आणि त्यांच्या राष्ट्रीयत्वाची भारताने पुष्टी केली. अशा कैद्यांना भारतात परत येण्याची प्रतीक्षा आहे. परंतु काही 2021 पासून पाकिस्तानच्या ताब्यात आहेत, असे त्यांनी सांगितले.

## धनत्रयोदशीला सोन्याचा आतापर्यंतचा उच्चांक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि.२९ :**
आज धनत्रयोदशीच्या दिवशी सोन्याने आतापर्यंतचा उच्चांक गाठला आहे. इंडिया बुलियन अँड ज्वेलर्स असोसिएशन च्या आकडेवारीनुसार, २४ कॅरेट सोन्याचा १० ग्रॅमचा भाव ६०१ रुपयांनी वाढून ७८,८४६ रुपयांवर पोहोचला आहे. यापूर्वी सोन्याचा भाव ७८,२४५ रुपये प्रति १० ग्रॅम होता.
त्याचवेळी चांदीचा भावही ११५२ रुपयांनी वाढून ९७,२३८ रुपये प्रति किलोवर पोहोचला. यापूर्वी चांदीचा भाव ९६०८६ रुपये होता. त्याच वेळी, या महिन्यात २३ ऑक्टोबर रोजी चांदीने ९९,१५१ रुपयांचा सार्वकालिक उच्चांक गाठला होता.



प्रती १० ग्रॅम ७८८४६ रूपये

एचडीएफसी सिक्युरिटीजचे कमोडिटी आणि करन्सी हेड अनुज गुप्ता यांच्या मते, भू-राजकीय तणाव आणि सणासुदीच्या सुरुवातीमुळे सोन्याला आधार मिळत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत सोन्या-चांदीत वाढ होण्याची शक्यता आहे. या वर्षाअखेरीस सोन्याचा दर ७९ हजार रुपये प्रति १० ग्रॅमचा टप्पा पार करू शकतो. त्याचबरोबर पुढील धनत्रयोदशीपर्यंत सोने ८७ हजार रुपये प्रति १० ग्रॅमपर्यंत जाऊ शकते.
आज २९ ऑक्टोबर रोजी दिल्लीत १० ग्रॅम २२ कॅरेट सोन्याची किंमत ७३,९०० रुपये आणि १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याची किंमत ८०,६०० रुपये होती. मुंबईत १० ग्रॅम २२ कॅरेट सोन्याची किंमत ७३७५० रुपये आणि १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याची किंमत ८०,४५० रुपये तर कोलकाता येथे २४ कॅरेट सोन्याच्या १० ग्रॅमची किंमत ८०,४५० रुपये नोंदविली गेली.



# आजोबा जिवंत आहेत की गावाला गेलेत?

## निवडणूक आयोगाची जागोजागी शोध मोहीम सुरू

ठाणे, दि. २९: प्रतिनिधी

नौपाडा भागातील इमारतीपाशी अंगणवाडी सेविकेने इमारतीतून बाहेर पडणाऱ्या व्यक्तीला गाठून विचारले की, मधुकर तापस याच इमारतीत राहतात का? विश्वासराव जाधव ते येथेत राहतात ना? वयाची ८५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांनी घरून मतदान करावे, यासाठीच्या प्रयत्नांना लोकसभा निवडणुकीत अत्यल्प यश मिळाल्याने आता इमारती-चाळीतील आजोबा हुडकून काढण्याची मोहीम निवडणूक आयोगाने सुरू केली.

निवडणूक आयोगाने मतदारांना १९९९ मध्ये मतदार ओळखपत्रे दिली. त्यावेळी ज्यांचे वय ६० ते ६५ वर्षे होते, अशा व्यक्तींच्या नावाची यादी अंगणवाडी सेविकांना दिली आहे. त्यांनी वेगवेगळ्या विभागांत जाऊन ते मतदार त्याच पत्त्यावर वास्तव्यास असतील, तर त्यांचे घरून मतदानाचे अर्ज भरून घ्यायचे, असा द्राविडीप्राणायम आयोगाला करावा लागत आहे. ८५ व त्यापेक्षा अधिक वयाच्या व्यक्तींना मतदान केंद्रावर येण्याचे कष्ट घ्यावे लागू नये, यासाठी अगोदर अर्ज भरावा लागतो.

ठाणे जिल्ह्यातील शहरांतील मंडळी नोकरी, व्यवसायात इतके व्यस्त असतात की, असा अर्ज भरायला घरातील कुणीही तरुण व्यक्ती जात नाही. अशावेळी वयोमानानुसार आजोबांचे मत फुकट जाते. गमतीचा भाग म्हणजे आयोगाने अंगणवाडी सेविकांना दिलेल्या यादीत अनेक नावांपुढे अंदाजे वय ८९, ९०, ९६ असे लिहिले आहे. प्रत्यक्षात काही आजोबांचे पंधरा ते वीस वर्षांपूर्वीच निधन झाले आहे.

**जन्म-मृत्यू नोंदीचा तपशील आयोगाला द्यावा**

गेल्या काही वर्षांत प्रत्येक व्यक्तीचे आधार व पॅनकार्ड बँक खात्याशी जोडण्याची मोहीम केंद्र सरकारने राबवली. याच धर्तीवर देशभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांकडील जन्म-मृत्यू नोंदणीचा डेटा जर निवडणूक आयोगाच्या मतदार याद्यांशी लिंक केला, तर कुठल्या मतदाराचा मृत्यू झाला याची आयोगाला माहिती मिळेल.

**तरुणांचा नाव नोंदविण्याचा उत्साह**

राजकीय पक्ष व वैयक्तिक पातळीवर सारेच तरुण मतदारांची नावे नोंदविण्याचा उत्साह दाखवतात. मात्र, घरातील व्यक्तीचे निधन झाल्यावर आयोगाला त्याबाबत सूचना देऊन मृत व्यक्तीचे नाव वगळण्याची तसदी कुणीही घेत नाही.

राजकीय पक्ष निवडणुकीपूर्वी नवी मतदार नोंदणी करण्याचा हुरूप दाखवतात. मात्र, आपल्या परिसरातील कोणत्या व्यक्तींचे निधन झाले, त्याची माहिती गोळा करून नावे वगळण्याबाबत त्यांच्या कुटुंबाकडून अर्ज भरून घेत नाही.

निवडणूक आयोगाच्या नियमानुसार, एखाद्या व्यक्तीचे निधन झाल्याचे त्याच्या कुटुंबाने अर्ज करून कळवल्याखेरीज स्वत:हून आयोग नाव वगळू शकत नाही, अशी तरतूद आहे. आयोगाला जन्म-मृत्यू नोंदी उपलब्ध झाल्यावर ही तरतूद वगळावी लागेल.

# कोथरुडमधून चंद्रकांत पाटलांचा रस्ता मोकळा बालवडकरांचा बंडखोरीचा निर्णय मागे

पुणे, दि. २९: प्रतिनिधी

पुण्यात भाजपच्या वतीने कोथरूड मतदार संघातून चंद्रकांत पाटील यांचं नाव चर्चेत असताना अमोल बालवडकर यांनीसुद्धा भाजपकडून विधानसभा लढवण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यावरून भाजपमध्ये उमेदवारीवरून रस्सीखेच सुरु झाल्याचे दिसून आले होते. बालवडकर यांनी थेट पत्रकार परिषद घेऊन चंद्रकांत पाटील यांच्यावर आरोप केला होता. मी कोथरूड मतदार संघातून इच्छुक असल्याने चंद्रकांतदादा माझ्यावर नाराज असल्याचे त्यांनी सांगितले होते. पक्षाने जर मला उमेदवारी नाही दिली, तर मग मला माझ्या जनतेसाठी वेगळा निर्णय घ्यावा लागेल, असे सांगत बंडखोरीचा इशारा दिला होता. अखेर त्यांनी हा निर्णय मागे घेतल्याचे दिसून आले आहे.

कोथरूड मतदार संघात पाटील प्रचार करत असताना बालवडकर आणि त्यांची भेट झाली. त्यावेळी दोघांनी नाराजी बाजूला ठेवून एकमेकांना पेढा भरवत शुभेच्छाही दिल्या. यावरून अमोल बालवडकर यांनी माघार घेतल्याचे समजते आहे. बाहेरचा उमेदवार नको अशी वेळोवेळी भूमिका मांडूनही तिसऱ्यांदा चंद्रकांत पाटलांचीच उमेदवारी देण्यात आली. स्थानिक असलेले अमोल बालवडकर यांनी आपल्याला उमेदवारी न मिळल्यास बंडखोरी करण्याचे संकेत दिले होते. रविवारी सकाळीच भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बालवडकर यांच्या निवासस्थानी जात त्यांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला होता. यानंतरही यादीची वाट पाहू, असे वक्तव्य बालवडकर यांनी करत नाराजी कायम असल्याचे स्पष्ट संकेत दिले होते. रविवारी दुपारी भाजपाची पहिली यादी आली आहे. यामध्ये चंद्रकांत पाटलांचे नाव आहे. यामुळे बालवडकर बंडखोरीचा निर्णय घेण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बावनकुळेंच्या



भेटीनंतरही बालवडकर हे निवडणूक लढण्यावर ठाम होते. बालवडकर यांनी बंडखोरी केल्यास चंद्रकांत पाटलांची मोठी अडचण होण्याची शक्यता होती. आता कोथरूडमध्ये पाटलांचा रस्ता मोकळा झाला आहे. बंडखोरी टळल्याने पाटील पुन्हा निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. कोथरुड मतदारसंघामध्ये आता चंद्रकांत पाटील यांना, तर मनसेने किशोर शिंदे यांना उमेदवारी दिली आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटाने चंद्रकांत मोकाटे यांना उमेदवारी दिल्यामुळे या मतदारासंघात आता तिरंगी लढत होणार आहे.

**माझे मतभेद दूर झाले**

प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः या तत्त्वावर भारतीय जनता पक्ष निष्ठेने जनतेची सेवा करत आला आहे. मी या पक्षाचा एक भाग असल्याचा मला प्रचंड अभिमान आहे. त्यामुळे जनतेची सेवा करणे हा उद्देश नेहमीच राहिला आहे आणि तो एक लोकप्रतिनिधी या नात्याने पूर्ण देखील केला आहे. परंतु आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कोथरूड विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी मी निवडणूक लढवणार अशी इच्छा व्यक्त केली होती. सुरुवातीपासून भारतीय जनता पक्षाच्या वतीने मला उमेदवारी मिळावी यासाठी मी आग्रही होतो. परंतु भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आदरणीय चंद्रकांत दादा पाटील यांना संधी मिळाली, काही गोष्टींवरून आमचे मतभेद होते, मात्र आज ते मतभेद माझे नेते आणि राज्याचे भारतीय जनता पार्टीचे सक्षम उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून दूर झाले आहेत. त्यामुळे आज कोथरूड विधानसभा मतदारसंघातून माझी उमेदवारी मी मागे घेत असून चंद्रकांत पाटील यांना पाठिंबा देत आहे. आगामी निवडणुकीत पुन्हा एकदा कोथरूड मध्ये भाजपाचा झेंडा फडकावण्यासाठी मी कटिबद्ध राहील आणि चंद्रकांतदादांच्या प्रचारार्थ मेहनत घेईल. विशेष म्हणजे या विधानसभेच्या सर्व प्रक्रियेत माझ्या सोबत असणारी जनता आणि कार्यकर्ते यांना विचारूनच मी हा निर्णय घेतला आहे. शेवटी जनतेच्या शब्दाबाहेर मी कधीच जाणार नाही आणि येणाऱ्या काळात जनतेच्या हितासाठी अहोरात्र झटत राहील, असे अमोल बालवडकर यांनी सांगितले.

# राष्ट्रीय सुरक्षेसाठी 'हलाल मुक्त दिवाळी' अभियान! - हिंदु जनजागृती समिती

ठाणे, दि. २९ : प्रतिनिधी

भारतात संविधानाने प्रत्येकाला वैयक्तिक स्वातंत्र्य दिलेले आहे, तसेच भारत सेक्युलर असल्याचे सातत्याने सांगितले जाते. असे असतांनाही भारतातील बहुसंख्य असणाऱ्या १०० कोटी हिंदूंवर 'हलाल' या इस्लामी संकल्पनेची सक्ती करणे, हे गैरसंवैधानिक आणि हिंदूंना मूलभूत अधिकार नाकारणे आहे. भारतातील 'अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण' (FSSAI) आणि 'अन्न व औषध प्रशासन' (FDA) या सरकारी संस्थांनाच खाद्यपदार्थांना प्रमाणपत्र देण्याचा अधिकार आहे; मात्र आज बेकायदेशीरपणे काही खाजगी इस्लामी संस्था हजारो रुपयांचे शुल्क घेऊन हलाल प्रमाणपत्रांची विक्री करत आहेत. हे प्रमाणपत्र असल्याशिवाय मुसलमान सामान खरेदी करत नाहीत. इस्लाम धर्मावर आधारित ही हलालची संकल्पना सर्व गैरमुस्लिमांवर लादली जात आहेत. यातून भारतात हलालची समांतर अर्थव्यवस्था निर्माण केली जात आहे. या हलाल अर्थव्यवस्थेतून आतंकवाद्यांचे खटले चालवण्यासाठीही साहाय्य केले जात असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे उत्तर प्रदेश राज्यात मुख्यमंत्री मा. योगी आदित्यनाथ यांनी खाजगी हलाल प्रमाणपत्रांवर बंदी घातली आहे. अशाच प्रकारे भारतावरील भविष्यातील संकट टाळण्यासाठी देशभरातील खाजगी हलाल प्रमाणपत्रे देणाऱ्या संस्थांवर बंदी घालण्याची मागणी 'हिंदु जनजागृती समिती' करत आहे. तसेच देशभरात सर्वाधिक खरेदी ही दिवाळीच्या सणाच्या काळात केली जाते, त्यामुळे जनतेमध्ये जागृती होण्यासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी यंदा 'आपली दिवाळी, हलाल मुक्त दिवाळी' हे अभियान सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे सर्वांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन 'हिंदु जनजागृती समिती'चे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे यांनी केले आहे.

काही वर्षांपूर्वी केवळ मांसाहारी उत्पादनांसाठी आणि मुस्लिम देशांतील निर्यातीसाठी असलेली 'हलाल' संकल्पना आज भारतात साखर, तेल, पीठ, मिठाई, औषधे, सौंदर्यप्रसाधने यांसह अनेक क्षेत्रांत लागू केली आहे. यातून हिंदू, शीख, जैन, बौद्ध आणि इतर गैर-मुस्लिम समाजावर हलाल उत्पादनांची सक्ती होत आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनीही कोणत्याही खाजगी संस्थेला प्रमाणपत्र देण्याचा अधिकार नसल्याचे म्हटले आहे.

हलाल प्रमाणपत्राच्या पुढे जाऊन आता 'इस्लामिक कॉइन', तसेच 'हलाल शेअर मार्केट' सुरू झाले आहे. हलाल प्रमाणपत्र मिळवण्यासाठी मौलानांना 'हलाल निरीक्षक' म्हणून नेमले जाते आणि त्यांना वेतन द्यावे लागते. त्यामुळे हा व्यवसाय आर्थिकच नाही, तर धार्मिक स्तरावरही एका विशिष्ट धर्माला झुकते माप देणारा आहे. त्यामुळे केवळ दिवाळीच्या काळातच नव्हे, तर 'हलालमुक्त भारत' होण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक आहे, असेही श्री. शिंदे यांनी म्हटले आहे.

# भाजप, शिवसेना शिंदे गट पाठोपाठ आता शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंडखोरी

नवी मुंबई, दि. २९: प्रतिनिधी

तुम्ही घर पाडायचे ते आम्ही बांधायचे कौल चढवायचे आणि पुन्हा ते घर आदेश येताच तुमच्या ताब्यात द्यायचे हे आता चालणार नाही. असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते मंगेश आमले यांनी खंत व्यक्त करत अपक्ष बेलापूर विधानसभा लढण्याचा निर्णय त्यांनी वाशीतील मेळाव्यात जाहीर केला. मला निवडणुकीची तयारी करा असा आदेश आला मात्र अचानक संदीप नाईक यांनी प्रवेश करताच मला बाजूला सारले असा दावाही त्यांनी केला


नवी मुंबईत गेल्या काही दिवसात सातत्याने धक्कादायक राजकीय घडामोडी घडत आहेत. भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, शिवसेना उपनेते विजय नाहटा यांच्या पाठोपाठ आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते मंगेश आमले यांनीही बंडाचे निशाण फडकावले आहे. आज वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात पार पडलेल्या मेळाव्यात त्यांनी अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला आहे.

अनेक वर्षांपासून राष्ट्रवादीचे काम करत आहे. २०१९ मध्ये एका कुटुंबाने दुसऱ्या पक्षात प्रवेश केल्याने राष्ट्रवादी रिकामी झाली त्यावेळी आम्ही १० लोक शरद पवार यांना भेटून आम्ही पक्ष पुन्हा उभा करू असे पवारांना आश्वासीत केले. पक्षाच्या पडत्या काळात संघटन केले जागावले. २०१९ मध्ये कामाला लागा म्हणून सांगितले अचानक शांत बसण्यास सांगितले या वेळेससुद्धा निवडणूक कामाला लागा सांगण्यात आले, जोमाने कामाला लागलो, घरोघरी तुतारी पोहचवली. मागच्या आठवड्यापर्यंत घर बांधत आणले कौल टाकले निवडणुकीत पक्षातील कोणालाही तिकीट मिळाले असते तरी चालले असते जोमाने कामाला लागलो असतो. मात्र इथेही तेच झाले ज्यांनी पक्ष संपवला त्यांनाच संधी देण्यात आली. घर आम्ही बांधले आणि ताबा ज्यांनी पूर्वी घर पाडले त्यांच्या ताब्यात दिले. त्यामुळे अगतीत भावनेतून निर्णय स्वीकारला. असे आमले यांनी आपल्या भाषणात मन मोकळे केले आणि शेवटी निवडणूक अपक्ष लढण्याचा निर्णय जाहीर केला.

नवी मुंबईत जुन्नर आंबेगाव पुणे परिसरातील लोक मोठ्या प्रमाणात राहण्यास आहे. त्यात आमले यांना मिळणारा प्रतिसाद पाहता या भागातील मते अपेक्षित असणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे उमेदवार संदीप नाईक यांना धोक्याची घंटा आहे.

# दिवाळीच्या स्वागताला विजांची रोषणाई, ढगांचे फटाके अन् खराखुरा पाऊस !

पुणे, दि. २९ : प्रतिनिधी



गेल्या काही दिवसांमध्ये हवेतील बाष्पाचे प्रमाण कमी झाले. कोरड्या हवेमुळे रात्री आणि पहाटे चांगला गारवा जाणवू लागला आणि ऐन दिवाळीत गुलाबी थंडी पडण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र 'दाना' चक्रीवादळ ओडिशाच्या किनाऱ्याला धडकल्यानंतर हवेतील बाष्प पश्चिमेकडे येत आहे. त्यामुळे दिवाळीत राज्याच्या अनेक भागांत विजांचे फटाके आणि ठिणग्यांची आतषबाजी करणाऱ्या पावसाऐवजी खराखुरा पाऊस अनुभवावा लागणार आहे.

मोसमी वारे माघारी फिरल्यानंतरही ऑक्टोबरचे पहिले दोन आठवडे राज्यभरात पाऊस कायम होता. अरबी समुद्रातील कमी दाबाचे क्षेत्र आणि बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्रामुळे ठिकठिकाणी पाऊस पडला. गेल्या आठवड्याभरात पावसाचे प्रमाण कमी झाले. त्यानंतर तापमानात वाढ होऊन काही ठिकाणी 'ऑक्टोबर हिट' जाणवू लागली. आता हवामान विभागाने २९ ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत पावसाचा अंदाज वर्तवला आहे. काही ठिकाणी आज, सोमवारपासूनच पाऊस होण्याची शक्यता आहे. आकाश ढगाळ होऊन काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याचे ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ अनुपम कश्यपी म्हणाले. २९ आणि ३० ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, पुणे, रायगड, सातारा, सिंधुदुर्ग, जालना, परभणी, हिंगोली, गडचिरोली, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यांत तर ३१ ऑक्टोबर रोजी यवतमाळ, चंद्रपूर, वर्धा येथे 'पिवळा इशारा' देण्यात आला आहे.

**हवेची गुणवत्ता खालावणार?**

हवेतील धुलिकणांवर हवेची गुणवत्ता अवलंबून असते. गेल्या काही दिवसांत हवामान कोरडे झाल्यामुळे धुलिकणांचे प्रमाण वाढू लागले आहे. त्यात आता दिवाळीतील फटाक्यांच्या आतषबाजीमुळे प्रदूषण वाढून हवेची गुणवत्ता खालावण्याची शक्यता आहे.

'दाना' चक्रीवादळ येऊन गेल्यानंतर हवेतील बाष्पाचा पश्चिमेकडे प्रवास सुरू झाला आहे. त्यामुळे ऐन दिवाळीत राज्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

# भिवंडीत भरारी पथकाकडून 3,31,609 रुपयांचा मुद्देमाल जप्त

ठाणे, दि. २९: प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील सर्वच ठिकाणी वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. त्यानुसार भिवंडी पश्चिमचे भरारी पथक व नारपोली पोलीसांच्या संयुक्त कारवाईत संशयित वाहनांमध्ये तीन लाख ३१ हजार ६०९ रुपयांचा मुद्देमाल विनातपशील आढळला. त्यांमध्ये चांदी व चांदी चे काम असलेल्या वस्तूंचा समावेश आहे. या वस्तूंच्या तपासणी दरम्यान संबंधित बील पावत्या नसल्याने या भरारी पथकाने धडक कारवाई करीत हा मुद्देमाल जप्त केला आहे, याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

रविवारी पहाटे ३ वाजता केलेल्या या संयुक्त कारवाईत एक संशयित वाहन ताब्यात घेण्यात आले. या वाहनामध्ये असलेल्या सामानाबाबत पोलिसांनी चौकशी केली असता वाहनचालक व गाडीतील इतर कर्मचाऱ्याना सामानाबाबत कोणतीही माहिती देता न आल्याने पोलिसांनी ही गाडी नारपोली पोलीस ठाण्यात आणली. पोलीस व भरारी पथकातील कर्मचाऱ्यांनी गाडीतील साहित्य कुरिअर एजन्सीचे मालक व पंचासमक्ष गाड़ी तुन खाली उतरावला. संशयित वाहनातून एकंदर ७३ छोटे मोठे बॉक्स मधील साहित्य व त्या साहित्याच्या बिलाची तपासणी केली.

या वाहनामध्ये असलेल्या ७२ बॉक्स मधे सोने, चांदी व गिफ्ट आर्टिकल असलेले एकंदरीत दोन दोन कोटी आठ लाख सतरा हज़ार आठशे वीस रुपये चा मुद्देमाल सापडला. तपासणी दरम्यान संबंधित कुरिअर चालकाने बॉक्सनिहाय त्यात समाविष्ट असणाऱ्या साहित्य व तपशील असणारे पक्के बिल सादर केले व अनुषंगिक खात्री पंचासमक्ष व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यात आले. त्यानुसार एकूण ६० बॉक्स मध्ये असलेल्या सोने व चांदी चे गिफ्ट आर्टिकल दोन कोटी चार लक्ष ८६ हजार २१७ रुपयांचे चे बिल सादर केले. मात्र उर्वरित बॉक्समध्ये असलेल्या तीन लक्ष ३१ हजार ६०९ रुपयांच्या मुद्देमालातीऋल चांदी व चांदी चे काम असलेले गिफ्ट आर्टिकलचे बिल संबंधितास सादर करता आले नाही. त्यामुळे या वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत.

## लखनभैया एन्काउंटर प्रकरणी माजी पोलीस कर्मचारी प्रकाश कदम यांना जामीन

ठाणे, दि. २९ : प्रतिनिधी

मुंबईतील बहुचर्चित लखनभैया एन्काउंटर प्रकरणात माजी पोलीस कर्मचारी प्रकाश कदम यांना सर्वाच्च न्यायालयाने जामिन मंजूर केला आहे. 2013 साली या प्रकरणात मुंबई सत्र न्यायालयाने प्रकाश कदम यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या आदेशाविरोधात उच्च न्यायालयात अपील करण्यात आले होते. हे अपील उच्च न्यायालयाने नामंजूर केले होते. त्यानंतर प्रकाश कदम यांनी या प्रकरणात सर्वाच्च न्यायालयात दाद मागितली होती. त्यावर सर्वाच्च न्यायालयाने त्यांचा जामिन मंजूर केला.

या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालय ते सर्वोच्च न्यायालय येथे अ‍ॅड. मनिष माजगांवकर यांनी कामकाज पाहिले. दै. पुढारीशी बोलतांना अ‍ॅड. माजगांवकर यांनी सांगितले की, सदर प्रकरणाचे कामकाज 2018 पासून सुरू केले. गेले 12 वर्षापासून प्रकाश कदम हे कारागृहात होते. महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या कुटुंबियांना या प्रकरणाचा मानसिक त्रास झाला. आता त्यांची जामिनावर सुटका झाल्याने त्यांच्या कुटुंबियांनी समाधान व्यक्त केले. महत्वाचे म्हणजे लखनभैया एन्काउंटर प्रकरणात कदम यांच्याविरोधात पोलिसांकडे कोणताही ठोस पुरावा नसल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने अमान्य केले होते. दरम्यान, या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्यानंतर कायदेशीरबाबी तपासून त्यांना 21 ऑक्टोबर रोजी कदम यांना जामीन मंजूर केला आहे.

# महायुतीचा धर्म या निवडणुकीतही पाळला जाईल देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला विश्वास

ठाणे, दि. २९ : प्रतिनिधी

"महायुतीचा उमेदवार या मतदारसंघात उभा आहे. महायुती विधानसभा निवडणुकीसाठी पूर्णपणे सज्ज असून या मतदारसंघातूनच नव्हे तर सर्वच मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार निवडून येतील," असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी व्यक्त केला. ठाणे शहर विधानसभेचे भाजपचे उमेदवार संजय केळकर यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी त्यांनी हजेरी लावली होती. यावेळी बोलताना त्यांनी हा विश्वास व्यक्त केला.

महायुतीचा धर्म या निवडणुकीमध्ये देखील पाळाला जाईल असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. केळकर यांचा उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी नौपाडा, राम मारुती रोड या भागातून रॅली काढण्यात आली होती. या रॅलीत काही अंतरापर्यंत फडणवीस



सामील झाले होते. सोमवारी सकाळी साडे दहाच्या सुमारास केळकर यांनी घंटाळी देवीचे दर्शन घेतले. घंटाळीवरुन गोखले रोड मार्गे, जांभळीनाक्यावरुन पुढे टेंभी नाक्यावर दाखल झाले. येथे संजय केळकर यांनी आनंद आश्रमात जाऊन दिवंगत शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांचे आशीर्वाद घेतले. त्यानंतर ही रॅली साडे बाराच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाली. यावेळी ज्या ज्या भागातून ही रॅली गेली, त्या त्या भागात वाहतूक कोंडी झाल्याचे दिसून आले. गडकरी रंगायतन परिसरातही कोंडीचे चित्र दिसून आले.

दरम्यान, "उमेदवारी अर्ज भरण्यासाठी महायुतीतील सर्व मंडळी उपस्थित होते. त्यामुळे महायुतीचाच विजय निश्चित आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह असून मतदार राजा आर्शिवाद देईल हे निश्चित आहे," असं संजय केळकर यांनी म्हटलं आहे.

## परस्परांविरोधात प्रचार करणार? संदीप नाईक यांच्या उमेदवारीमुळे गणेश नाईकांपुढे पेच

नवी मुंबई, दि. २९: प्रतिनिधी

गणेश नाईक यांचे पुत्र संदीप नाईक यांनी भाजपच्या जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देऊन शरद पवार गटात प्रवेश केला आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी नवी मुंबईत येऊन बेलापूरमधून त्यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे बेलापूरमध्ये भाजपच्या मंदा म्हात्रेंविरोधात त्यांची चुरस पाहायला मिळणार आहे. ऐरोलीतून भाजपने गणेश नाईक यांना पुन्हा संधी दिली आहे. महाविकास आघाडीतून त्यांच्या विरोधात कोणाला उमेदवारी मिळेल, हे नसले तरी या निमित्ताने नाईक पिता-पुत्रात प्रचाराच्या मुद्यावरून पेच निर्माण होणार आहे.

गणेश नाईक यांनी सोमवारपासून प्रचाराचा शुभारंभ केला. तर संदीप नाईक यांनी मंगळवारी हाती तुतारी घेतली. गणेश नाईक यांच्या विरोधात प्रचार करणार का, या प्रश्नावर संदीप नाईक यांनी मौन बाळगले आहे. तर गणेश नाईक यांनीही या प्रश्नाला सध्या बगल दिली आहे. बेलापूर येथून भाजपने मंदा म्हात्रे यांना तिसऱ्यांदा उमेदवारी दिली आहे. आपल्या प्रचारासाठी गणेश नाईक यांनी बेलापूरमधून संदीप यांच्या विरोधात प्रचारात उतरावे, यासाठी त्या नक्कीच प्रयत्न करतील. तसे झाल्यास गणेश नाईकांना नाइलाजास्तव पुत्र संदीप यांच्याविरोधात प्रचाराला उतरावे लागेल की, ते नकार देतील, याबाबत वेगवेगळे अंदाज बांधले जात आहेत.

# जिल्ह्यातील बाजार समित्यांत खरेदी आजपासून सहा दिवस राहणार बंद

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. २९ :** दिवाळीच्या सणामध्ये जिल्ह्यातील बाजार समित्यांमधील शेतमाल खरेदीचे व्यवहार बंद असतात. याबाबत पणन संचालनालयाचे तसे आदेशही आहेत. अशातच जिल्ह्यातील अकोल्यासह बाजार समित्या २४ ऑक्टोबरपासून ३ नोव्हेंबरपर्यंत बंद राहणार आहेत. अकोला बाजार समितीचे व्यवहार नोव्हेंबरपासून पूर्ववत होतील असे, बाजार समिती प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. म्हणजे पुढील जवळपास आठवडाभर या बाजार समित्यांमध्ये लिलाव आणि खरेदीचे व्यवहारच होणार नाहीत.



यंदा दिवाळीच्या सणानिमित्त बाजार समित्यांमधील शेतमाल खरेदीचे व्यवहार ३० ऑक्टोबरपर्यंत सुरू राहण्याची अपेक्षा शेतकऱ्यांना होती. जिल्ह्यातील अकोल्यासह जिल्ह्यातील वाडेगाव, मूर्तिजापूर, बार्शिटाकळी, अकोट बाजार समिती २४ ऑक्टोबरपासून बंद राहणार आहेत. अकोला समितीमधील शेतमाल खरेदीचे व्यवहार २४ ऑक्टोबरपासूनच बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिवाळीमुळे शेतकरी माल बाजारात आणत होते. अशातच बाजार समित्यांमधील शेतमाल खरेदीचे व्यवहार एवढ्यात बंद ठेवले जाण्याची अपेक्षाच जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नव्हती, मात्र सोमवारी बाजार समितीच्या वतीने या संदर्भातील सूचना जाहीर करण्यात आली. ऐन दिवाळीचा सण तोंडावर असताना सोमवारपासून अकोल्यासह जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील शेतमाल खरेदीचे व्यवहार जवळपास आठवडाभर बंद राहणार आहेत. त्यामुळे दिवाळीच्या तोंडावर माल कुठे विक्री करावा असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला असून, आता शेतकऱ्यांना कवडीमोल दराने खेडा खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांचाच पर्याय राहणार आहे.

### सोमवारपासून व्यवहार होणार पूर्ववत

२४ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबरपर्यंत दिवाळीनिमित्त बाजार समितीतील लिलाव आणि खरेदीची प्रक्रिया बंद राहणार आहे. ३ नोव्हेंबरला रविवार असल्याने बाजार समितीला सुटी आहे. त्यामुळे प्रत्यक्षात खरेदी विक्रीचे व्यवहार हे सोमवार, ४ नोव्हेंबरपासून सुरु होणार आहेत. याची शेतकरी बांधवांनी नोंद घ्यावी. शिरीष धोत्रे, सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोला.

# विद्यार्थ्यांनी घेतली प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याची शपथ

■ महासागर प्रतिनिधी,

**आलेगाव , दि. २९ :** पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला असून, यंदाची दिवाळी प्रदूषणमुक्त साजरी करण्याचा निर्धार आलेगाव येथील प्रभाप्रकाश कॉन्व्हेंटने केला आहे. त्यासाठी कॉन्व्हेंटमध्ये दिवाळी सेलिब्रेशन विद्यार्थ्यांसमवेत करण्यात आले. विद्यार्थ्यांकडून पर्यावरणाच्या सुरक्षिततेसाठी प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करावी, यासाठी शपथ देण्यात आली.



फटाक्यांचा धूर तसेच आवाजामुळे ध्वनी प्रदूषण होऊ नये, या उद्देशाने विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण व्हावी यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध कलाकृतींद्वारे दिवाळी हा सण आपल्या शिक्षकांसोबत उत्साहाने साजरा केला. विद्यार्थ्यांनी आकाश कंदील पणती डेकोरेशन रांगोळी स्पर्धा अशा विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला. त्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये प्रसादाचे वाटप करण्यात आले.





विद्यार्थ्यांना सण उत्सव साजरे करताना आपल्या पर्यावरणाला कोणत्याही प्रकारची हानी पोहोचू नये, यासाठी प्रेरित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक महावीर जैन, पर्यवेक्षक चंदा मुर्तडकर, नीलेश पस्तापुरे व अन्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालकांचे सहकार्य लाभले.

प्रतिकात्मक पूजन : प्रभा प्रकाशच्या ज्युनिअर सेक्शनमध्ये लक्ष्मी माता श्री गणेश तसेच मा सरस्वती यांच्या प्रतीकात्मक रूपाचे पूजन करण्यात आले. लक्ष्मी मातेच्या वेशभूषेत दुसरीची विद्यार्थिनी ओवी देशमुख, माता सरस्वतीच्या वेशभूषेमध्ये दुसरीची विद्यार्थिनी सुर्वे आणि श्री गणेशाच्या वेशभूषेत सोहम लामधाडे होता. विद्यार्थी पालक, शिक्षकांनी या दिवाळीनिमित्त माता लक्ष्मी माता सरस्वती तसेच श्री गणेश यांच्या प्रतीकात्मक रूपाचे पूजन करून दिवाळी हा उत्सव साजरा करण्यात आला.

फटाक्यांना नाही म्हणा प्रदूषण आणि त्याचे दुष्परिणाम टाळण्यासाठी आपण फटाक्यांना नाही म्हटले पाहिजे. आपण आपल्या सभोवतालच्या लोकांनाही फटाके फोडण्यापासून दूर राहण्याची प्रेरणा दिली पाहिजे.- महावीर जैन, मुख्याध्यापक, प्रभा प्रकाश.

प्रदूषण रोखा फटाक्यांतील धुरामुळे आधीच प्रदूषित वातावरण अधिकच प्रदूषित होऊन श्वास घेणे कठीण होते. आपण ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेतली पाहिजे. फटाके न फोडता पर्यावरणाला जपले पाहिजे.-चंदा मुर्तडकर, पर्यवेक्षक जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट

## अखेरच्या क्षणी तिकीट; आ. पिंपळेंना अश्रू अनावर

### मूर्तिजापूरमध्ये तिरंगी लढतीचे संकेत



**अकोला :** भाजपने जिल्ह्यातील तीन उमेदवार जाहीर केले होते. मात्र, मूर्तिजापूरचा उमेदवार जाहीर केला नव्हता. अखेर सोमवारी दुपारी भाजपने विद्यमान आमदार हरीश पिंपळे यांना उमेदवारी जाहीर केली. उमेदवारी जाहीर झाल्याचा फोन येताच पिंपळे ढसाढसा रडले. माझ्यावर प्रेम करणारे कार्यकर्ते काय चीज आहेत हे मला या २-३ दिवसात कळले, काही चुका झाल्या असतील तर त्यापुढे होणार नाहीत, अशी ग्वाही पिंपळे यांनी रडतच कार्यकर्त्यांना दिली. आ. पिंपळे यांना उमेदवारी मिळेल की नाही, अशा चर्चा होत्या. पक्षश्रेष्ठींनी त्यांना थांबण्याचे सांगितले होते.

त्यानंतर २-३- दिवसात घडामोडी घडल्या. त्यातच राष्ट्रवादी शरद पवार गटातील रवी राठी यांना भाजपमध्ये प्रवेश दिल्याने पिंपळे यांना तिकीट मिळणार नाही, अशी स्थिती झाली होती. त्यानंतर पिंपळे यांच्या समर्थकांनी नागपूर, मुंबई गाठून प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन पिंपळेंनाच तिकिट द्यावे, अशी मनधरणीही केली होती.

# शंभुराजे प्रतिष्ठानतर्फे दुर्ग दिवाळी किल्ले बनवा स्पर्धा

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. २९ :** शंभुराजे प्रतिष्ठानच्या वतीने २७ ऑक्टोबर रोजी किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात चिमुकल्यांसह विद्यार्थांचा प्रतिसाद मिळाला.



दिवाळी म्हटले की, नवीन कपडे, फटाके, रांगोळी, गोडधोड फराळ हे तर आलेच; पण त्यातही बच्चे कंपनीसाठी औत्सुक्याचा आणि आवडीचा विषय म्हणजे किल्ले बनवणे. परंतु, दिवाळीच्या सुट्या आणि अंगणात चिमुकल्यांनी बनवलेले मातीचे किल्ले आता पहायला मिळत नाही. ही संस्कृती नष्ट होऊ नये यासाठी शंभुराजे प्रतिष्ठानच्या वतीने पुढाकार घेण्यात आला. स्पर्धेसाठी लागणारी सामग्री उपलब्ध करून देण्यात आली. यासाठी कविता मिटकरी यांनी पुढाकार घेतला.

दुर्ग दिवाळी किल्ले बनवा स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. यावेळी गोदावरी मिटकरी, शंभुराजे प्रतिष्ठानच्या अध्यक्ष कविता मिटकरी, माजी नगरसेवक आशिष पवित्रकार, तुळशीदास खिरोडकर, स्वप्नील गावंडे, गीतकार संतोष भाकरे, योगेश पवित्रकार, कला शिक्षक आशिष चौथे, शुभम शिरसाट यांच्या हस्ते स्पर्धकांना सन्मानचिन्ह प्रमाणपत्र व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

पन्हाळगड किल्ला प्रथम स्पर्धेत प्रथम बक्षिस अंजू उपराट, निकिता गवई, साक्षी राऊत यांच्या पन्हाळगड किल्ल्याला मिळाले.

द्वितीय बक्षिस ओम गोतमारे, राम कळस्कर, चेतन मिटकरी, अभिषेक गोतमारे, मीनाक्षी राऊत यांनी साकारलेल्या कोंढाणा, सिंहगड किल्ल्याला मिळाले. तृतीय क्रमांकाचे बक्षिस पीयूष काकडे, वैष्णवी काकडे यांनी साकारलेल्या प्रतापगड किल्ल्याला मिळाले. समर्थ पांडे, रोहित कुमकर, सम्यक गवई, लोकेश कळसकर, कैवल्य पांडे यांना चतुर्थ क्रमांकाचे बक्षिस तर अनन्या भालेराव, स्नेहल जाधव, परिधी तायडे, शौर्य भालेराव, पारस बांदे, साहिल पिंजरकर, वंश शर्मा, ओम पाटेकर, कपिले आदींना उत्तेजनार्थ बक्षिस देऊन गौरवण्यात आले.

# खेळाडूंनी दाखवले रोप स्किपिंगमधील कौशल्य




■ महासागर प्रतिनिधी,

**बुलढाणा, दि. २८ :** आतंरराष्ट्रीय स्पर्धेसारखे नियोजन करीत बुलडाणा सारख्या ग्रामीण भागातील शाळेने राष्ट्रीय स्पर्धेच्या आयोजनाचे शिवधनुष्य लिलया सांभाळले याबद्दल त्यांनी प्रशासनाचे व व्यवस्थापनाचे कौतुक केले. सराव व कौशल्य यांची योग्य सांगड घातल्यास आपण जीवनात यशस्वी होऊ शकतो, असा विश्वास राधेश्याम चांडक यांनी व्यक्त केला. सहकार विद्या मंदिर बुलडाणा येथे पहिल्यांदाच सी.बी.एस.ई. च्या ''राष्ट्रीय रोप स्किपिंग'' स्पर्धेचा समारोप समारंभ आज दि. २८ऑक्टोबर रोजी उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा क्रीडा अधिकारी महानकर व जिल्हा शल्य चिकित्सक भुसारी उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणुन जिल्हा डेप्युटी आर.टी.ओ. हिरडे, असिस्टंट आर.टी.ओ महाजन व एम.एस.ई.बी चे मुख्य अधिकारी कटके उपस्थित होते. यावेळी बुलडाणा अर्बन परिवाराचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक, मुख्य कार्यकारी संचालक डॉ. सुकेश झंवर, बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा कोमल झंवर व स्पर्धेचे निरीक्षक निर्देश शर्मा व निरीक्षक नायर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीस खेळाडुंनी रोप स्किपिंग मधील त्यांचे कौशल्य दाखवित उपस्थितांचे मनोरंजन केले. ७ वर्ष ते ४० वर्षापर्यंतचे विविध खेळाडु व प्रशिक्षकांनी उदभुत रोप स्किपींगचे कौशल्य दाखवित उपस्थितांना आश्चर्यचकित केले. यानंतर निरीक्षक नायर यांनी सहकार विद्या मंदिर, बुलडाणा प्रशासनाचे आपल्या भाषणातून भरभरुन कौतुक केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना मेडल वाटप अतिथींच्या हस्ते करण्यात आले. १८ विविध खेळ प्रकारात आपले कौशल्य दाखवित विद्यार्थ्यांनी हे यश संपन्न केलेले आहे. याप्रसंगी वयोगट१४ व १४ अंतर्गत सांघिक प्रकारात विजयी संघामध्ये सर. सी.आर. रेड्डी पब्लिक स्कुल, आंध्र प्रदेश -प्रथम, वेस्टबेरी हायस्कुल, आंध्र प्रदेश -व्दितीय, सैनिक स्कुल, रोहतक -तृतीय वयोगट १४ अंतर्गत सैनिक स्कुल, रोहतक -प्रथम, बालभारती पब्लिक स्कुल, रोहीणी -व्दितीय, एव्हरग्रीन पब्लिक स्कुल, दिल्ली - तृतीय, सहकार विद्या मंदिर, बुलडाणा यांनी यश संपादन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शालेय व्यवस्थापन व सर्व क्रीडा प्रशिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाने अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन पुजा पाठक व प्रज्ञा खिल्लारे यांनी केले.

# वडिलांच्या स्मृतिदिनानिमित्त गरजू मुलींना दिल्या नवीन सायकली

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला, दि. २९ :** वडिलांच्या स्मृती दिनानिमित्त गरजू मुलींना दिल्या नवीन सायकली भेट देत देण्यात आल्या. त्यामुळे शाळेत जाणाऱ्या मुलीची पायपीट थांबली असून, त्यांची शैक्षणिक वाट सुखकर झाली. अकोला तालुक्यातील बिरसिंगपूर सरपंच महेंकुमार अरुण घरडे यांनी सायकली भेट देत सामाजिक दायित्व निभावले. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नाही. गरजू मुलांना पायपीट करतच शाळेत जावे लागते. या विद्यार्थ्यांचे पावसाळ्यात प्रचंड हाल होतात. दरम्यान महेंकुमार घरडे यांचे वडिल स्व. अरुण घरडे यांच्या स्मृती दिनानिमित्त त्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत गरजवंत गोरगरीब शाळकरी मुलींना दोन सायकली भेट दिल्या. संत गजानन महाराज विद्यालयात गरजवंत शालेय विद्यार्थांना सायकली देण्यात आल्या. शाळेत प्रार्थने दरम्यान मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, बँक व्यवस्थापक खंदारे यांच्या उपस्थितीत सायकली भेट देण्यात आल्या. मुली तानखेड येथून रोज कुरणखेड येथे तीन किलो मीटर पायी जात असत. अन्य देश, राज्यातूनही मदत : निराधारांची दिवाळी उपक्रमांतर्गत रद्दी व आर्थिक मदतही स्वीकारण्यात येत आहे. या उपक्रमात महाराष्ट्रातील २६ जिल्ह्यातून मदत आली. यात अकोला, सिंधुदर्ग, अहिल्यानगर, सातारा, पुणे, जळगाव, नाशिक, मुंबई, ठाणे, छत्रपती संभाजी नगर, नांदेड, यवतमाळ, गोंदिया, भंडारासह अन्य जिल्ह्यांचा समावेश आहे. तसेच आंध्र प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश, केरळ, जम्मू काश्मीर, राजस्थान, तेलंगणा, छत्तीसगडसह आयर्लंड व अमेरीकेत राहणाऱ्या नागरिकांकडूनही मदत मिळली.


**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election : Maharashtra Legislative Assembly-2024**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : 50 Hingna**

**Name of the candidate : SAMEER DATTATRAYA MEGHE**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| | **Criminal antecedents** | | |
| 1. | a. | Nature of the offences | Conducting Rally/ Marching with 30-40 people |
| | b. | Case no. | 1. SCC 1076/2021<br>2. SCC 1185/2020<br>3. SCC 19644/2021<br>4. SCC 40/2020<br>5. SCC 1540018/2022<br>6. SCC 242/2021 |
| | c. | Name of the Court | 1. Civil Judge Jr. DN J.M.F.C Court no. 1 Hingna Distt. Nagpur<br>2. Civil Judge Jr. DN J.M.F.C Court no.1 Hingna Distt. Nagpur<br>3. 17-19th Jt C.J.J.D. and J.M.F.C Nagpur<br>4. 23-11th Jt C.J.J.D. and J.M.F.C Nagpur<br>5. Civil Judge Jr. DN J.M.F.C Court no. 1 Hingna Distt. Nagpur<br>6. Civil Judge Jr. DN J.M.F.C Court no. 1 Hingna Distt. Nagpur |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | 1. Yes<br>2. Yes<br>3. No<br>4. No<br>5. No<br>6. No |
| | e. | Date of conviction, if any | Not Applicable |
| | f. | Details of punishment undergone, if any | Not Applicable |
| | g. | Any other information required to be given | No |
| 2. | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | | Candidate **Sameer Dattatraya Meghe** is senior legislator. He has very strong administrative capacity looking at his experience he has been chosen. |
| 3. | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(2) Name of the Constituency : 50 Hingna**

**Name of the candidate : SAMEER DATTATRAYA MEGHE** .................... and so on

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...

**Date : 29/10/2024**
**Place : Mumbai**

**Chandrashekhar Bawankule**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

# गोदाकाठचा राजयोगी शंकरराव चव्हाण

**सत्ता हा शोभेचा अलंकार नव्हे तर जनसेवेचे साधन आहे अशी जाणीव असणारे नेते सध्या फारच दुर्मिळ झालेत. असे नेते सवंग लोकप्रियतेसाठी मोठमोठ्या घोषणा न करता दिलेला शब्द पूर्ण करण्याची धमक बाळगतात. आपल्या कडक शिस्तीसाठी ओळखले जाणारे शंकरराव चव्हाण हे सुद्धा असेच एक नेते होते. शंकररावांनी आपल्या काळात महाराष्ट्रात विकासकामांचा डोंगर उभा केला. महाराष्ट्राला नवा चेहरा मिळवून देण्याचा प्रयत्न केला.**

---------------

पैठणचा जायकवाडी प्रकल्प हे त्यांना पडलेले एक गोमटे स्वप्न होते. त्यांच्या प्रयत्नांमुळेच पैठणला नाथसागर साकार झाला. जायकवाडीसह विष्णुपुरी, कोयना, वारणा, कन्हेर, दूधगंगा, गिरणा, मांजरा, निम्न तेरणा अशा कितीतरी प्रकल्पांच्या कालव्यांतून वाहणारे पाणी आजही शंकररावांच्या कार्याची गाणी गाते. यामुळेच त्यांना आधुनिक भगिरथ म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीचे जनक म्हणूनही त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो.

शंकरराव चव्हाण यांचा जन्म 14 जुलै 1920 रोजी पैठण येथील एका शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षणही पैठणमध्येच झाले. त्यानंतर त्यांनी हैदराबादेतील उस्मानिया विद्यापीठातून इअ व छछइ करून 1945 मध्ये वकिलीची सनद मिळवली. पण स्वामी रामानंद तीर्थ यांच्या सूचनेनुसार ते हैदराबाद मुक्तीसंग्रामातही सहभागी झाले. 13 सप्टेंबर 1948 रोजी हैदराबाद संस्थान भारतात सामील झाले आणि येथेच शंकररावांच्या कर्तृत्वाचे एक पर्व पूर्ण झाले.

शंकरराव चव्हाण यांना कोणताही राजकीय वारसा नव्हता. त्यामुळे पहिल्या निवडणुकीत त्यांच्या पदरी पराभव पडला. पण 1953 मध्ये ते नांदेडचे पहिले नगराध्यक्ष झाले. त्यानंतर शंकररावांनी केव्हाच मागे वळून पाहिले नाही. 1956 साली ते महाराष्ट्राच्या महसूल खात्याचे उपमंत्री झाले. त्यानंतर त्यांना अशा कोणत्याही पदांसाठी कुणाच्या मागे धावण्याची गरजच भासली नाही. किंबहुना वेगवेगळी पदे स्वतःहूनच त्यांच्या मागे धावत आली.

शंकरराव चव्हाण यांना भ्रष्टाचाराचा भयंकर तिटकारा होता. नांदेडच्या नगराध्यक्षपदी असताना एकेदिवशी सकाळी ते घरात जेवण करत होते. त्यावेळी एक ठेकेदार त्यांच्या घरी आला. शंकरराव घरात असल्याची संधी साधून त्या ठेकेदाराने बाहेरच्या शिपायाला शंकररावांना देण्यासाठी 1 हजार रुपयांचे पाकीट दिले. त्यानंतर तो काहीही न बोलता तेथून निघून गेला.

त्या ठेकेदाराचे काही चुकीचे काम शंकररावांकडे अडले होते. चुकीच्या कामाला साथ देण्याची किंवा त्याला पाठिशी घालण्याची शंकररावांची प्रकृती नाही हे त्याला माहिती होते. त्यामुळे त्याने आपले चुकीचे काम करून घेण्यासाठी शंकररावांना एक प्रकारे 1 हजार रुपयांची लाच देण्याचा प्रयत्न केल होता.



**वंशाचा दिवा म्हणून मुलगाच हवा या वेड्या हट्टापायी महिलांचे प्रमाण भयप्रद पद्धतीने घटत चालले आहे. ही घसरण रोखण्यासाठी महाराष्ट्रात 1988 मध्ये गर्भलिंगनिदान चाचणीवर कायद्याने बंदी घालण्यात आली. पुढे 1994 साली केंद्राने तो कायदा संमत केला. पण काळाची पाऊले ओळखून शंकररावांच्या नेतृत्वाखाली स्त्रीभ्रुण हत्येवर बंदी घालणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले पुरोगामी राज्य ठरले.**

जेवण आटोपले. शंकरराव बाहेर आले. शिपायाने ते पाकीट त्यांच्या हाती दिले. त्यांनी त्याविषयी शिपायाकडे चौकशी केली असता सगळा प्रकार त्यांच्या लक्षात आला. त्यानंतर क्षणाचाही विलंबन न लावता ते तसेच घराबाहेर पडले. आपल्या अंगात केवळ पायजामा व बनियन आहे हे संतापामुळे त्यांच्या लक्षातही आले नाही.

अंगात कमीजही न घालता ते तसेच घराबाहेर पडले. सायकलवरून त्यांनी कलेक्टर ऑफीस गाठले. त्यावेळी भुजंगराव कुलकर्णी नांदेडला कलेक्टर होते. त्यांच्याकडे त्यांनी सदर ठेकेदाराची तक्रार केली. तसेच डीएसपी त्र्यंबकराव पातुरकर यांच्याकडे जाऊन रीतसर गुन्हाही दाखल केला. प्रश्न पैशांचा नव्हता, तर तत्वांचा होता. असे शंकरराव होते.

शंकरराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात दळणवळण, परिवहन, कृषी, पाटबंधारे आदी खात्यांचा कारभार सांभाळताना राज्याच्या चौफेर व सर्वांगिन विकासाचे ध्येय बाळगले.

त्यांच्या कार्याची पावती म्हणूनच त्यांना 1975-77 या काळात पहिल्यांदा महाराष्ट्राचे चौथे मुख्यमंत्री म्हणून काम करण्याची दुर्मिळ संधी मिळाली. या 2 वर्षांच्या काळात शंकररावांनी महाराष्ट्रात विकासकामांचा डोंगर उभा केला. महाराष्ट्राला नवा चेहरा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. प्रशासनात अनुशानपर्व आणले, परंतु सत्तास्पर्धेच्या व गटबाजीच्या राजकारणामुळे त्यांना 27 फेब्रुवारी 1977 रोजी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला.

वसंतदादा पाटील यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या राजीनाम्यानंतर पक्षश्रेष्ठींनी महाराष्ट्राची धुरा शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्याकडे सोपवली. पण एका प्रकरणात त्यांना राजीनामा द्यावा लागला. त्यामुळे महाराष्ट्राचा नवा मुख्यमंत्री कोण? असा प्रश्न पक्षश्रेष्ठींपुढे उपस्थित झाला. त्यावेळी शंकरराव केंद्रात गृहमंत्री म्हणून कार्यरत होते. ते तिथे वेगवेगळ्या प्रश्नांवर काम करत होते.

आपल्याला पुन्हा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळावी लागेल असे त्यांच्या मनातही नव्हते. पण पक्षश्रेष्ठींपुढे त्यांच्याशिवाय दुसरे कोणतेही नाव नव्हते. त्यामुळे त्यांनी शंकररावांना महाराष्ट्राची धुरा हाती घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार, शंकररावांनी दुसऱ्यांदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी हाती घेतली.

शंकररावांना 12 मार्च 1986 ते 26 जून 1988 या काळात पुन्हा एकदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद भूषवण्याची संधी मिळाली. मुख्यमंत्रीपदी असताना ते सकाळी पावणे 10 च्या ठोक्याला मंत्रालयात हजर होत असत. त्यामुळे सचिवालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळेवर हजेरीपटावर स्वाक्षरी करून कामाला लागावे लागत असे. कारण, उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नावापुढे ते स्वतः लेटमार्क नोंदवत असत. तसेच ते त्यांच्याकडून खुलासाही मागवत असत.

**गर्भलिंग चिकित्सा व स्त्रीभ्रुण हत्याबंदी कायदा**

आपल्या पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीला नेहमीच दुय्यम स्थान दिले जाते. मुलगा हा वंशाचा दिवा, तर मुलगी ही परक्याचे धन ही आपली लोकधारणा आहे. या सनातनी मानसिकतेमुळे आपल्या समाजात स्त्रीभ्रुणहत्येचे प्रमाण चिंताजनक वाढले आहे.

वंशाचा दिवा म्हणून मुलगाच हवा या वेड्या अट्टाहासापायी समाजातील महिलांचे प्रमाण भयप्रद पद्धतीने घटत चालले आहे. ही घसरण रोखण्यासाठी महाराष्ट्रात 1988 मध्ये गर्भलिंगनिदान चाचणीवर कायद्याने बंदी घालण्यात आली. पुढे 1994 साली केंद्राने तो कायदा संमत केला. पण काळाची पाऊले ओळखून शंकररावांच्या नेतृत्वाखाली स्त्रीभ्रुण हत्येवर बंदी घालणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले पुरोगामी राज्य ठरले.

**पाटबंधारे क्षेत्रावर अमिट ठसा**

शंकररावांनी कुटुंबात कोणताही राजकीय वारसा नसताना शून्यातून विश्व निर्माण केले. त्यांच्या राजकीय कार्यकर्तृत्वाची कमान सदैव चढती अन् वाढती राहिली. महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री व मुख्यमंत्री म्हणून त्यांनी जो ठसा महाराष्ट्राच्या पाटबंधारे क्षेत्रावर अमिट ठसा उमटवला.

पैठणचा जायकवाडी प्रकल्प म्हणजे शंकरराव चव्हाणांना पडलेले एक गोमटे स्वप्न होते. हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा सिंचन प्रकल्प आहे. शंकररावांच्या प्रयत्नांमुळेच पैठणला नाथसागराचा 'अमृतकुंभ' साकार झाला.

जायकवाडी व विष्णुपुरी प्रकल्प हे तर जणू शंकररावाचे अपत्यच आहेत. त्यांनी अनेक अडचणींवर मात करून हे प्रकल्प पूर्णत्वास नेले. या प्रकल्पांसोबतच कोयना, वारणा, कन्हेर, दूधगंगा, तितरी, सूर्या, अप्पर वर्धा, पेंच, मनार, सिद्धेश्वर, येलदरी, निम्न तेरणा, दुधना, अप्पर पैनगंगा, मांजरा, नांदूर मधमेश्वर, लेंडी, खडकवासला, इंडियाडोह, पूर्णा, मुळा, काळमावाडी, गिरणा, घोड, सुधी आदी प्रकल्पांच्या कालव्यांतून वाहणारे पाणी आजही शंकररावांच्या कार्याची गाणी गाते. यामुळे त्यांना आधुनिक भगिरथ म्हणूनही ओळखले जाते. विशेषतः महाराष्ट्राच्या जलसंस्कृतीचे जनक म्हणूनही त्यांचा गौरव केला जातो.

पैठणचा जायकवाडी प्रकल्प होऊ नये म्हणून विरोधकांनी अगदी रान पेटवले होते. त्यांनी शंकररावांच्या खुनाचाही प्रयत्न केला होता. पण विरोधकांच्या गळी आपले विचार उतरवून व शक्य नसेल तर त्यांचा रोष पत्करून त्यांनी नाथसागर अस्तित्वात आणला. आज या प्रकल्पामुळे मराठवाड्यातील प्रमुख क्षेत्राची तहान भागवली जाते.

**प्रकल्पांचा शास्त्रशुद्ध अभ्यास**

शंकरराव चव्हाण यांच्या दूरदृष्टीमुळेच राज्यातील सिंचन प्रकल्पांना गती मिळाली. जायकवाडी, विष्णुपुरी इसापूर, मनार, सिद्धेश्वर, येलदरी, दुधना, अप्पर पैनगंगा, मांजरा, पूर्णा अशा कितीतरी प्रकल्पांच्या उभारणीत त्यांचे मोलाचे योगदान राहिले. किंबहुना यासाठी जे भगीरथ प्रयत्न करावे लागले, त्यामुळेच त्यांना आधुनिक भगीरथ असे म्हटले जाते. केवळ मराठवाडाच नाही तर विदर्भ व कोकणासारख्या डोंगराळ भागातही पाटबंधारे योजना कशा राबवता येतील, याचा शास्त्रशुद्ध अभ्यास शंकररावांनी केला होता. नर्मदेच्या पाण्यावर महाराष्ट्राचा पहिला हक्क असल्याचे शंकरराव चव्हाण यांनीच पहिल्यांदा पटवून दिले होते.

शंकरराव चव्हाण प्रगल्भ शहाणपण व उच्च नैतिक मूल्ये असणारे एक अंतर्ज्ञानी नेते होते. त्यांनी महाराष्ट्राला एक प्रगतीशील राज्य म्हणून घडवण्यात मोठे योगदान दिले.

(उर्वरीत भाग पुढील अंकी)

●●●●●●●●●

---

# यश म्हणजे काय..?

*तहान ज्याला लाटेची असते*
*थेंबाने त्याच पोट भरत नाही*
*हरणार तो अनेकदा, पण*
*जिंकल्याशिवाय रहाणार नाही*

ही म्हण सर्वांनी ऐकलेली आहे. यश म्हणजे काय तर एखादी गोष्ट ठरवून मिळवणे. आपण ठरवलेले धैर्य पूर्ण करणे म्हणजे यश मिळवणे होय. यश नेहमी वैयक्तिक असते. आपल्याला किंवा प्रत्येकाला वेळ ही सारखीच मिळत असते. पण मिळालेल्या वेळेचा जो योग्य वापर करतो तोच यशस्वी होतो.

जेव्हा तुम्ही तुमचे ध्येय, उद्दिष्ट गाठता तेव्हा यश मिळते. जे यशस्वी आहेत त्यांनी त्यांच्या जीवनात आणि करिअरमध्ये त्यांच्या सर्वात मोठी इच्छा साध्य करण्यासाठी काम केलेल असते किंवा सध्या ते त्या क्षेत्रात कार्यरत असेलही पण यशाचा अर्थ काय याविषयी व्यक्तींना अनेकदा भिन्न समज असतात.

यश ही अशी गोष्ट आहे की ती केवळ आपली आपणच अनुभवू शकतो आणि जर आपल्याला जगाला आपला आत्मविश्वास सिद्ध करावयाची गरज भासत असेल तर याचा अर्थ आपल्यात आत्मविश्वास नाही. कारण एखादी गोष्ट सिद्ध करण्याची किंवा यश म्हणजे काय हे समजून घेताना माणसाच्या मानसिकतेचे दोन प्रकार समजून घ्यावे लागेल.

जिथे यशाची वृत्ती आणि पराभूतीची किंवा पराभवाची भीती असते. मनासारखे यश मिळणे किंवा कितीही प्रयत्न करूनही अपयश पदरी आले तरीही जो मनातून ठरवतो तो सतत विजेताच रहातो. तो विजेता स्वतःला मानतो. जर वृत्ती पराभूतीची असेल तर कितीही यश मिळवले तरीही अशी माणसे स्वतःला पराभूतच समजतात. कधीही आनंदी होत नाही. समाधानी होत नाही. स्वतः चांगली काम करत नाही. इतरांवर प्रेम करू शकत नाही. इतरांच्या कामी पडत नाहीं.



**सौ. चैताली संगोपाल वरघट**
**मूर्तिजापूर, जि. अकोला.**
**9834583685**

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी काय करायला हवे. तर केवळ आपण परीक्षेत चांगले मार्क्स मिळवून, चांगली नोकरी मिळणे, किंवा स्वतःच्या बळावर भरपूर पैसे मिळवने असं म्हणता येत नाहीं. नोकरीं, पैसे, चांगले मार्कस म्हणजे खरं यश नसतं. यश ही वृत्ती आहे. ती पास, नापास, मार्क पैसे यावर अवलंबून नसते. जीवनातील यश आणि शाळेतलं यश याचा काही संबंध नसतो.

तुम्ही भरपूर शिकले. भरपूर पैसा कमावला. स्वतः जवळ गाडी, बंगला, सर्व येशो आराम असूनही बरीच माणसे हें समाधानी दिसून येत नाहीं.

असं का तर त्यांची इतरांबरोबर स्पर्धा सुरु असते. इतरांकडे ज्या सुखसुविधा आहे त्या आपल्याकडे ही असावं. ही भावना मनाला समाधानी राहू देत नाहीं. सतत मनात इतरांना घेऊन पुढे जाण्याची पैज लागलेली असते. मात्र आपण जे काम आपल्याला मनापासून करायला आवडते ते काम करत असतांना जो आनंद मिळतो. जे समाधान मिळते, ते म्हणजे आपले यश आहे. मग ते शिक्षणाबद्दल असू शकते, निवडलेल्या बिझनेसबद्दल किंवा साहित्य क्षेत्र अशा बऱ्याच क्षेत्राचा उल्लेख आपण करू शकतो.

आपल्या आवडीनुसार, आपल्या इच्छेनुसार आपण कार्य करत आहोत आणि त्यात मिळणार यश आपल्यासाठी खूप महत्वाच ठरते. पण आपल्याला न आवडत्या एखादया क्षेत्रात जेव्हा पदार्पण करतो तेव्हा त्यामध्ये मिळालेलं यश हे आपल्याला समाधानकारक ठरत नाही. आपल्याला त्यामध्ये कितीही यश मिळालं तरी सुद्धा आपण आनंदी राहत नाही.

बरेच विद्यार्थी दहावी बारावी मध्ये ९८ टक्के गुण घेऊन पास होतात मात्र म्हणाव तसे आनंदात दिसत नाही. बरेच विद्यार्थी आत्महत्या करतात. आत्महत्या करण्याच कारण म्हणजे कमी मार्क्स किंवा जास्त मार्क असे होऊच शकत नाही. कोणी तरी आपल्यापेक्षा पुढे गेलेलं आहे. किंवा या पेक्षा वेगळं ही कारण असू शकते. जीवनात जिद्द संयम आणि प्रामाणिकपणा असेल तर आपले अस्तित्व कोणी संपवू शकत नाही. पण नेमकं यश म्हणजे काय त्यांना हेच कळत नाही.

यश या मध्ये आपण आपला विचार करायला हवा. आपली तुलना इतरांबरोबर करता कामा नये. आपली आवड वेगळी इतरांची आवड वेगळी हे प्रथम स्वतःला समजून सांगता आले पाहिजे. आपण आपल्या क्षेत्रात आपल्या वेगानुसार पुढे जाता आलं पाहिजे.

आपला मित्र दुसऱ्या क्षेत्रामध्ये भरपूर पैसा कमवत आहे म्हणून आपणही त्या क्षेत्रात जाणार हे योग्य नाही. कारण आपला मित्र ज्या क्षेत्रात काम करतो तो त्याच्या आवडीनुसार काम करतो त्याला ते क्षेत्र आवडते म्हणूनच तर भरपूर पैसा कमवत आहे, यश मिळवत आहे. हे अगोदर आपल्याला समजलं पाहिजे.

आपण आपल्या आवडत्या क्षेत्रात जेव्हा काम करतो त्यावेळी आपला आनंद हा द्विगुणित असतो आणि आपल्या कामाचा वेग सुद्धा यामुळे आपल्या कामात नीटनेटकेपणा येतो. आपल्या कर्माचा, आपल्या कार्याचा आलेख हा वाढत जातो. आपण यशाचा आपल्या प्रगतीचा विचार सुद्धा केला नाही तरी सुद्धा नकळत आपल्या वाटेला यश येते. सतत आपल्याला आवडणाऱ्या गोष्टीविषयी आवडणाऱ्या क्षेत्रांविषयी शिकत राहिलं तर आपल्या कामांमध्ये नीटनेटकेपणा कामामध्ये स्पीड सुद्धा येते.

आपण आपल्या कामाच्या क्षेत्राशी व इतरांशी आपल्याला जुळून घेता येते. बऱ्याच गोष्टी शिकताना त्रास होत नाही. म्हणून सतत आपल्याला जे आवडते जे कराव वाटते. मनापासून ते आपण केलं पाहिजे आपल्या आयुष्याचे निर्णय आपण स्वतः घेतले पाहिजे. आपण इतरांच मार्गदर्शन घ्याव मात्र निर्णय हा आपलाच असला पाहिजे. त्या निर्णयावर आपण ठाम असल पाहिजे. 'यश' आपल्यापासून दूर राहणार नाही तर धावत आपल्या जवळ येईल. सवडीने नव्हे तर आवडीने आवडणारे काम केले पाहिजे.

***संघर्ष सुद्धा त्यांनाच निवडतो***
***ज्यांच्यात लढण्याची ताकद असते***
***जे संघर्षाला घाबरत नाही***
***त्यांच्याच वाटेला 'यश' येते.***

●●●●●●●●●

---




**स्नेहल राऊत**
**सहाय्यक पोलिस निरीक्षक**
**अरोली, जिल्हा नागपूर. ९९२२३११०८५**

बाबा, आज आपण जाऊन पूर्ण एक वर्ष झाले. मला अजूनही तो काळा दिवस आठवतो. बाबा जी गाडी चालवताना आपला अपघात झालाना, त्याची ती गोष्ट सुद्धा आठवते. ऑफिसला जाण्याकरता तुमच्यासाठी एक दुचाकी घेण्याचे ठरले आम्ही दोघे भावंडे लहान असताना सुद्धा तुम्ही वाहन पसंतीमध्ये आमचा विचार घेतला.

मी म्हणजे आपला स्पीड बाईकच्या विचारांचा आणि आपल्या छोटीने सांगितले, बाबा मोपेड घ्या सर्वांना कामात येईल. त्यावरून तुम्ही मोपेड विकत घेतली. आणि त्याच दिवशी शोरुममधून एक हेल्मेट सुद्धा मिळणार होते. तेव्हाही तुम्ही आम्हाला पसंतीचा रंग विचारला तर त्यावेळेस माझा पसंतीचा रंग तुम्ही निवडला तो म्हाजे काळा आणि हे सुद्धा मला चांगले आठवते. त्याच दिवशी तुम्ही हेल्मेटवर मागील बाजूस पांढऱ्या रेडीयमने 'Sefty for me & my Family' असे लिहून घेतले.

बाबा तुम्ही नियमाचे पालानकर्ते होता....आपण कधीही नियम मोडल्याचे मी पाहिले नाही. पण कोणास ठाऊक त्या दिवशी....! मला आठवते त्या दिवशी सकाळचे १० वाजले होते. तुमची ऑफिसला जाण्याची घाई, आई स्वयंपाक घरात टिफीन पॅक करत होती. छोटी आणि मी शाळेत जाण्याच्या तयारीत...तेवढ्यात आपल्याला कॉल येतो, तुम्ही तो कॉल रिसिव्ह करता आणि घाईघाईत आईला आवाज देऊन टिफीन घेऊन बोलवता.

काहीतरी महत्वाचे काम असल्याने टिफीन, बॅग घेऊन गाडीची चावी घेऊन ऑफिसकरीता निघता निघता मला आवाज देऊन, जातो म्हणून सांगता आणि त्याच वेळेस आपल्या हॉलमधल्या टेबलवरील हेल्मेटकडे माझी नजर जाते. मी लगेच ते हेल्मेट घेऊन गेटकडे बाबा..... बाबा म्हणून धावतो... परंतु मी गेटजवळ पोहचेपर्यंत तुम्ही पुढे गाडीने निघून गेले होते. ते म्हणजे बाबा, तुम्ही पुन्हा कधीही न परत येण्याकरीता.....

त्या दिवशी बाबा तुम्ही घरून ऑफिसकरिता गेले आणि काही मिनिटांनी आईला कॉल आला की आपल्या गाडीचा अपघात झाला आणि तुमच्या डोक्याला मार लागून तुमचा जागीच मृत्यू झाला. त्याच वेळेस आईने मोठ्याने हंबरडा फोडला, छोटी रडत रडत आईला बिलगली आणि मी? मी त्या हेल्मेटला कवटाळून बसलो..! बाबा तुम्ही आम्हाला पोरक करून निघून गेलात हो. बाबा तुम्ही गेलात आणि कुटुंबाचा जसा कणाच मोडला. बाबा तुम्ही होता तेव्हा आम्हाला कधी मागे वळून बघावेच लागले नाही, की काही गोष्टींचा विचार करावा लागला नाही. परंतु आता ...... काल परवाच घरभाडे थकल्याने आपले घरमालक येऊन घर खाली करण्याची तंबी देऊन गेले.

छोटीचे त्या इंग्लिश स्कूलमधून नाव काढून, मनपाच्या शाळेत नाव टाकले आणि मी पण आता एका कपड्यांच्या दुकानात पार्टटाईम काम करून आईला हातभार लावतो आहे. बाबा मला माफ करा हो, कारण तुमचे स्वप्न होते की आपल्या सस्याला डॉक्टर करायचे, पण बाबा आता ते माझ्याकडून शक्य होणार नाही. कारण मी सर्व क्लास बंद करून रात्र शाळेत नाव टाकले आहे. परंतु बाबा मी हेही वचन देतो, मी डॉक्टर नाही झालो तरी आपल्या छोटीला मात्र डॉक्टर करणार! त्या करिता मी काहीही काबाड कष्ट करणार...

बाबा आईने कधी घराचा उंबरठा ओलांडला नव्हता, पण हे सांगताना मला खूप दुःख होत आहे की आता मात्र आई दोन तीन घरच्या पोळीभाजी आणि धुनी भांडी करते. आम्ही मिळालेल्या पैशातून आपले कसेबसे घर चालवत आहे. बाबा घरात खूप असुरक्षित वाटते तेव्हा, तुम्ही सांगितलेल्या गोष्टी मी आठवतो आणि स्वतः ला सांभाळण्याचा प्रयत्न करतो.बाबा, तुम्ही त्या दिवशी हेल्मेट परिधान केले असते तर!... सदैव याच प्रश्नात जीव कासावीस होतो. बाबा सदैव फक्त तुमच्याच आठवणीत..!

●●●●●●●●●

---

## नरकासुरांचा नाश करण्या श्रीकृष्णा पुन्हा अवतार घे!!

**वाचक लिहितात**

दिवाळीचा दुसरा दिवस म्हणजे नरक चतुर्दशी. नरकासुर दुष्ट प्रवृत्तीचा असुर होता. तो सर्वांना त्रास द्यायचा. देव, गंधर्व, ऋषी, मानव कुणीही यातून सुटले नाहीत . त्यामुळे त्याला वशिष्ठ ऋषींनी शाप दिला की, तुझा मृत्यू विष्णूच्या हाताने होईल, शापामुळे नरकासुराला मृत्यूची भीती वाटू लागली. त्याने घनघोर तप केले, ब्रह्मदेव प्रसन्न झाले आणि त्याला कशाने ही मृत्यू येणार नाही असा वर दिला.

या वरामुळे नरकासुर उन्मत्त झाला. त्याने खूप उच्छाद मांडला. अनेक राज्यांवर आक्रमण केले, युद्ध केले, त्यांच्या राण्या, राजकन्या, अनेक स्त्रियांचे अपहरण करून त्यांना एका पहाडावर नेऊन कैद करून ठेवले. जवळपास 16 हजार स्त्रियांचे त्याने अपहरण केले. भोवती अग्निजल यांच संरक्षण कवच म्हणजे तटबंदी तयार केली.

त्याच्या या भयंकर त्रासाने देव, ऋषी, मानव हे सर्व कृष्णाकडे गेले, त्याला नरकासुराचा नाश करण्याची प्रार्थना केली. कृष्णाने गरुड वाहन घेऊन नरकासुरासी युद्ध करून त्याचा वध केला. त्याचे दोन तुकडे केले आणि कैदेतल्या स्त्रियांना सोडवून आणले. या स्त्रियांना समाजात सन्मानाचे स्थान मिळावे या उद्देशाने श्रीकृष्णाने त्यांच्याशी लग्न केले. म्हणून नरक चतुर्दशी दिवाळीत साजरी केली जाते.

आज महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशभरात असलेल्या दुष्ट प्रवृत्तीच्या नरकासुरांनी उच्छाद मांडला आहे. एकही दिवस जात नाही की महिलांवरील अत्याचाराची बातमी ऐकायला मिळाली नाही. तो नरकासुर एकच होता पण आज जागोजागी त्याची पिल्लावळ जन्माला आली आहे. हे नराधम स्त्रियांवर केवळ अत्याचारच करत नाही तर क्रौर्याची परिसीमा ही ओलांडत आहेत. ऐकवल्याही जात नाही अशा अत्याचाराच्या घटना रोज घडतात आहे. नुकतीच बदलापूर, अकोला, पुणे इथल्या घटना झाल्या. कोवळ्या चिमूरड्यांचीही या नरकासुराच्या क्रौयार्तून सुटका नाही. नराधमांचे क्रौर्य ऐकतानाही अंगावर काटे येतात. संतापाने अंगाची लाही लाही होते. ही प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढते आहे. या नराधमांना कायद्याचाही धाक राहिलेला नाही. भौतिक वाद, चंगळ वाद, दिवस रात्र मोबाईल वरील घाणेरडे व्हिडिओ यामुळे ही प्रवृत्ती दिवसेंदिवस फोफावत आहे.

सरकारचे यावर नियंत्रण राहिलेले दिसत नाही. किंवा गांभीर्यही दिसत नाही. अशा परिस्थितीत महिलांनी घराबाहेर कसे पडावे? शिक्षण, नोकरी, काम कशी करावी? चिमुकल्यांना शाळेत सोडताना पालकांची होणारी घालमेल कशी थांबवावी? कुणावर विश्वास ठेवावा? देवा !आता तुझाच धावा! श्रीकृष्णा त्यावेळी जसं तू त्या नरकासुरांचा वध केलास तसा आताही आमच्यासाठी धावत ये, पुन्हा अवतार घे आणि या नीच नराधमांचा, असंख्य नरकासुरांचा तू नाश कर. धाव कृष्णा धाव. आणि सोडव आम्हाला. मिळू दे आम्हाला स्वातंत्र्य, आनंद, सन्मान, उजळू दे दिव्यांची आरास, होऊ दे दिवाळी साजरी. खरे तर आम्हीही चुकलोच, आम्ही आमच्या मुलींना लहानपणापासून जर लाठीकाठी, स्व-संरक्षण प्रशिक्षण दिलं असतं तर आमच्यातली शक्ती ही या नरकासुरांचा नाश करू शकली असती. साधनेचे बळ दिले असते, तर खंबीरपणे यांचा प्रतिकार करता आला असता. धडा शिकलो आम्ही, आता नाही चुकणार देवा.

■ **सौ. माधवी पत्की, नागपूर.**

---

## दिपमालिका दारोदारी

**दि**-वाळीच्या दिवसात
दिवे लावू अंगणात ।

**प**-रसात झाडांवर
विद्युत काजवा बागेत ॥

**मा**-ळ फुलांची सजवू ।
लक्ष्मी श्रीहरी बसवू ॥

**लि**-न होऊ भक्ती भावे ।
लक्ष्मीकलशा सजवू ॥

**का**-जव्यांची झगमग ।
जिकडे तिकडे लगबग ॥

**दा**-री रांगोळी काढुया ।
अंगण रंगवुनिया ॥

**रो**-षणाई लाल निळी ।
हिरवे फुले पिवळी ॥

**दा**-री उधळू उल्हासे ।
प्रेमानंदे हर्षोल्हासे ॥
**री**-त चालवू फुलवू ।
फटाके छान उडवू ॥



**: रचनाकार :**
**स्वरचैतन्य डॉ. मिलिंद इंदूरकर (मनवा) नागपूर**
**९५५२६०७६४६**

---

# डायबिटीजच्या रुग्णांनी कोणती फळे खाऊ नयेत?




मधुमेह किंवा डायबिटीज रुग्णांचा आहार संतुलित असावा लागतो.फळात सी विटामिन्स आणि फायबर असल्याने फळे चांगली असली तर काही फळांना डायबिटीज पेशंट खाऊ शकत नाहीत, त्यामुळे त्यांची रक्तातील साखर वाढू शकते.

या आजारात शुगर नियंत्रणाबाहेर गेली तर अन्य आजार होतात. डायबिटीज टाइप १ आणि टाइप २ अशा दोन प्रकारचा असतो. या आजाराच्या लक्षणात वारंवार तहान लागणे, वारंवार लघवीला जाणे, आणि थकवा तसेच धुरकट दिसू लागते.

डायबिटीज आजारात आहारावर लक्ष ठेवावे लागत असते. या आजारावर उपचार नाहीत म्हणजे केवळ आहार आणि व्यायामाच्या मदतीने यावर उपचार करता येतो. डॉक्टरकडून सल्ला घेऊन आहारात फळांचा समावेश करावा लागतो. साखर जादा असणारी फळे शक्यतो खाऊच नयेत.

**केळ** – केळात कार्बोहाइड्रेट आणि शर्करा जास्त असते. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. त्यामुळे केळी अजिबात खाऊ नयेत हवा तर तुमच्या फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घेऊ शकता

**द्राक्षे** – द्राक्षात देखील नैसर्गिक रित्या साखरेचे प्रमाण जादा असते. त्याचा ग्लाइसेमिक इंडेक्स देखील जास्त असतो. त्यामुळे ब्लड शुगर वाढू शकते. त्यामुळे मधुमेहींनी द्राक्षं खावू नयेत

**कलिंगड** –
कलिंगडात साखरेचे प्रमाण जास्त असल्याने कलिंगड कमी खावे, शुगर असलेल्यांनी कलिंगड खाऊच नयेत अन्यथा साखरेचे प्रमाण वाढू शकते.

**ड्राय फ्रूट्स** – मणूके, खजूर, अंजीर या ड्रायफ्रुट्स मध्ये साखर जास्त प्रमाणाक असते. त्यामुळे डायबिटीसवाल्यानी सुकामेवा खाऊ नये. चिकू, सीताफळं आणि आंबे ही फळं अधिक साखर असलेली असतात. त्यामुळे ती खाऊच नयेत आपल्या डॉक्टरांना विचारुनच आपला आहार निश्चित करावा.तसेच संतुलित आहार आणि व्यायाम योग्य जीवनशैलीचे पालन केल्याने डायबिटीज नियंत्रित राहतो.

●●●●●●●

---

## अशोकायन

### दिवाळीचा संकल्प

**दिवाळीच्या स्वागताला**
**रंगवा घराच्या भिंती**
**पण गरीबाच्या झोपडीतही**
**लावजा एक पणती ...**

**तुमच्या घरात असू द्या**
**पंचपक्वांनांची रेलचेल**
**पण आठवणीने द्या जिथे**
**फोडणीलाही नाही तेल..**

**कपड्यालत्यांची खरेदी**
**करा तुम्ही आनंदाने**
**पण निराधारांनाही द्या**
**दोन कपडे प्रेमाने..**

**आप्तेष्टांना खुशाल घाला**
**तुम्ही आग्रहाने खाऊ**
**उपाशीपोटी व्यक्तिलाही**
**भाऊ, दोन घास देऊ...**

**अंधकार मनातील**
**ज्या दिवशी मिटेल**
**तोच खरा दिवाळीचा**
**पावन पर्व असेल ..**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

# एचडीएफसी बँकेने नागरिकांना डिजिटल अरेस्ट फ्रॉडपासून सावधान करण्यासाठी दिला महत्त्वपूर्ण संदेश

**महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :**
मुंबई, ऑक्टोबर , २०२४: एचडीएफसी बँक या भारतातील सर्वात मोठ्या खाजगी क्षेत्र बँकेने ग्राहकांना डिजिटल अरेस्ट फ्रॉडपासून सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे, ज्यामागे अशा फसवणूकीबाबत जागरूकतेचा अधिक प्रसार करण्याचा मनसुबा आहे. डिजिटल अरेस्ट घोटाळ्यामध्ये घोटाळेबाज कायदा अंमलबजावणी किंवा शासकीय अधिकारी असल्याचा दावा करत व्यक्ती किंवा व्यवसायांना लक्ष्य करतात. अशा फसवणूकीला बळी पडलेल्या व्यक्तींना बेकायदेशीर कर चोरी, नियामक उल्लंघन किंवा आर्थिक गैरवर्तनासाठी डिजिटल अरेस्ट वॉरंटची धमकी दिली जाते. घोटाळेबाज डिजिटल अरेस्ट वॉरंट टाळण्यासाठी 'सेटलमेंट फी' किंवा 'दंड'च्या स्वरूपात पैसे मागतात. पैसे दिल्यानंतर घोटाळेबाज त्यांच्या ओळखीचा कोणताच पुरावा न ठेवता गायब होतात. फसवणूक झालेल्या व्यक्तींचे आर्थिक नुकसान होते, तसेच घोटाळेबाजांना वैयक्तिक माहिती सांगितली असल्यामुळे कधी-कधी ओळख चोरी होण्याची शक्यता वाढते. या फसवणूकीबाबत सावध करत एचडीएफसी बँकेच्या क्रेडिट इंटेलिजन्स अँड कंट्रोलचे वरिष्ठ कार्यकारी उपाध्यक्ष श्री. मनिष अग्रवाल म्हणाले, 'घोटाळेबाज प्रत्यक्ष ग्राहकांच्या भावनांना लक्ष्य करत आहेत. व्यक्तींना घोटाळेबाजांकडून कायदा अंमलबजावणी अधिकारी असल्याचा दाबा करणारा कॉल किंवा संदेश येतो तेव्हा नेहमी योग्य माध्यमाच्या माध्यमातून स्वतंत्रपणे शासकीय / कायदा अंमलबजावणी अधिकारीशी संपर्क साधत त्यांच्या ओळखीबाबत पुष्टी करा. अशा फसवणूकीच्या पद्धतींबाबत सतर्क व जागरूक राहणे अशा घोटाळ्यांना बळी पडण्याला प्रतिबंध करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. डिजिटल अरेस्ट फ्रॉडपासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी टिप्स वास्तविक सरकारी अधिकारी किंवा कायदा अंमलबजावणी एजन्सी कधीच पेमेंट करण्यासाठी किंवा बँकिंग माहिती सांगण्यासाठी विचारणार नाही. घोटाळेबाज तुम्हाला काहीच विचार न करता त्वरित कृती करण्यासाठी आपत्कालीन भावना निर्माण करतात. कोणालाही केवायसी माहिती, बँक माहिती जसे युजर आयडी पासवर्ड, कार्डची माहिती, सीव्हीव्ही, ओटीपी किंवा पिन नंबर अशी संवदेनशील माहिती शेअर करू नका.

नेहमी स्वतंत्रपणे सरकारी अधिकारी किंवा कायदा अंमलबजावणी एजन्सीशी संपर्क साधत अधिकारीच्या ओळखीचे सत्यापन करा. कागदपत्रांमधील त्रुटींकडे लक्ष द्या आणि संशयास्पद लिंक्सवर क्लिक करणे टाळा. अशा संशयास्पद फसवणूक करणाऱ्या संवादाबाबत टेलिकम्युनिकेशन विभागाच्या चक्षू ऑक्टोबर महिना जागतिक स्तरावर व भारतात नॅशनल सायबर सिक्युरिटी अवेअरनेस मंथ (एनसीएसएएम) म्हणून साजरा केला जातो, ज्यामागे व्यक्तींमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकतेचा प्रसार करण्याचा उद्देश आहे. यंदा, मोहिमेची थीम 'सायबर सुरक्षित भारत' आहे, जी ऑनलाइन फसवणूकांबाबत सावधगिरी बाळगण्याच्या, तसेच सुरक्षित बँकिंग पद्धतींचे पालन करण्याच्या महत्त्वावर भर देते. व्यक्तींची कोणतीही ऑनलाइन फसवणूक झाल्यास भविष्यात अधिक नुकसानांपासून सुरक्षिततेसाठी कार्डस्/यूपीआय/नेट बँकिंग असे पेमेंट माध्यम ब्लॉक करण्याकरिता बँकेकडे अनधिकृत व्यवहारांबाबत त्वरित तक्रार करावी. ग्राहकांनी मिनिस्ट्री ऑफ होम अफेअर्स (एमएचए)ने सुरू केलेला हेल्पलाइन क्रमांक १९३० वर संपर्क साधत देखील तक्रार करावी.

# स्त्री ही कुटुंबाची स्वामिनी: स्वामी दयानंदजी!

## (स्वामी दयानंद सरस्वती पुण्यस्मृती विशेष)



**श्री एन. के. कुमार जी. गुरुजी**
पोटेगावरोड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप-९४२३७१४८८३

स्वामी दयानंद सरस्वती हे एका युगपुरूषाचे नाव आहे. एकोणीसाव्या शतकातली ती एक महान व्यक्ती नव्हे, शक्ती होती. ते एक महान धर्मसुधारक व समाजसुधारक होते. अंधारात सापडलेल्या व दिशा हरवून बसलेल्या समाजाला व देशाला आधार असतो तो केवळ समोरच्या क्षीतिजावर चमकणाऱ्या ध्रुवताऱ्याचा. स्वामी दयानंद सरस्वतींनी धर्मसुधारणेच्या कार्याची प्रेरणा बायो समाजाकडून घेतली होती. प्रारंभीच्या काळात त्यांच्या सहकार्यानेच धर्मप्रचाराचे व धर्मानुधारणेचे कार्य करीत. तथापि पुढे त्यांनी आपला वेगळा संप्रदाय निर्माण करण्याचे ठरविले. त्यानुसार त्यांनी मुंबई येथे दि.१० एप्रिल १८७५ रोजी आर्य समाजाची स्थापना केली. आर्य समाजाने धार्मिक व सामाजिक सुधारणांबरोबरच शैक्षणिक सुधारणा केल्या. वेदांचे शिक्षण घेणारा तरुण हा निर्भय, तेजस्वी आणि काळाचे आव्हान स्वीकारणारा केव्हा होईल? असे स्वानी दयानंदाना वाटत होते. उत्तर भारतात त्यांनी चालविलेले चोक्षण प्रसाद कार्य अतिशय महत्वपूर्ण ठरले. समाजाच्या सर्व घटकाना एका सूत्रामध्ये बांधण्याकरिता समान भाषा आवश्यक आहे, अशी त्यांची धारणा होती. हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचे स्थान मिळावे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. स्वामीजींनी ख्रिस्ती आणि मुसलमान धर्मात गेलेल्या लोकांचे शुद्धीकरण करून त्यांना हिंदू केले. महर्षी दयानंदांचा जन्म गुजरातमधील टंकारा या गावी दि.१२ फेब्रुवारी १८२४ रोजी झाला. त्यांचे मूळनाव मूळशंकर अंबाशंकर तिवारी होते. त्यांचे आई-वडील औदिच्य ब्राह्मण होते. समाजात त्यांना सन्मानाचे स्थान होते. घरची आर्थिक परिस्थिती चांगली होती. घराण्यात ज्ञानाची परंपरा होती. मूळशंकर हा कुशाग्र बुद्धीचा संवेदनशील मुलगा होता. वयाच्या चौदाव्या वर्षी यजुर्वेद त्यांना पूर्ण कंठस्थ होता. तीन प्रसंग असे घडले की त्यामुळे त्यांचे मन अस्वस्थ झाले. पहिला प्रसंग शिवरात्रीच्या दिवशी घडला. शिवमंदिरात व्रत, उपवास करत असता रात्रीच्या सामसूम झालेल्या क्षणी शिवपिंडीवर उंदीर चढला. त्याचा कुठलाच प्रतिकार पिंडीकडून होत नव्हता. वडिलांकडून भगवान शिवाबद्दल बरेच ऐकले होते, तसे होताना दिसले नाही. दुसरे, बहिणीचा मृत्यू व तिसरा प्रसंग चुलत्याचा मृत्यू होय. या प्रसंगांनी खुप दु:ख झाले. मलाही असेच मरण येईल का? मृत्यू काय आहे? तेही जाणणे आवश्यक वाटून मूलशंकरने एके दिवशी गृहत्याग केला व ते पुन्हा कधी घरी परतले नाही. लग्नाच्या बेडीतही अडकले नाही. एकदा शिवरात्री होती. वडील म्हणाले, मूलशंकर, आज सर्वांनी उपवास करायचा. रात्रभर देवळात जागायचे आणि शंकराच्या पिंडीची पूजा करायची. हे ऐकून मूलशंकरने उपवास केला. दिवस संपला, रात्र झाली. मूलशंकर आणि वडील शंकराच्या देवळात गेले. त्यांनी पूजा केली, पिंडीवर फुले वाहिले. तांदळाच्या अक्षता वाहिल्या. रात्रीचे बारा वाजले. वडिलांना झोप येऊ लागली, पण मूलशंकर जागे राहिले. आपला उपवास निष्फळ होईल, या भीतीने ते झोपले नाही. देवळातल्या बिळांतून उंदीर बाहेर आले आणि शंकराच्या पिंडीभोवती फिरू लागले. ते पिंडीवरच्या अक्षता खाऊ लागले. हे दृश्य पाहून जी मूर्ती उंदरापासून स्वतःचे रक्षण करू शकत नाही, ती भक्तांचे संकटापासून रक्षण कशी काय करू शकेल? मूर्तीत काहीही सामर्थ्य नसते; तेव्हा मूर्तिपूजेलाही काही अर्थ नाही. अशा तऱ्हेचे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. त्या वेळेपासून त्यांच्या मनात धर्माविषयी जिज्ञासा जागृत झाली. परमेश्वराचे शाश्वत स्वरूप व धर्माचा खरा अर्थ जाणून घेण्याची ओढ त्यांना लागली. इ.स १८५७ च्या असफलतेपासून तर काँग्रेसच्या स्थापनेपर्यंत भारतीयांच्या हृदयामध्ये स्वातंत्र्यप्रेम जागृत ठेवण्याचे कार्य ज्या ज्या महापुरुषांनी केले, त्यापैकी स्वामी दयानंद हे एक होते. भारतात ब्रिटिशांना हाकलण्याकरिता सशस्त्रक्रांती हा एकमेव मार्ग आहे, अशी त्यांची पक्की खात्री होती. आर्यसमाज आणि गुरुकुल यांमध्ये राष्ट्रभक्ताना सशस्त्र क्रांतीकरिता प्रेरणा आणि प्रशिक्षण मिळत असे. स्वामी श्रद्धानंद, लाला लजपतराय आणि लाला हरदयाल आदी ब्रिटिशांना भारतातून हाकलण्याकरिता उघडपणे लढणारे नेते आर्यसमाजीच होते.

एकदा टंकारा नगरामध्ये कॉलराची साथ आली. त्या साथीमध्ये मूलशंकरची चौदा वर्षांची बहीण मरण पावली. या घटनेनंतर तीन वर्षांनी मूलशंकरच्या आवडत्या काकांचाही कॉलरामुळे मृत्यू झाला. मूलशंकरला याचा जबरदस्त धक्का बसला, जणू काही त्यांचे जीवन सर्वस्वच हरवले! कौटुंबिक बंधनाचा त्याग करावा, अशी मूलशंकरच्या मनात इच्छा निर्माण झाली. जीवन काय आहे? मृत्यू काय आहे? या प्रश्नांची उत्तरे सुयोग्य महात्म्याकडून समजवून घ्यावीत, असे त्यांना वाटत होते. या ध्येय प्राप्तीकरिता वयाच्या २१व्या वर्षीच त्यांनी घरदार सोडले. त्यांच्या घरातील वडीलधाऱ्या मंडळींनी त्यांच्या लग्नाचा चालविलेला विचार, हे त्यांच्या निर्णयास निमित्त झाले होते. भौतिक सुखाचा आनंद लुटण्यापेक्षा स्वत:ची आध्यात्मिक उन्नती करून घेणे, त्यांना अधिक महत्त्वाचे वाटले. त्यासाठी घरादाराचा त्याग करून गुरूचा शोध घेत फिरण्याचा निर्णय त्यांनी घेतला. गृहत्याग केल्यानंतर मूलशंकर अहमदाबाद, बड़ौदा, हरिद्वार, काशी, कानपूर या ठिकाणी गुरूच्या शोधार्थ जंगलातून व पहाडातूनसुद्धा प्रवास करीत राहिले, परंतु त्यांना योग्य गुरू मिळाला नाही. याच सुमारास त्याकाळचे प्रकांड पंडित आणि संन्यासी स्वामी पूर्णानंद यांची मूलशंकरशी भेट झाली. त्यांचे शिष्यत्व पत्करून मूळशंकरांनी संन्यास धर्माचा स्वीकार केला. संन्यास धर्माचा स्वीकार केल्यानंतर त्यांनी स्वामी दयानंद सरस्वती हे नाव धारण केले. पंधरा वर्षापर्यंत सर्वत्र भ्रमंती केल्यावर स्वामी पूर्ण शर्मा नामक साधूच्या म्हणण्यानुसार स्वामी दयानंद मधुरेस येऊन पोहोचले. त्या ठिकाणी त्यांनी स्वामी विरजानंद यांचे शिष्यत्व पत्करून त्यांच्याकडूनच वेद व इतर हिंदू धर्मग्रंथाचे ज्ञान घेतले. स्वामीजींना वेद सर्वश्रेष्ठ आणि पवित्र वाटत होते. मुख्य म्हणजे वेदांमध्ये मूर्तिपूजा नव्हती की उच्चनीच हा भाव नव्हता. वेदातील ज्ञान हे खरेखुरे ईश्वरीय ज्ञान आहे; पवित्र ज्ञान आहे. ते समाजाकरिता अत्यंत उपयुक्त आहे. अशी दयानंदांची अदा होती. म्हणूनच त्यानी वेदाकडे परत जा अशी भारतीयांना शिकवण दिली. आपल्या अस्खलित प्रवचनाद्वारे ते मूर्तिपूजा, जन्मजात उच्च-निचता,जातिभेद, जाचक रूढी, यज्ञांमध्ये केली जाणारी पशुहत्या यांच्यावर घणाघाती आघात करू लागले. इ.स. १८६९ मध्ये त्यांनी काशीच्या सनातनी ब्राह्मण पंडिताशी शास्त्रार्थावर वादविवाद केला, त्यामुळे त्यांचे नाव सर्वत्र गाजले. सत्यार्थ प्रकाश हा महान ग्रंथ म्हणजे स्वामी दयानंदांनी आपल्या समाजाला दिलेली अनमोल देणगी होय. या ग्रंथामध्ये पंधरा अध्याय असून त्यामध्ये वेदांचा सत्यार्थ दिलेला आहे. म्हणून या ग्रंथाला सत्यार्थ प्रकाश म्हटले आहे. हा ग्रंथ पूर्णपणे वेदांवर आधारलेला आहे. वेद भाष्य, संस्कार निधी, व्यवहार भानू इत्यादी ग्रंथसुद्धा त्यांनी लिहिले. सर्व मानव एक, सर्वांचा देव एक, सर्वांचा धर्म एक, पृथ्वी माता एक, हीच जीवनाची चतु:सूत्री आहे. स्त्रियांना शिक्षण दिले जात नाही, त्यांना अज्ञानात ठेवले जाते. हे भारताच्या अध:पतनाचे एक कारण आहे. ज्याप्रमाणे गाठोड्यात असलेल्या रत्नांचे प्रतिबिंब आरशात पडू शकत नाही, त्याप्रमाणे जोपर्यंत स्त्रिया पडदा पद्धतीसारख्या मूर्ख रुढीचे बंधन तोडत नाहीत तोपर्यंत त्यांची प्रगती होणे अशक्य आहे. त्यांनी हा पडदा फेकून दिला पाहिजे. सीता आणि सावित्री चिरस्मरणीय झाल्या. ते त्यांच्या सद्गुणांमुळे, त्यांच्या पडद्यामुळे नाही. स्त्रियांना समाजात सन्मानाचे स्थान मिळाले पाहिजे. स्त्री ही कुटुंबाची स्वामिनी असल्याने तिला तिचे अधिकार मिळाले पाहिजेत. हे त्यांचे विचार आजही प्रेरक वाटतात. अशा या महान युगपुरुषांनी दि.३० ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या नश्वर देहाचा त्याग करून अनंतात विलीन झाले.

!! त्यांचे पुण्यस्मरण करून त्यांना विनम्र अभिवादन !!

# गल्फ ऑइल प्रसिद्ध चाय पकोडा राइडसाठी सलग दुसऱ्या वर्षी नागपूरमध्ये दाखल




**इंडिया बाइक वीक आणि गल्फ यांची भागिदारी आणखी मजबूत, पेक्षा जास्त शहरांत राइड्स आयोजित करणार**

**महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :**
गल्फ ऑइल ल्युब्रिकंट्स इंडिया लिमिटेड या ल्युब्रिकंट्स इंडस्ट्रीमधील प्रवर्तक कंपनीला नागपूर येथे दुसऱ्या वार्षिक चाय-पकोडा राइडची घोषणा करताना अभिमान वाटत आहे. ही राइड इंडिया बाइक वीकसह (आयबीडब्ल्यू) २०२४ करण्यात आलेल्या भागिदारीचा क भाग आहे. गेल्या वर्षी मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर गल्फ ऑइल आयबीब्ल्यू या आशियातील प्रीमियर मोटरसायकलिंग फेस्टिवलची प्रमुख प्रायोजक आहे. या वर्षाच्या राइड परत एकदा मोटरसायकल्सचा थरार आणि रायडिंगप्रेमी समूहाचा उत्साह यांचा अनुभव देणाऱ्या असतील. २०२४ च्या उद्घाटनपर राइडमध्ये विविध प्रदेशांतील ८०० पेक्षा जास्त बायकर्स सहभागी झाले होते. रायडर्स डोंगरगाव टोल बुथ, नागपूर येथे जमा झाले व तिथून त्यांचा श्री सेलिब्रेशन्स व रिसॉर्टपर्यंतचा ५३ किमीचा प्रवास सुरू झाला. खुल्या रस्त्यावरचा हा प्रवास निसर्गरम्य होता. प्रवासादरम्यान सुरक्षेला सर्वोच्च महत्त्व देण्यात आले होते व सहभागींना प्रवासाच्या आधी सेफ्टी रायडिंग सत्राला हजेरी लावली, तर आयबीडब्ल्यू मार्शल्सनी रायडर्सच्या समूहाचे नेतृत्व करत प्रवास योग्य सुरक्षा व समन्वयाच्या मदतीने होईल याची काळजी घेतली. गल्फ ऑइलद्वारे सर्व रायडर्सना फ्लोरोसंट सेफ्टी जॅकेट्सही पुरवण्यात आली असून त्यातून सुरक्षिततेप्रती असलेली बांधिलकी दिसून आली. या कार्यक्रमाची सांगता एंड पॉइंटला गमतीशीर पुश अप्स आणि बर्पी चॅलेंजने करण्यात आली व त्यानं बायकर्स समूहाला नवा उत्साह मिळाला. गल्फ ऑइल ल्युब्रिकंट्स इंडिया लि. चे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रवी चावलायांनी गल्फच्या इंडिया बाइक वीकसह असलेल्या भागिदारीविषयी आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले, सलग दुसऱ्या वर्षी इंडिया बाइक वीकसह भागिदारी करून २०२४ मध्ये प्रसिद्ध चाय-पकोडा राइड सादर करताना आनंद होत आहे. या राइड्स भारतातील मोटरसायकलिंग समूहाचा उत्साह दर्शवणाऱ्या असून साहस, बंधूभाव आणि खुल्या रस्त्यांविषयी वाटणारं प्रेम हे सर्व त्यात प्रतिबिंबित झालं आहे. गल्फमध्ये आम्ही उच्च दर्जाची ल्युब्रिकंट्स आणि उत्पादने पुरवून देशभरातील बायकर्सचा रायडिंगचा अनुभव उंचावण्यासाठी बांधील आहोत. फक्त मशिनसाठी इंधन पुरवणे एवढीच आमची बांधिलकी नाही, तर मोटरसायकलिंग संस्कृतीला पुढे नेण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा देण्याचे आमचे ध्येय आहे. इंडिया बाइक वीकचे हे ११ वर्ष असून त्याद्वारे बायकर्सना कनेक्ट करण्यासाठी, आपले अनुभव शेयर करण्यासाठी, मोटरसायकलिंगविषयी आपले प्रेम सादर करण्यासाठी व्यासपीठ पुरवले जाते. चाय- पकोडा राइड्स बायकर्सना निसर्गरम्य रस्त्यांचा आनंद घेण्यासाठी व त्यादरम्यान भारतीय चहा व भजी यांचा आस्वाद घेण्याची परंपरा जपणारी आहे. गल्फ ऑइलचे अस्तित्व आणि या राइड्सना असलेला पाठिंबा एकंदर अनुभव उंचावणारा, देशभरातील रायडर्ससाठी अविस्मरणीय आठवणी देणारा आहे. इंडिया बाइक वीकमधील गल्फ ऑइलचा सहभाग ब्रँडची मोटरसायकलिंग समूहाप्रती असलेली बांधिलकी दर्शवणारा आहे. कंपनीची उच्च दर्जाच्या ल्युब्रिकंट्सची श्रेणी बायकर्सच्या अनोख्या मागण्या पूर्ण करणारी, सर्व प्रकारच्या प्रदेशांत सहज, प्रभावी राइड्ससाठी सक्षम आहे.

# आजचे राशिभविष्य

**मेष :** आज शेअर्स, लॉटरी, ब्रोकरेजमधून अचानक आर्थिक लाभ होईल. काही महत्त्वाचे काम पूर्ण होण्याची शक्यता आहे. बेरोजगारांना रोजगार मिळेल. काही शुभ कार्यात सहभागी व्हाल.

**वृषभ :** कला आणि अभिनयाच्या जगात तुम्ही मोठे यश मिळवाल. आज संपत्तीत वाढ होईल. धनाढ्य मित्राकडून सहकार्य मिळेल. व्यवसायात नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील.

**मिथुन :** व्यवसायाच्या ठिकाणी आग लागण्याची भीती राहील. राजकीय क्षेत्रातील अपयश हा अपमानाचा धडा ठरेल. त्यामुळे प्रत्येक पाऊल सावधगिरीने टाका. उगाच वाद घालू नका.

**कर्क :** नोकरीत पदोन्नतीसह महत्त्वाची जबाबदारी मिळेल. उद्योगधंद्यात नवीन सहकारी मिळतील. घरात चैनीच्या वस्तू आणतील. आज आर्थिक स्थितीत मोठे चढ-उतार होतील.

**सिंह :** काही जुन्या कोर्ट केसेसमधून दिलासा मिळेल. आज व्यवसायात चांगले उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. जोडीदाराकडून तुमच्या आवडीचे महागडे गिफ्ट मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** आज नोकरीचा शोध पूर्ण होण्याचे संकेत आहेत. कोणत्याही महत्त्वाच्या कामात येणारे अडथळे दूर होतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणा-यांना अधीनस्थ व्यक्तीकडून चांगली बातमी मिळेल.

**तुळ :** बाहेर फिरताना अचानक बिघडू शकते. पैशाच्या कमतरतेमुळे कोणतेही महत्त्वाचे काम विस्कळीत होऊ शकते. शेतीच्या कामात रस कमी राहील

**वृश्चिक :** आजच्या दिवसाची सुरुवात काही चांगल्या बातमीने होईल. उद्योगधंद्यात अधिक व्यस्तता राहील. सत्तेत असलेल्या व्यक्तीशी जवळीक वाढेल. व्यवसायातील अडथळे दूर होतील.

**धनु :** आज बोलण्यावर नियंत्रण ठेवा. अन्यथा मारामारी होऊ शकते. कामाच्या ठिकाणी अतिरिक्त जबाबदारीमुळे अडचण येऊ शकते. प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते.

**मकर :** नोकरीत उच्च अधिका-यांच्यानिकटतेचा लाभ मिळेल. आज उत्पन्नाचे नवीन मार्ग सापडतील. पाहुण्यांच्या आगमनामुळे घरगुती खर्चात वाढ होईल. संपत्तीच्या जुन्या वादातून सुटका मिळेल.

**कुंभ :** तुमची आर्थिक बाजू सुधारेल. पैशाशी संबंधित कामातील कोणताही अडथळा दूर होईल. व्यवसायात उत्पन्न वाढेल. नवीन प्रेमसंबंधांमध्ये पैसे आणि दागिने मिळण्याची शक्यता आहे.

**मीन :** आज जमिनीशी संबंधित कामात अडथळे येऊ शकतात. एखाद्या उद्योगाची कमान दुस-याकडे देण्याऐवजी त्याची जबाबदारी घ्या, अन्यथा नुकसान होऊ शकते.

# सुझुकीने हायाबुसाच्या १,०५६ गाड्या परत मागवल्या

**महासागर प्रतिनिधी, नवी दिल्ली दि. २९ :**
सुझुकी मोटरसायकल इंडियाने आज (२८ ऑक्टोबर) तांत्रिक बिघाडामुळे त्यांची सर्वात लोकप्रिय स्पोर्ट्स बाइक हायाबुसा परत मागवली आहे. हायाबुसाच्या थर्ड जनरेशन मॉडेलच्या फ्रंट ब्रेकमध्ये समस्या आल्याने त्यांनी रिकॉल जारी केल्याचे कंपनीने म्हटले आहे. या रिकॉलमध्ये १,०५६ युनिट्सचा समावेश आहे. हे मॉडेल २०२१ पासून भारतीय बाजारपेठेत विकले जात आहे आणि भारतातील सर्वात लोकप्रिय सुपरबाइक्सपैकी एक आहे. जपानी ऑटोमोबाईल कंपनीने नियामक फाइलिंगमध्ये ही माहिती दिली आहे. सुपरबाईक कावासाकी निन्जा -१०शी टक्कर देते. फ्रंट ब्रेकचा लीव्हर प्ले वाढल्याने अपघाताची शक्यता सुझुकीने मार्केट रेग्युलेटरला सांगितले की, भारतीय बाजारात विकल्या गेलेल्या हायाबुसाने फ्रंट ब्रेक लीव्हर प्ले वाढवला आहे, ज्यामुळे लीव्हर थ्रॉटल ग्रिपला स्पर्श करत आहे. यामुळे ब्रेकिंगचे अंतर वाढते. बाईकचा फ्रंट ब्रेक लेव्हल प्ले इतक्या प्रमाणात वाढू शकतो की लीव्हर हँडलबारला स्पर्श करू शकतो, ज्यामुळे अपघात होऊ शकतो.


**कंपनी सदोष भाग मोफत बदलून देईल**

सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रभावित ग्राहकांशी संपर्क साधेल. वाहनधारकांना सदोष भाग बदलण्याबाबत माहिती दिली जाईल. यासाठी ग्राहकांकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. ग्राहक कंपनीच्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊन त्यांची बाइक रिकॉलमध्ये समाविष्ट आहे की नाही हे देखील तपासू शकतात.

जर बाइक रिकॉलमध्ये समाविष्ट केली असेल, तर तुम्ही अपॉइंटमेंट बुक करू शकता. याआधी, मागील पिढीच्या सुझुकी हायाबुसाला ब्रेकिंगच्या समस्या होत्या, ज्या ब्रेम्बो स्टाइलमा कॅलिपर आणि १० मिमी मोठ्या डिस्कने निश्चित केल्या होत्या.

अद्ययावत मॉडेल गेल्या वर्षी लाँच करण्यात आले होते नवीन सुझुकी हायाबुसा गेल्या वर्षी तीन ड्युअल-टोनकलर पर्यायांमध्ये लॉन्च करण्यात आली होती ग्लास स्पार्कल ब्लॅकसह मेटॅलिक मॅट ब्लॅक नंबर २, कँडी डेअरिंग रेडसह मेटॅलिक थंडर ग्रे आणि पर्ल व्हिगोर ब्लूसह पर्ल ब्रिलियंट व्हाइट. यामध्ये असलेले एलईडी हेडलॅम्प, नवीन साइड मिरर, टर्न इंडिकेटर आणि पोझिशन लाइट्स याला प्रिमियम लुक देतात. यात १३४० ४-स्ट्रोक, इंधन-इंजेक्टेड,लिक्विड-कूल्ड, इनलाइन फोर इंजिन आहे.

# शब्दकोडे क्रमांक १९६०



**आडवे शब्द :-**
१) --- -- --- --- नाचरे मोरा नाच 'एक बालगीत
८) लोखंड गुळगुळीत करण्याचे हत्यार
१०) महिला
११) रानरेडा
१२) उगाच
१४) पारद
१७) कालवा
१८) शहर
२०) हिंमत, धैर्य
२२) दुसऱ्याच्या मनातील विचार ओळखणारा
२४) होकारच्या विरुद्ध
२५) वाद्य वाजविणारा
२६) कावळा
२७) समशेर
२९) विमान
३१) स्वाद
३२) गाय
३३) मगज
३५) पद्धत
३६) लहान मूल
३८) गवताचे पान
३९) नशा आणणारा एक पदार्थ
४०अ) अवघड, कडक
४१) मगरींचे अस्तित्व असलेला समुद्र
४४) ताडाच्या झाडीचा रस
४५) सरळ लांब वासा
४७) एक पालेभाजी
४८) सत्ता
५०) पर्वत
५१) युद्धाची गाणी
५५) छोटा पर्वत
५७) भारताचे चलन
५९) दोन मैलाचे अंतर
६०) लक्ष्मीचे एक नाव
६१) रुपेरी मुलामा
६४) कंटाळा आणणारी लाबंलचक बडबड, जाड दोरखंड
६५) वांग्याचा एक लोकप्रिय पदार्थ
६७) मज्जाव
६८) नेत्रकोणाने पाहणे
६९) धपाटा
७१) शंकर
७२) वाल्मिकीऋषींचे पहिले नाव
७३) ख्रिश्चनांचा प्रमुख सण
७४) देणारा
७५) चांदी
६७) सडेतोड उत्तर
७७) बारा वर्षाचा काळ

**उभे शब्द :-**
१) अनेक प्रकार
२) खंदक
३) एक सुगंधी पांढरे फूल
४) पोपट
५) संकट
६) अरण्य
७) जिवंत असे पर्यंत
८) अक्षरापुढची उभी रेघ
९) नक्कल करणारा
१३) हात
१४) पवित्र
१५) सीतेच्या वडिलांचे नाव
१६) कावळ्याचे ओरडणे
१९) सोन्याचा चागा
२१) कैफी
२२) मोगऱ्याची एक जात
२३) टपाल
२४) बाज विणण्याची सुती पट्टी
२५) व्यर्थ
२८) निकट
३०) शंभर
३१) छोटी लढाई
३४) कापडाला पडलेले भोक बुजविण्याची क्रिया
३७) वरवधूची मिरवणूक
३८) पैंजण
३९) अत्यंत अडचणीच्या वेळेला
४०) घराचा मागचा दरवाजा
४१) अग्नीचा कण
४३) गीत, गाणे
४६) राघव
४९) हिस्सेदार
५२) प्रजा
५३) युवती
५४) विशेष
५६) उणीव, न्यूनता
५८) विनंती, मागणी
५९) पराकाष्ठेचा लाभ
६२) वडील, जन्म देणारा
६३) वरपांगी
६५) खाद्य
६६) नुकसान
६७) साह्य
७०) हालचालीवर ठेवलेली नजर
७१) सदोदित
७२) गंध, मुक्काम
७३) मुलाची वा मुलीची मुलगी

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# श्री घंटीबाबांच्या यात्रेने वेधले दिग्रसकरांचे लक्ष

### भाविकांची दर्शनासाठी गर्दी

■ महासागर प्रतिनिधी,
**दिग्रस, दि. २९ :** दिग्रस शहराचे ग्रामदैवत, तसेच सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान घंटीबाबा यांच्या ७४ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्य श्री घंटीबाबा संस्थानच्या वतीने विविध धार्मिक, आरोग्य विषयक, सामाजिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांसह पालखी सोहळा, खंजेरी स्पर्धा व यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेला दिग्रससह तालुक्यातील नागरिकांची गर्दी होताना दिसत आहेत. श्री घंटीबाबा संस्थानपासून दुकानांची रांग लागली असून वाल्मिकपुऱ्यातील पुलापर्यंत दुकानांनी हा काबीज केला आहे. मोहनाबाई कन्या शाळेच्या प्रांगणात, तसेच भास्करवार लेआउट मध्ये विविध प्रकारचे पाळणे आले असून लोक तिथे गर्दी करताना दिसत आहेत. यामध्ये मोठा आकाश पाळणा, टोराटोरा, सल्याम्बो, ब्रेक डान्स, ड्रेगन ट्रेन, हवाई जहाज,



लहान मुलांसाठी विशेष म्हणजे बोटिंग आणि फुग्याची घसरगुंडी लक्ष वेधून घेत आहे. संपूर्ण परिवारासोबत आनंद घेण्यासाठी जादुई मायाजालाचे घरासह विविध प्रकारचे पाळणे येथे आले आहेत.

दीपावलीच्या पूर्वी सुरु झालेल्या या यात्रेला दिग्रसकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. दिग्रससह आजूबाजूच्या गावांतून लोक यात्रेचा आनंद घेण्यासाठी गर्दी करत आहेत. महिला या विविध आभूषणांच्या तसेच घरोपयोगी वस्तूंच्या, लहान मुले विविध प्रकारच्या खेळण्यांच्या, तसेच इतर वस्तूंच्या खरेदीसाठी दुकानांत गर्दी दिसत आहेत. या गर्दीत पाकीटमारी, अंगावरील दागिने, मोबाइल चोरीचे अनुचित प्रकार घडू, नये म्हणून पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. यात्रेचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन श्री घंटीबाबा संस्थानचे अध्यक्ष डॉ. प्रदीप मेहता यांनी केले आहे. बोलक्या बाहुल्यांच्या खेळ पहिल्यांदाच यात्रेत या वर्षी या यात्रेचे विशेष म्हणजे या यात्रेत आलेल्या जादुई मायाजाल घरामध्ये दाखवल्या जाणाऱ्या बोलक्या बाहुल्यांचा खेळ. असा बोलक्या बाहुल्यांचा खेळ हा पहिल्यांदाच यात्रेत आला असून तो अतिशय मजेदार असल्याचे दर्शक सांगत आहेत. असे बोलक्या बाहुल्यांचे खेळ हे आंतरराष्ट्रीय स्तरावर खूप प्रसिद्ध आहेत.

# नीता रेड्डी कुंटावार यांची २१ हजार किलोमीटर सायकलिंग

### जागतिक सायकलपटूंच्या यादीत मिळवले स्थान

■ महासागर प्रतिनिधी,
**यवतमाळ , दि. २९ :** कौटुंबिक जबाबदारीतून वेळ काढत स्वत:चा छंद जोपासणारी गृहिणी समाजात क्वचितच आढळते. त्यातही सायकलिंगसारख्या क्रीडा प्रकारात महिलांचा पुढाकार कमी आढळतो. मात्र, यवतमाळच्या नीता रेड्डी कुंटावार यांची सायकलपटू म्हणून विशेष नोंद झाली आहे. तब्बल २१ हजार किलोमीटर सायकल चालवून त्यांनी नवा विक्रम केला आहे. त्यांच्या या विक्रमाची नोंद स्ट्रावा या जगप्रसिद्ध क्रीडा पने घेतली असून नीता रेड्डी कुंटावार या पमध्ये जागतिक सायकलपटूंच्या यादीत झळकल्या आहेत.

यवतमाळातील पहिल्या महिला सायकलपटू म्हणून नोंद झाल्याबद्दल नीता कुंटावार यांचा स्थानिक सायकल रायडर्सच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला.

येथील गणेश सायकल स्टोअर्सच्या वतीने स्थानिक जीनातील गणपती मंदिराच्या प्रांगणात रविवारी सकाळी हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गजानन मानकर होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. रमाकांत कोलते, प्रा. उदय नावलेकर उपस्थित



होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नीता रेड्डी कुंटावार यांचा शाल, श्रीफळ, सन्मानपत्र देवून गौरव करण्यात आला. नीता रेड्डी यांनी आता जिल्ह्यातील महिला, मुलींना सायकलपटू म्हणून घडवावे, असे आवाहन यावेळी पाहुण्यांनी केले. कार्यक्रमास दिलीप राखे, व्यंकट कुंटावार, डॉ. आशिष गवरशेट्टीवार, नितीन पखाले, मनीष गुलवाडे, डॉ. अतुल माईंदे, मनोज उम्रतकर, प्रफुल्ल मानकर, प्रीती मानकर, गोविंद बजाज, डॉ. हर्षल झोपाटे, राहुल सारवे, वसंत राठोड, प्रभाकर डफळ, रामभाऊ तांबोळी, सुरेश भुसंगे, नीलेश नारसे आदी उपस्थित होते.

आता एक लाख किमी. चे लक्ष्य

सत्काराला उत्तर देताना नीता कुंटावार यांनी आता एक लाख किलोमीटर सायकल चालवण्याचे लक्ष्य असल्याचे सांगितले. दररोज किमान ५० किमी. सायकलिंग करत आहे. सुरूवातील लोक काय म्हणतील, हा प्रश्न छळत होता.

मात्र, सायलने नवा आत्मविश्वास दिला, असे त्या म्हणाल्या. सुरूवात केली तेव्हा अनेक अडचणी आल्या. मात्र पती, मुलं व कुटुंबियांनी सहकार्य करून साथ दिल्याने हा पल्ला गाठता आला. आतपर्यंत५० किलोमीटर सायलिंगचे ३०० अर्धशतक, तर १०० किलोमीटरचे १७ राऊंड पूर्ण केल्याचे त्यांनी नमूद केले.

# वाहनाला हात दाखवणाऱ्या व्यक्तीला ३०० मीटरपर्यंत नेले फरफटत

■ महासागर प्रतिनिधी,
**पुसद, दि. २९ :** चारचाकी वाहन पुसदवरून वाशीम दिशेने जात असताना २० ऑक्टोबर रोजी दुपारी अंदाजे साडेचार वाजेच्या सुमारास लिंबी गावाजवळ चारचाकी वाहनाने एका तरुणास कट मारला. यातच एका व्यक्तीने त्या चारचाकी वाहनास थांबवण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्या चारचाकी वाहन चालकाने हात देणार्या व्यक्तीच्या अंगावरच वाहन चढवले. या घटनेत संबंधित व्यक्तीच्या गंभीर जखमी झाला. रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहे. या घटनेप्रकरणी वसंतनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे.

माहूर येथून दर्शन करून पुसदमार्गे वाशीमकडे जात असलेल्या मारुती सुझुकी इको कंपनीची वाहन क्रमांक एमएच-१६-डिसी -५४२८च्या चारचाकी वाहनाने लिंबी फाट्याजवळ लिंबी येथील एका मुलास कट मारून तेथून पळ काढला. तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी गाडी आडवा



जखमी - राहुल सुधाकर धवसे

गाडी आडवा अशी आरडाओरड केली. लिंबी येथील रहिवासी असलेले राहुल सुधाकर धवसे, वय वर्ष यांनी त्या वाहनाला अडविण्याचा प्रयत्न केला. परंतु, चालकाने जाणूनबुजून पळ काढत राहुल सुधाकर धवसे यांच्या अंगावर गाडी चढवली. यामध्ये राहुल हा त्या वाहनाच्या समोरच्या चाकात व बोनेटमध्ये अडकला. सुमारे दोनशे ते तीनशे मीटर सदर चारचाकी वाहनाने त्यास फरफटत नेले. यामध्ये राहुलच्या हाताला, डोक्याला, पोटाला, तसेच चाळ्याला गंभीर मार लागला. नागरिकांच्या जमावाने गाडीचा पाठलाग करून गाडीला अडवले. त्यातून राहुलची सुटका करून त्यास तत्काळ हॉस्पिटल येथे भरती केले. राहुल हा गंभीर स्थितीमध्ये असल्यामुळे त्यास तत्काळ मेघे सावंगी येथे भरती केले आहे. राहुल हा मृत्यूशी झुंज देत आहे. चालक अभिलाष याच्याविरुद्ध गुन्दा दाखल केला आहे.

# घाटंजीत खासगी कापूस खरेदी सुरू

### ६ हजार ९०० रूपये दर

■ महासागर प्रतिनिधी,
**घाटंजी, दि. २९ :** येथील मीनाक्षी जिनिंगमध्ये खासगी कापूस खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. शंकर कुडमते रा. मांजरी या शेतकऱ्यांच्या बैलबंडीचे पुजन व काटापूजन करून कापसाला प्रती क्विंटल ६ हजार ४०० रुपये भाव देऊन खरेदी सुरू करण्यात आली. पहिल्या दिवशी तीन बैलगाडी व दिडशे वाहनांची आवक झाली. अंदाजे २ हजार ५०० क्विंटल कापसाची आवक झाली आहे.

घाटंजी तालुक्यातील मीनाक्षी कॉटन जिनिंगमध्ये २७ ऑक्टोबर रोजी मुहूर्तावर शेतकऱ्यांना हजार ४०० रूपये भाव देऊन व काटापूजन करून खासगी कापूस खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. पहिले शेतकरी शंकर कुडमते रा. मांजरी यांना शेला श्रीफळ देऊन बैलबंडीचे व काटापुजन करून खरेदीचा शुभारंभ



करण्यात आला. या वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव कपिल चन्नावार, संचालक चंद्रकांत इंगळे, संजय गोडे, हनुमान मेश्राम, प्रकाश खरतडे, अरविंद जाधव, कापूस विभागप्रमुख चेतन ठाकरे, चैतन्य विरदंडे आदी उपस्थित होते.

शेतकऱ्यांना आवाहन

दिवाळीच्या तोंडावर शेतकऱ्यांना आपला माल विकण्यासाठी अडचण निर्माण होऊ नये. दिवाळीत शेतकऱ्यांना व्यवहार करण्यासाठी अडचण निर्माण होऊ नये व खरेदीतून शेतकऱ्यांची लूट होऊ नये, यासाठी कापूस खरेदीचा शुभारंभ करण्यात आला आहे. शेतकऱ्यांनी चांगल्या प्रतीचा कापूस विक्रीसाठी आणावा व खरेदी दरम्यान यंत्रणेला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वाहतूक, आरोग्यासह स्वच्छतेबाबत जनजागृती

### दिवाली विथ माय भारत अभियान

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. २९ :** मेरा युवा भारतच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त २७ते ३० ऑक्टोबरपर्यंत नेहरू युवा केंद्राच्या समन्वयाने बाजाराची स्वच्छता, ट्रॅफिक नियम, वाहतूक व्यवस्थापन, दवाखान्यातील प्रधानमंत्री जन आरोग्य योजनांची माहिती आदींबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. त्यासाठी नेहरू युवा केंद्र, सरस्वती इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग आणि मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाचे स्वयंसेवक काम करत आहेत.

दिवाळी विथ माय भारत उपक्रमांतर्गत कृषी उत्पन्न बाजार समिती येथे स्वच्छता अभियान राबवण्यात आले. त्यामध्ये रासेयो अधिकारी मंदा नांदुरकर आणि नेहरू युवा केंद्राच्या जिल्हा युवा अधिकारी स्नेहल बासुतकर उपस्थित होत्या. त्याचबरोबर स्वयंसेवकांनी मार्केटमधील विक्रेत्यांना सिंगल युज प्लास्टिकच्या दुष्परिणामांबद्दल




जागरूक केले. त्याच सोबत स्वयंसेवकांना वाहतूक शाखेचे सहायक पोलिस आयुक्त संजय खताले यांनी वाहतूक नियम आणि व्यवस्थापनाबद्दल माहिती देत मार्गदर्शन केले. त्यानंतर स्वयंसेवकांना इर्विन चौकात नेऊन वाहतूक नियमांबाबत माहिती देण्यात आली.

दिवाळी विथ माय भारत अंतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये नर्सिंग इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांनी प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेबद्दल रुग्णांना माहिती दिली आणि आभा आयडी कार्ड बनवून देण्यासाठी सहकार्य केले.

दिवाळी विथ माय भारत हा युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. जे युवकांना उद्योजकता आणि करिअरशी संबंधी प्रशिक्षण घेता येईल. सोबतच ते सामाजिक कार्यात सहभागी होऊ शकतात आणि समाजाच्या कल्याणासाठी कार्य करू शकतात.

# काँग्रेसने साजिद खान यांच्यावरच दाखवला विश्वास, नाराज नेत्याने धरली वंचितची वाट



सुनील धाबेकर, डॉ. झिशान हुसेन, साजिद खान

अकोला : विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने साजिद खान पठाण यांच्यावरच पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे. अकोला पश्चिम मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा त्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. यामुळे नाराज झालेले काँग्रेसमधील इच्छुक युवा नेते डॉ. झिशान हुसेन यांनी अखेर वंचितची वाट निवडली. वंचित आघाडीने त्यांना अकोला पश्चिममध्ये उमेदवारी जाहीर केली. काँग्रेस व भाजपमध्ये बंडखोरी झाल्याने येथे बहुरंगी लढत होण्याची चिन्हे आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी अत्यंत वेगाने राजकीय घडामोडी सुरू आहेत. काँग्रेसने सोमवारी रात्री जाहीर केलेल्या यादीत अकोला पश्चिम मतदारसंघातून साजिद खान पठाण यांना उमेदवारी दिली. या मतदारसंघात ज्येष्ठ नेते तथा दिवंगत आमदार गोवर्धन शर्मा यांनी तब्बल २४ वर्षे भाजपचा झेंडा फडकवत ठेवला. विजयाची डबल हॅट्ट्रिक साध्य करणाऱ्या दिवंगत शर्मा यांना २०१४ मध्ये काँग्रेसचे साजिद खान पठाण यांनी कडवी झुंज दिली होती. त्यानंतर नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये सुद्धा भाजपची पीछेहाट झाल्याचे चित्र आहे. त्यामुळे अकोला पश्चिममध्ये काँग्रेसचा उत्साह चांगलाच वाढला आहे.

# विद्यार्थ्यांच्या सर्जनशील विचार निर्मितीसाठी संशोधन कार्याची गरज-प्रा. पुष्पक कोंडे



■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. २९ :** संशोधनकार्य हे विचार, कल्पकता आणि नाविन्यतेचे महत्वाचे माध्यम असल्यामुळे विद्यार्थांच्या क्रियाशीलतेला चालना मिळण्यास मदत होते. विद्यार्थांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनात आपल्यामध्ये असणाऐया अंतर्भूत सुप्त- कलागुणांचा शोध घेऊन आपल्या अस्तित्वाची ओळख निर्माण करावी, जेणेकरून त्यांना आपली उद्दिष्टे आणि ध्येय साध्य करता येईल. आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात विद्याथ्र्याच्या विकासाला खरोखर दिशा प्राप्त करून द्यायची असेल, तर त्यांच्या सर्जनशील विचार निर्मितीसाठी संशोधनकार्य करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन प्रा. पुष्पक कोंडे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील एम.ए. योगशास्त्र, पी.जी. डिप्लोमा योगा थेरपी, आणि पी.जी. डिप्लोमा नेचरोपॅथी अँड योगिक सायन्स या पदव्युत्तर पदवी आणि पदविका अभ्यासक्रमाच्यावतीने 'सामाजिक संशोधनामध्ये सांख्यिकीचे महत्व 'या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यशाळेच्या पहिल्या सत्राचे अध्यक्ष विभागाचे संचालक डॉ.श्रीकांत पाटील होते. प्रा.कोंडे पुढे म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० प्रमाणे विद्यार्थी केंद्रित संकल्पना राबविण्यासाठी विद्याथ्र्यामध्ये संशोधन कार्याची सजगता निर्माण व्हावी, यासाठी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी संशोधन हा विषय अनिवार्य करण्यात आला आहे. यामुळे विद्याथ्र्यामध्ये दूरदृष्टी, कल्पकता, नाविन्यपूर्ण विचार आणि संशोधन कार्य करण्याची रुची निर्माण होण्यास मदत होईल. संशोधन कार्यामध्ये व्यापकता निर्माण व्हावी; यासाठी संशोधनामधील अंतर्भूत सर्व घटकांचा अभ्यास महत्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. संशोधन कार्याचे क्षेत्र हे अधिक व्यापक असेल, तर त्या ठिकाणी संशोधनामध्ये सांख्यिकीय पद्धतीचा अवलंब कसा करावा या विषयीचे सखोल मार्गदर्शन करून विद्याथ्र्यानी संशोधन विषयामध्ये आपली सृजनशीलता निर्माण करावी, जेणेकरून विविध सामाजिक शैक्षणिक, आर्थिक तसेच राजकीय विषयांवर नव्याने संशोधन कार्य करून नवीन पैलू अभ्यासता येईल, असा विश्वास त्यांनी या प्रसंगी व्यक्त केला.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **YAMEEN SHABBIR HUSAIN TOPIWALA.** NOW MY NEW NAME IS **YASMIN SABBIR TOPIWALA.**
**ADD :** NEAR MUNSHIJI MASJID,119 OLD BHANDARA ROAD, GANJAKHET ITWARI, NAGPUR CITY, NAGPUR CITY, 440002

MY OLD NAME WAS **SUYOG CHOPDE.** NOW MY NEW NAME IS **SUYOG KALYAN CHOPDE.**
**ADD :** PLOT NO 124 CHANDRIKAPURE LAYOUT ZINGABAI TAKLI MANKAPUR NAGPUR 440030

MY OLD NAME WAS **MANPREET KAUR.** NOW MY NEW NAME IS **MANPREET KAUR CHHABRA .**
**ADD :** PLOT NO 45 PRITAM VIHAR KAMPTEE ROAD AUTOMATIVE CHOWK UPPALWADI NAGPUR MAHARASHTRA 440026

MY OLD NAME WAS **BRIJ MOHAN SINGH.** NOW MY NEW NAME IS **BRIJ MOHAN SINGH CHHABRA.**
**ADD :** PLOT NO 45 PRITAM VIHAR KAMPTEE ROAD AUTOMATIVE CHOWK UPPALWADI NAGPUR MAHARASHTRA 440026

MY OLD NAME WAS **SANSKRUTI SANTOSH EMBADWAR.** NOW MY NEW NAME IS **SANSKRUTI SANTOSH AMBADWAR .**
**ADD :** FLAT NO. 607, WING NO.B BUILDING NO.1, MHADA CITY SUBHASH ROAD GANESHPETH NAGPUR

# जुना कॉटन मार्केटमध्ये वाहतूक कोंडी

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. २९ :** सध्या दिवाळीमुळे शहरातील मुख्य बाजारपेठेत गर्दी वाढली आहे. अशावेळी शहरातील मुख्य चौक व मार्गांवर वाहतूक पोलिसांकडून किमान गर्दीच्या वेळी वाहतूक नियमन अपेक्षित आहे. मात्र शहरातील अनेक चौकात तसे होताना दिसत नाही.

सोमवारी दुपारी पावणे दोन ते सव्वा दोन या दरम्यान जुना कॉटन मार्केट परिसरातील दीपक चौकात प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. चारही बाजूंनी वाहन एकमेकांवर येऊन धडकतील की काय, अशी ती स्थिती होती. याचवेळी रुग्णाला घेऊन रुग्णवाहिका सायरन वाजवत आली आणि रुग्णवाहिकासुद्धा जवळपास दहा मिनीटे या कोंडीत अडकली. अखेर काही नागरिकांनी पुढाकार घेऊन वाहतूक कोंडीतून रुग्णवाहिकेला मार्ग काढून दिला. अर्धा तासापेक्षा जास्त वेळ वाहतूक



कोंडी होती मात्र तरीही वाहतूक पोलिस या चौकात पोहोचले नाही.

शहरातील वाहतुकीचे सध्या तीनतेरा झाले आहेत. मुख्य बाजारपेठेचे मार्ग असोत की शहरातील इतर मार्ग, महत्त्वाचे चौक या ठिकाणी दुपारपासून विस्कळीत वाहतूक दिसते. दरम्यान सोमवारी दुपारी तर मालविय चौकापासून ते चित्रा चौकापर्यंतची परिस्थिती प्रचंड विदारक झाली होती. याच मार्गात येणाऱ्या दीपक चौकात चार बाजूने वाहने येतात. त्यामुळे या ठिकाणी वाहतूक नियमन आवश्यक आहे. मात्र सोमवारी दुपारी चारही बाजूची वाहने दीपक चौकात अस्ताव्यस्त एकत्र आली आणि वाहतूक कोंडी झाली. या वेळी काही वाहनचालक प्रचंड जोरजोरात हॉर्न वाजवत होते, त्यातच अंगाला चटके देणारे ऊन. यामुळे या वाहतूक कोंडीत अडकलेल्या दुचाकीस्वारांना तर प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला.



या चौकात होते नेहमीच कोंडी

मागील काही दिवसांपासून या चौकात अशाप्रकारे वाहतूक कोंडी दररोज होत आहे. मात्र वाहतूक पोलिस येतात काही वेळ थांबतात आणि निघून जातात. पोलिस गेले की, पुन्हा वाहतूक कोंडी होते. या चौकात क्वचितच पूर्णवेळ वाहतूक पोलिस दिसत असल्याचे या चौकातील काही व्यावसायिक सांगत होते. नामांकन रॅली त्याचवेळी होत्या सोमवारी दुपारी दीपक चौकात ट्रॅफिक जॅम झाल्याची माहिती मिळाली होती. मात्र आज दोन ते तीन उमेदवारांच्या अधिक गर्दीच्या नामांकन रॅली असल्यामुळे आमचा बहुतांश स्टाफ त्या रॅली बंदोबस्तात होता. त्यामुळे दीपक चौकात वाहतूक कोंडी झाली, त्यावेळी आमचे अंमलदार हजर नव्हते. रिता उईके, पीआय, पश्चिम वाहतूक शाखा.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




## पोटफुगी टाळण्यासाठी...

आरोग्यमंत्र

अपचन किंवा मंदावलेल्या पचनक्रियेमुळे पोटफुगी किंवा पोटात गोळा येणासारख्या समस्या निर्माण होतात. आपली जीवनशैली, आहार-विहार आणि खाण्यापिण्याच्या पद्धती पोटफुगीच्या समस्येला बऱ्याच अंशी जबाबदार असतात. विशिष्ट प्रकारचा आहार किंवा अन्नघटक टाळून तुम्ही ही समस्या दूर करू शकता.

कॅफेनमुळे पचनसंस्था उत्तेजित झाल्याने पोट फुगतं. दुग्धजन्य पदार्थांमुळे त्रास अनुभवणाऱ्या लोकांना दूध घातलेली कॉफी बाधू शकते. कॅफेनचा प्रभाव कमी करण्यासाठी हर्बल टीचा पर्याय निवडा. तुम्ही ग्रीन टीही पिऊ शकता. मिठातल्या सोडियममुळे शरीरात पाणी साठून राहतं आणि पोट फुगल्यासारखं



वाटतं. त्यामुळे आहारातलं मिठाचं प्रमाण कमी करा.

काहींना कांदा खाल्ल्यानंतर पोट फुगणं, गॅससारख्या समस्या जाणवतात. अशांनी कांद्याऐवजी काकडी खावी. कोबी, फ्लॉवर, ब्रोकोलीसारख्या भाज्या कच्च्या खाल्ल्याने गॅस होतो. त्यामुळे या भाज्या शिजवून किंवा उकडून खाव्यात. या भाज्यांचं आहारातलं प्रमाण कमी करा.

## स्तन कर्करोगाच्या प्रकरणांत वाढ

आरोग्य विशेष

सध्या महिलांना आपल्या आरोग्याबाबत अधिक सावध होण्याची गरज आहे. ब्रेस्ट कॅन्सरची प्रकरणे सध्या वाढताना दिसत आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते स्तनाचा कर्करोग हा सर्वात सामान्य कर्करोगांपैकी एक आहे. दरवर्षी या आजाराची सुमारे २० लाख नवीन रुग्ण नोंदवले जातात. या कॅन्सरबद्दल माहिती नसणे आणि उशीरा ओळखणे या आजारामुळे होणाऱ्या मृत्यूची प्रमुख कारणे आहेत.

स्तनाचा कर्करोग हा महिलांमध्ये होणारा कर्करोगाचा प्रमुख प्रकार आहे. पुरुषांनादेखील स्तनाचा कर्करोग होऊ शकतो; परंतु हे फार दुर्मीळ आहे. स्तनाचा कर्करोग वेळीच आढळल्यास त्यावर उपचार करता येतात. म्हणून, नियमितपणे स्तनांची तपासणी करणे आणि त्याच्या लक्षणांकडे लक्ष देणे खूप महत्वाचे आहे.



आपल्या शरीरात अनेक पेशी असतात. जेव्हा या पेशी कोणत्याही अवयवामध्ये असाधारणपणे वाढू लागतात, तेव्हा कर्करोगाची शक्यता वाढते. स्तनाच्या कर्करोगात, पेशी एक ट्यूमर बनवतात.

स्तन किंवा काखेखाली गाठ जाणवणे, स्तनाचा आकार बदलणे, निप्पलच्या आतील भागातून स्त्राव, स्तनाग्र आत होणे किंवा कडक होणे, स्तनाच्या त्वचेवर लालसरपणा किंवा पुरळ उठणे, स्तनाखाली किंवा त्याच्या बाजूला सूज येणे, एक स्तन दुसऱ्यापेक्षा वेगळे दिसणे अशी स्तनाच्या कर्करोगाची लक्षणे आहेत.

सामान्यत: लोकांना असे वाटते, की स्तनाचा कर्करोग हा अनुवांशिक आहे, याचा अर्थ जर त्याचा कौटुंबिक इतिहास असेल तर पुढच्या पिढीतही तो होतो असा समज आहे; परंतु ते खरे नाही. स्तनाच्या कर्करोगाची केवळ १०-१५ टक्के प्रकरणे अनुवांशिक असतात. आईला, आत्याला किंवा आजीला स्तनाचा कर्करोग झाला असेल, तर अशा महिलांनी स्तनाचा कर्करोग चाचणी करून घ्यावी. ही फक्त रक्त तपासणी आहे. जेव्हा त्याचा परिणाम सकारात्मक येतो, तेव्हा स्तनाच्या कर्करोगाचा धोका ४० टक्क्यांनी वाढतो आणि केवळ स्तनाचा कर्करोगच नाही, तर गर्भाशयाचा कर्करोग होण्याची शक्यताही वाढते.

## गरोदर महिलांना मिळाला दिलासा

नवसंशोधन

साध्याशा रक्तचाचणीद्वारे गरोदरपणातल्या जीवघेण्या ठरू शकणाऱ्या गुंतागुंतीचं निदान करणं शक्य होणार असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. प्री-एक्लाम्प्सिया असं या विकाराचं नाव आहे. गरोदर महिलेच्या रक्तचाचणीतून या विकाराचं निदान दोन दिवस आधी करण्यात डॉक्टरांना यश आलं. यामुळे या गुंतागुंतीचं वेळेत निदान करणं शक्य होणार आहे. प्री-एक्लाम्प्सिया हा अत्यंत धोकादायक विकार असून यामुळे जगभरात दररोज अनेक महिलांचा मृत्यू होतो, असं आकडेवारी सांगते. या चाचणीसाठी १०३५ महिलांची तपासणी करण्यात आली. गेल्या १०० वर्षांपासून या विकाराचं निदान करण्यासाठी महिलांच्या मूत्रातल्या प्रथिनांची तसंच रक्तदाबाची चाचणी केली जात असे. मात्र नव्या संशोधनामुळे गरोदर महिलांना बराच दिलासा मिळाला आहे.



## होमिओपॅथी आणि दंतविकार

दंतारोग्य

दातदुखी ही सर्वसाधारण समस्या आहे. दात दुखत असला की आपण दंततज्ज्ञाकडे जातो. मात्र होमिओपॅथीमध्येही या विकारावर उपचार आहेत. हिरड्यांच्या जंतूसंसर्गासह इतर विविध दंतविकारांच्या



उपचारांमध्ये होमिओपॅथी अगदी प्रभावी ठरते. अर्थात होमिओपॅथी ही पर्यायी उपचारपद्धती असल्याने दातांच्या तीव्र स्वरूपाच्या समस्यांसाठी तुम्हाला दंततज्ज्ञांकडे जावं लागेल. होमिओपॅथिक दंततज्ज्ञ दातांमध्ये पार भरू शकतात. त्यामुळे योग्य दंतविकारांवर योग्य उपचार घेण्यावर भर देणं गरजेचं आहे. होमिओपॅथीचे उपचार केल्यानंतर आराम मिळतोच असं नाही. त्यामुळे त्रास जाणवला तर या औषधांवर विसंबून न राहता चांगल्या तज्ज्ञाला दाखवणं गरजेचं आहे. विश्वासू होमिओपॅथी तज्ज्ञाकडून तुम्ही दंतविकारांवरचे उपचार घेऊ शकता. मात्र आपल्या दंततज्ज्ञाच्या सल्ल्यानेच पुढे जा.

## मायोपियाबाधित मुलांची संख्या ७४ कोटी होणार

आरोग्य चर्चा

अलीकडेच एका अभ्यासातून धक्कादायक बाब समोर आली आहे. कोरोनानंतर मुलांमध्ये मायोपियाच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. आता दर तीन मुलांपैकी एक मायोपियाचा बळी आहे. मायोपिया म्हणजे दूरच्या वस्तू पाहण्यात अडचण येते. २०५० पर्यंत लहान मुलांमध्ये मायोपियाची संख्या ७४ कोटींपर्यंत पोहोचू शकते.

अभ्यासानुसार, मायोपियाची रुग्णसंख्या वाढण्यामागील कारण जास्त स्क्रीन वेळ आहे. कोरोनाच्या काळात लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीत बाहेर पडण्याचा पर्याय नव्हता. त्यामुळे मुलांच्या शिक्षणापासून ते मनोरंजनापर्यंत सर्व काही मोबाईल फोन किंवा कॉम्प्युटरच्या माध्यमातून घडले. टाळेबंदीनंतर मुले त्यांचा बहुतांश वेळ फोन किंवा कॉम्प्युटरसमोर घालवतात. त्यामुळे त्याचा स्क्रीन टाईम खूपच वाढला आहे.



पालकांपैकी एकाला किंवा दोघांनाही मायोपिया असेल तर त्यांच्या मुलांनाही हा आजार होण्याची शक्यता असते. बाहेर खेळणे आणि सूर्यप्रकाशात राहणे यामुळे डोळ्यांना विश्रांती मिळते आणि मायोपियाचा धोका कमी होतो; पण त्याच्या कमतरतेमुळे डोळ्यांना नुकसान होते. कमी प्रकाशात फोन पाहणे किंवा वापरणे यामुळे डोळ्यांवर अधिक ताण येतो. त्यामुळे मायोपिया होऊ शकतो. मायोपिया पूर्णपणे रोखणे कठीण होऊ शकते, विशेषतः जर त्याचा कौटुंबिक इतिहास असेल. काही उपायांचा अवलंब करून त्याचा प्रभाव कमी केला जाऊ शकतो.

मुलांना दररोज किमान २-३ तास बाहेर खेळण्यास प्रोत्साहित करा, संगणक, टॅब्लेट आणि स्मार्टफोन दररोज दोन तासांपेक्षा जास्त वापरु नये, डोळ्यांना नियमित विश्रांती देण्यासाठी २०-२०-२० नियम पाळा. याचा अर्थ, स्कीन टाइमच्या प्रत्येक २० मिनिटांनंतर, २० सेकंदांसाठी २० फूट दूर काहीतरी पाहा. अभ्यास करताना मुलांच्या खोलीतील प्रकाश योग्य असल्याची खात्री करा आणि त्यांना अंधारात फोन वापरू देऊ नका.

मुलांचे डोळे नियमितपणे तपासणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे मायोपियाची सुरुवातीची लक्षणे शोधून त्यावर योग्य उपचार करता येतील. मुलाच्या आहारात व्हिटॅमिन ए, डी, ई आणि ओमेगा-३ फॅटी सिड भरपूर असावे. डोळ्यांचे काही व्यायाम देखील मायोपिया टाळण्यास मदत करू शकतात. यामध्ये डोळे फिरवणे, डोळे बंद करणे, आराम करणे, दूरच्या वस्तूंवर लक्ष केंद्रित करणे यांचा समावेश असू शकतो.

## झोप उडाली, तर आत्महत्येचा धोका

लक्षात ठेवा

मूल नीट झोपत नसेल आणि रात्रभर बेडवर या अंगावरून त्या अंगावर करीत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. नुकत्याच झालेल्या एका संशोधनात धक्कादायक बाब समोर आली आहे. लहान मूल नीट झोपत नसेल तर आत्महत्येचा धोका वाढतो. कॅलिफोर्नियातील 'स्टॅनफोर्ड सुसाईड प्रिव्हेन्शन रिसर्च लॅबोरेटरी'मध्ये केलेल्या अभ्यासानुसार, १० वर्षांच्या मुलांमध्ये झोपेचा त्रास झाल्यामुळे दोन वर्षांनंतर आत्महत्येचे विचार आणि आत्महत्येच्या प्रयत्नांचा धोका वाढू शकतो. त्याचा धोका २.७ पटीने वाढू शकतो. कॅलिफोर्नियातील 'स्टॅनफोर्ड सुसाइड प्रिव्हेन्शन रिसर्च लॅबोरेटरी'च्या संस्थापक आणि आत्महत्या तज्ज्ञ डॉ. रेबेका बर्नट यांच्या मते झोपेची कमतरता हे १० ते १४ वर्षे वयाच्या आत्महत्येचे एक प्रमुख कारण आहे. या वयात झोपेचा अभाव सर्वात जास्त दिसून येतो. या अभ्यासात अमेरिकेतील २१ ठिकाणी ८,८०० मुलांवर संशोधन करण्यात आले. झोप लागणे किंवा राहणे यात समस्या, जागे होणे, जास्त झोप, झोपेच्या वेळी श्वास घेण्यास त्रास होणे, झोपेच्या वेळी जास्त घाम येणे, अर्ध्या झोपेत वर्तन पद्धती इत्यादी कारणे मुलांच्या पालकांकडून आढळून आली आहेत. पहिल्या डेटा संकलनापासून ९१.३ सहभागींनी आत्मघाती वर्तन अनुभवले नव्हते. आत्महत्येची प्रवृत्ती असलेल्या सहभागींना झोपेच्या कमतरतेचा त्रास होत होता. या अभ्यासात पुढे असे दिसून आले, की नैराश्य, चिंता आणि कौटुंबिक संघर्षाचा इतिहास यासार'या घटकांमुळेही आत्महत्येच्या विचारांना चालना मिळते. या अभ्यासात असे आढळून आले आहे, की दररोज भयानक स्वप्ने पाहिल्याने आत्महत्येचा धोका ५ पटीने वाढतो. आरामदायक कपडे घालून झोपणे, रात्री झोपण्यापूर्वी दात घासणे, झोपण्यापूर्वी वॉशरूममध्ये जाणे, झोपताना मुलाशी बोलणे, मुलाच्या आवडीच्या कविता, कथा किंवा गाणी म्हणणे, झोपेच्या वेळी मुलाला एक कथा ऐकवणे आदी त्यावरचे उपाय आहेत.



## डोळ्यांचा तिरळेपणा

आरोग्य डोळ्यांचं

तिरळेपणा हे 'लेझी आय' या विकाराचं महत्त्वाचं कारण ठरतं. दोन डोळ्यांच्या चष्म्याच्या नंबरमध्ये खूप जास्त अंतर असणं किंवा जाड भिंगाचा चष्मा हे सुद्धा 'लेझी आय'ला कारणीभूत ठरू शकतं. लहान मुलांमध्ये ही समस्या उद्‌भवते. त्यांच्या डोळ्यांची तपासणी केल्यानंतर या विकाराचं निदान केलं जातं. मुलांच्या डोळ्यांची काळजी घेतल्यानंतरही डोळ्यांचे स्नायू कमकुवत असल्यामुळे हा त्रास होऊ शकतो. तिरळेपणाचं नेमकं कारण अद्यापही स्पष्ट झालं नसलं तरी लहान वयातच ही समस्या उद्‌भवत असल्याचं दिसतं. लहान मुलांमध्ये तिरळेपणाची लक्षणं दिसली तर पालकांनी त्यांच्या डोळ्यांवर पट्टी बांधायला सुरूवात करावी.



## पायांना संसर्ग असेल तर...

आजीबाईचा बटवा

पायांच्या बोटांमध्ये फंगस किंवा जंतूसंसर्ग होणं हा सर्वसाधारण विकार आहे. यात पायांच्या नखांचा रंग काळा, पांढरा किंवा तपकिरी होतो. उपचार केले नाहीत तर हा संसर्ग



शरीरात पसरण्याचा धोका असतो. यावर काही घरगुती उपाय करता येतील. बेकिंग सोड्यामुळे जंतूसंसर्गाला कारणीभूत ठरणारी आर्द्रता कमी होते. बूट किंवा मोज्यांमध्ये बेकिंग सोडा ठेवता येईल. बेकिंग सोड्यात थोडं पाणी घालून त्याची पेस्ट बनवा. ही पेस्ट संसर्ग झालेल्या बोटांवर लावा. यामुळे आराम मिळेल. व्हिनेगार हा घटक घराघरात असतो. एक भाग व्हिनेगारमध्ये दोन भाग गरम पाणी घाला. या पाण्यात पाय बुडवून बसा. दररोज ही कृती करा. लसणाचा वापर वेगवेगळ्या व्याधींमध्ये केला जातो. यात जंतूविरोधी गुणधर्म असतात. लसणाचे तुकडे किंवा पेस्ट करून बोटांना लावा.

## धुम्रपानामुळे दृष्टी अधू

आरोग्यभान

धुम्रपानामुळे फुफ्फुसांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. याशिवाय श्वसन, हृदय आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित गंभीर समस्या उद्भवतात. ही परिस्थिती डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे. भावी पिढ्यांचे आरोग्य धोक्यात येईपर्यंत धुम्रपानाचे दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागतात. धुम्रपानाचे डोळ्यांवर होणारे परिणाम अत्यंत धोकादायक आहेत.

डोळ्यांमध्ये लालसरपणा आणि चिडचिड ही स्थिती अधिक चिंताजनक बनते. धुम्रपानामुळे मॅक्युलर डिजेनेरेशन आणि मोतीबिंदू होऊ शकतात. मोतीबिंदू विकसित होण्याचा एक प्रमुख जोखीम घटक हा आहे की धुम्रपानामुळे दृष्टी कमी होऊ शकते. धुम्रपानाचे धोके केवळ सिगारेट ओढणाऱ्या व्यक्तीपुरती मर्यादित नाही; अशा निष्क्रिय धुम्रपानामुळे आजूबाजूच्या लोकांनाही त्रास सहन करावा लागतो. अशा घटकांचा धूम्रपान न करणाऱ्या व्यक्तीवर तसेच विशेषत: तरुण व्यक्तीवर धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीपेक्षा जास्त परिणाम होण्याची शक्यता असते. निष्क्रिय धुम्रपानामुळे मुलांमध्ये मोतीबिंदूसारख्या डोळ्यांच्या समस्या उद्भवू शकतात. धूम्रपानामुळे मधुमेहाशिवाय डायबेटिक रेटिनोपॅथीचा धोका




वाढतो. ही अशी स्थिती आहे, जिथे रक्तातील साखरेची पातळी वाढल्याने रेटिनातील वाहिन्यांना नुकसान होते. डायबेटिक रेटिनोपॅथीचा धोका कमी करण्यासाठी आणि दृष्टी टिकवून ठेवण्यासाठी मधुमेही रुग्णांना धूम्रपान सोडण्यास प्रोत्साहित करणे महत्त्वाचे आहे. गरोदर माता आणि भावी पिढ्यांसाठी धुम्रपानामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतात.

सर्वांगीण लोककल्याणाचे रक्षण करण्यासाठी आपण धुम्रपानमुक्त वातावरणासाठी प्रयत्न केले पाहिजे. धूम्रपान बंद करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांचे समर्थन केले पाहिजे. धूम्रपानामुळे डोळ्यांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करून, धूम्रपान बंद करण्याच्या प्रयत्नांना पाठिंबा देऊन, तसेच तंबाखू नियंत्रण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून आपण आपली दृष्टी सुरक्षित करू शकतो.

## सोरायसिसवर धृतकुमारी प्रभावी!

आयुर्वेद आणि विकार

सोरायसिस हा एक त्वचारोग आहे. आयुर्वेदानुसार शरीरात वात आणि पित्ताचं प्रमाण वाढल्याने टिश्यूंमध्ये विषारी घटकांची निर्मिती होते आणि हे घटक सोरायसिसला कारणीभूत ठरतात. त्वचेचा दाह, खाज, अंगावर पुरळ उठणं, त्वचा लाल होणं ही या विकाराची लक्षणं आहेत. पौष्टिक आहाराचा अभाव आणि तेल, तुपासारख्या स्निग्ध पदार्थांचं आहारातलं प्रमाण नगण्य असेल तर हा विकार होण्याची शक्यता वाढते. त्वचेला पुरेसा ओलावा मिळत नसला तरी तुम्हाला त्रास होऊ शकतो. जास्त वेळ उन्हात राहिल्याने त्वचा कोरडी पडते आणि सोरायसिसची समस्या निर्माण होते.




या विकारावर काही आयुर्वेदिक उपचार करता येतील. अक्रोड पाण्यात उकळून हे पाणी सोसायसिस झालेल्या भागावर लावा. सोरायसिस झालेला भाग केळ्याच्या पानांनी बांधून ठेवा. भांडंभर पाण्यात १५ ते २० तीळ टाकून रात्रभर ठेवा. सकाळी रिकाम्या पोटी हे पाणी प्या. यामुळे आराम मिळेल. त्वचाविकारांवर धृतकुमारी हा अत्यंत प्रभावी उपाय ठरतो. सोरायसिस झालेल्या भागावर या वनौषधीचा गर नियमित लावा किंवा दिवसातून दोन वेळा गर खा. या विकाराची तीव्रता अधिक वाटत असेल तर आयुर्वेदतज्ज्ञांचा सल्ला घेणं योग्य ठरतं. आयुर्वेदिक उपचारांमध्ये रक्त आणि टिश्यूंच्या शुद्धिकरणावर भर दिला जातो. यासाठी आहारात काही बदल सांगण्यात येतात. यामुळे पचनक्रिया सुधारते आणि त्वचेतले टिश्यू बळकट होतात.

## केस ओले ठेवून झोपू नका

आपण कुठे चुकतो?

केस ओले ठेऊन झोपू नये, असा सल्ला दिला जातो. मात्र यामुळे होणाऱ्या त्रासाचे फारसे पुरावे उपलब्ध नसल्यामुळे या मुद्द्याकडे डोळेझाक केली जाते. प्रत्यक्षात मात्र ओल्या केसांमुळे बराच त्रास होऊ शकतो. तुम्हीही सकाळी लवकर जायचं असल्यामुळे रात्री केस धूत असाल आणि ओल्या केसांनीच झोप असाल तर सावध व्हा. यामुळे तुमचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं.



आहाराच्या चुकीच्या सवयी, वाढलेलं प्रदूषण आणि इतर कारणांमुळे केस गळण्याचं प्रमाण खूप वाढलं आहे. त्यातच केस ओले असताना झोपलात तर ते जास्त प्रमाणात तुटू शकतात. ओले केस आधीच खूप नाजूक असतात. त्यातच झोपेतल्या हालचालींमुळे ते जास्त गळतात. उन्हाळ्यात काहीजण एसी लावून झोपतात. एसीत ओले केस घेऊन झोपल्याने थंडी वाजते आणि मग ताप, सर्दी, खोकला असे आजार होऊ शकतात. ओल्या केसांना आकार देता येतो. झोपेत आपले केस वेडेवाकडे होतात. गुंतून बसतात. यामुळे केस विंचरताना बराच त्रास होतो आणि वेळही जातो. त्यामुळे रात्री केस वाळवून झोपलेलं केव्हाही चांगलं. केस ओले असताना झोपल्यामुळे रोगप्रतिकारक क्षमता कमी होते असं म्हणतात. यामुळे सर्दी, खोकला, ताप असे विकार वरचेवर उद्‌भवायला सुरूवात होते. आर्द्रता आणि ओलावा हे वातावरण बॅक्टेरियांच्या वाढीसाठी पोषक ठरतं. ओल्या केसांमुळे उशीवर बॅक्टेरिया वेगाने वाढतात. उशीचे अभ्रे धुवून काहीही साध्य होत नाही. कारण पाणी आणि आर्द्रता उशीच्या आत शिरते आणि तिथे बॅक्टेरिया वाढू लागतात. याच ओलाव्यामुळे डोक्यात बॅक्टेरियांची वाढ होते आणि कोंड्याची निर्मिती होते. ओल्या केसांमुळे केसांच्या मुळाशी असलेल्या नैसर्गिक तेलांचं प्रमाण घटतं उशीवरच्या बॅक्टेरियांमुळे चेहऱ्यावर पुरळ येऊ शकतं.

## क्रश सिंड्रोम म्हणजे काय?

व्याधी विचार

स्नायूंच्या विशिष्ट गटावर दीर्घकाळपर्यंत बराच दाब पडला तर क्रश सिंड्रोम हा विकार होऊ शकतो. या दाबामुळे स्नायूंचं तीव्र स्वरूपाचं नुकसान झालं तर मायोग्लोबिन नावाचं विषारी प्रथिन तसंच पोटॅशियम आणि फॉस्फरस हे घटक मोठ्या प्रमाणावर बाहेर पडतात. सर्वात जास्त दाब असलेल्या स्नायूंमधून हे विषारी घटक बाहेर पडतात आणि संपूर्ण शरीरात पसरतात. हे विषारी घटक रक्तात शिरून हृदयापर्यंत पोहोचतात. या घटकांमुळे बरीच गुंतागुंत निर्माण होऊ शकते. मूत्रपिंड निकामी होणं, हृदयविकार आणि रक्तवाहिन्यांमध्ये अडथळे अशा समस्या निर्माण होऊ शकतात. मूत्रपिडांमधून घाण बाहेर टाकणाऱ्या नळीत अडथळे आल्यामुळे ते निकामी होतात. यामुळे मूत्रपिंडातल्या पेशींचं नुकसान होतं.



स्नायूंना झालेल्या दुखापतीशिवाय इतर कारणांमुळेही क्रश सिंड्रोम होऊ शकतो. यामागे काही अनुवंशिक कारणंही असू शकतात. कर्बोदकांच्या पचनाशी संबंधित काही जन्मजात दोष असले तर क्रश सिंड्रोम होऊ शकतो. खूप दगदग झाल्यामुळे किंवा हिट स्ट्रोकमुळेही क्रश सिंड्रोमना निमंत्रण मिळतं. कोलेस्टेरॉल कमी करण्यासाठी देण्यात येणारी औषधंही क्रश सिंड्रोमला कारणीभूत ठरू शकतात. क्रश सिंड्रोमची लक्षणं स्पष्टपणे दिसून येतात. त्यामुळे या विकाराचं निदान करणं डॉक्टरांसाठी कठीण नसतं. स्नायूंना धक्का पोहोचल्यामुळे मेंदूला होणाऱ्या रक्तपुरवठ्यावर परिणाम होतो. परिणामी, रूग्णाची शुद्ध हरपते किंवा तो कोमामध्येही जाऊ शकतो. रक्तात वाढलेल्या पोटॅशियममुळे स्नायू कमकुवत होतात. त्वचा थंड पडते. नाडीची गती वाढणं, मूत्राचं प्रमाण कमी होणं क्रश सिंड्रोमबाधित भागात वेदना न जाणवणं अशी या विकाराची सर्वसाधारण लक्षणं आहेत.

या विकाराचं निदान करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या चाचण्या केल्या जातात. त्यात युरिन मायोग्लोबिन, सिरम सीपीके आणि रसायनांशी संबंधित चाचण्या केल्या जातात. क्रश सिंड्रोमचं निदान झाल्यानंतर डॉक्टर उपचारांना सुरूवात करतात. रूग्णाला जास्तीत जास्त पाणी पाजण्याचा प्रयत्न होतो. इतर द्रव पदार्थ दिले जातात. यामुळे रक्तातलं आम्ल विरघळायला सुरूवात होते आणि मूत्रपिंडातलं मायोग्लोबिन बाहेर पडू लागतं. यामुळे शरीराला भरपूर प्रमाणात द्रव पदार्थ मिळतात तसंच प्रत्येक टिश्यूला ऑक्सिजनचा पुरवठा होतो. वैद्यकीय उपचार सुरू होण्याआधी प्रथमोपचारांनी रुग्णाला दिलासा देता येतो. रुग्णाचं डोकं, पोट आणि छातीवरचा अतिरिक्त दबाव काढून टाकावा लागतो. अपघात झाल्यानंतर क्रश सिंड्रोमचा धोका बराच वाढतो. त्यामुळे एखादा अवयव निकामी झाला असेल तर तो निकामी करण्यासाठी शस्त्रक्रिया करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नसतो. इंजेक्शनच्या माध्यमातून द्रव पदार्थ नसांमध्ये सोडावे लागतात. नुकसान झालेले टिश्यू शस्त्रक्रिया करून लगेच काढून टाकावे लागतात.




# राखीव उत्तर नागपूर मतदारसंघात रंगणार बिग फाईट!

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २९ :

अनेक चळवळीचे केंद्र, बौद्ध समाजाची अत्याधिक लोकसंख्याा याबरोबरच झोपडपट्टी बहुल असलेल्या उत्तर नागपूर मतदारसंघात यावेळीही बिग फाईट रंगण्याचे संकेत आहेत.

काँग्रेसने त्यांचे विद्यमान आमदार डॉ. नितीन राऊत यांना पुन्हा मैदानात उतरवल्यानंतर भाजपाने अखेर डॉ. मिलींद माने यांच्यावर विश्वास दाखवला. त्यामुळे राऊत विरूद्ध माने अशी काट्याची लढत होऊ शकते. दुसरीकडे, भाजपामधील अनेक इच्छुकांना डावलल्याने बंडखोरीचीही शक्यता वर्तविली जात आहे.

उपराजधानी नागपुरातील उत्तर नागपूर मतदारसंघ हा झोपडपट्ट्यांसाठी अधिक प्रसिद्ध आहे. या मतदारसंघातून काँग्रेसने डॉ. नितीन राऊत यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे. तर भाजपकडून डॉ. मिलींद माने यांची उमेदवारी जाहीर झाली.

भाजपकडून संदीप जाधव, डॉ. मिलिंद माने आणि अविनाश धमगाये, ॲड. धर्मपाल मेश्राम हे इच्छूक होते. या निवडणुकीत काँग्रेसला संयुक्त रिपाइं, वंचित





आणि बसपच्या उमेवाराकडून मत विभाजनाचा मोठा फटका बसण्याची चिन्ह आहेत.

उत्तर नागपूर हा आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला आहे. या मतदारसंघावर काँग्रेस, भाजप आणि ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉकनेही सत्ता मिळवली आहे. १९७२ मध्ये नागपूर उत्तर विधानसभा मतदारसंघातून १८५८ मतांनी फॉरवर्ड ब्लॉकचे दौलतराव हुसन गणवीर हे विजयी झाले होते. त्यांनी काँग्रेसचे गणपत भगत यांना पराभूत केले होते. १९७८ सालच्या विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या (खोब्रागडे) गटाने विजय मिळवला होता. परंतु १९९० नंतर रिपाइं (खो) ची ताकद येथे कमी होत गेली.

१९७२ पासून येथे झोपडपट्टयांचे प्रश्न अजूनही कायम आहेत. सध्या काँग्रेसचे उमेदवार डॉ. नितीन राऊत हे या मतदारसंघातून विद्यमान आमदार आहेत. १९९५ साली भाजपचे भोला बढेल या मतदारसंघातून विजयी झाले होते तर १९९९ साली काँग्रेसचे नितीन राऊत यांनी विजय मिळवला. २००४ आणि २००९ मध्ये देखील तेच विजयी झाले. मात्र २०१४ मध्ये डॉ. मिलिंद माने यांनी राऊत यांचा पराभव केला. परत २०१९ मध्ये नितीन राऊत विजयी झाले आणि आता पुन्हा ते निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

या मतदारसंघात बौद्ध समाजाची संख्या सर्वाधिक असून, मुस्लीम मतदारांची संख्या १४ टक्के आहे. येथे पुरुष मतदारांची संख्या १,७४,३४२, महिला मतदारांची संख्या १,६३,७६९ असे एकूण मतदार ३,३८,१२० आहेत. यावेळी मतांचे विभाजन आणि बंडखोरी अटळ मानली जाते.

**२०१९ चा निकाल**

| | |
|---|---|
| डॉ. नितीन राऊत | |
| काँग्रेस | 86,821 मते |
| डॉ. मिलिंद माने | |
| भाजपा | 66,127 मते |
| सुरेश साखरे | |
| बसपा | 23,333 मते |
| किर्ती डोंगरे | |
| एमआईएम | 9,318 मते |

**२०१४ चा निकाल**

| | |
|---|---|
| डॉ. मिलिंद माने | |
| भाजपा | 68,905 मते |
| किशोर उत्तमराव गजभिये | |
| बसपा | 55,187 मते |
| डॉ. नितीन राऊत | |
| काँग्रेस | 50,042 मते |

**२००९ चा निकाल**

| | |
|---|---|
| डॉ. नितीन राऊत | |
| काँग्रेस | 57,929 मते |
| तांबे राजेश | |
| भाजपा | 40,067 मते |
| डॉ. मिलिंद माने | |
| अपक्ष | 23,662 मते |
| धर्मकुमार देव पाटील | |
| बसपा | 13,447 मते |

## डॉ. रमेशकुमार गजबे यांची वंचितला सोडचिठ्ठी

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २९ :



वंचित बहुजन आघाडीमध्ये पूर्व विदर्भ संयोजन प्रमुख पदाची जबाबदारी सांभाळणारे माजी राज्यमंत्री डॉ. रमेशकुमार गजबे यांनी संयोजन प्रमुख पदासह वंचितच्या प्राथमिक सदस्यपदाचा राजीनामा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्याकडे सुपूर्द केला. त्यामुळे वंचितला पूर्व विदर्भात खिंडार पडले असून गजबे हे भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

चिमूर विधानसभा क्षेत्रात माना समाजाचे नेतृत्व म्हणून डॉ. रमेशकुमार गजबे यांनी राजकारणात वेगळा ठसा उमटविला आहे. बहुजन समाज पार्टीकडून त्यांनी लोकसभा निवडणूक लढविली होती. युती शासनाच्या १९९५ ते १९९९ या कार्यकाळात काही महिने त्यांनी राज्यमंत्री पदाची जबाबदारी सांभाळली होती. मागील विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीकडून ते उमेदवार होते.

दरम्यान, वंचित बहुजन आघाडीला अपेक्षित असलेली उद्दिष्टे व पक्ष विस्तारात यशस्वी होवू शकले नसल्याची जाणीव ठेवत यंदाच्या निवडणुकीत पक्षाला अपयश येवू नये, यासाठी पूर्व विदर्भ संयोजन प्रमुख व सदस्य पदाचा राजीनामा देत असल्याचे त्यांनी राजीनामा पत्रात म्हटले आहे.

दरम्यान, त्यांचा भाजपात प्रवेश होत असल्याने चिमूर विधानसभा क्षेत्रात डॉ. रमेशकुमार गजबे यांच्यामुळे भाजपाची ताकद वाढणार आहे. चिमूर विधानसभेतील राजकारणाला वेगळी कलाटणी मिळण्याची शक्यता आहे.

## सरकार बदलणार - नाना



■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २९ :

महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि साकोली विधानसभा मतदारसंघातील पक्षाचे उमेदवार नाना पटोले यांनी प्रचंड शक्तीप्रदर्शनासह साकोली विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. बैलगाडीवरून उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय गाठून त्यांनी नामांकन भरले.

तत्पूर्वी, आयोजित सभेत पटोले यांनी राज्यातील महायुती सरकारवर तोफ डागली. महाराष्ट्रात सरकार बदलणार आहे, हे निश्चित असून महाराष्ट्रात बहुमताने महाविकास आघाडीचे सरकार स्थापन होईल, असा दावा पटोले यांनी केला.

नाना पटोले यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधत लाडक्या बहिणींनी त्यांना भाऊ म्हणून ओळखले आहे. लाडक्या बहिणींना दीड हजार रुपये दिले असून गेल्या दोन-तीन महिन्यांत महागाई वाढली असल्याचे त्यांनी सांगितले.

यासोबतच महिला सुरक्षेबाबत बोलताना पटोले यांनी सरकारवर निशाणा साधत लहान मुलींवर अत्याचार होत असल्याचे सांगितले. आता महाराष्ट्रात महिला आणि मुली सुरक्षित नाहीत आणि प्रिय भगिनींना आता हे समजले आहे. त्यामुळे भगिनी महाविकास आघाडीसोबत आहेत. याप्रसंगी सभापती मदन रामटेके तसेच काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## रात्री १० नंतर फटाके फोडण्यास बंदी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :

दिवाळीच्या सणामध्ये मुंबईतील वाढते प्रदूषण हा चिंतेचा विषय बनला आहे. येथील हवेची गुणवत्ता अत्यंत खराब झाली आहे. अशा परिस्थितीत मुंबई महानगरपालिकेने दिवाळीत फटाके फोडण्यासाठी काही नियम निश्चित केले आहेत. त्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्यात आली आहेत.

मुंबईतील वायू प्रदूषणाचा सामना करण्यासाठी प्रत्येकाने बीएमसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बीएमसीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मुंबईकर रात्री १० नंतर फटाके फोडू शकत नाहीत. याशिवाय फटाके कमी वाजवण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## महायुती, मविआला बंडखोरांचे टेन्शन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :

महाविकास आघाडी आणि महायुतीसमोर बंडखोरी करणाऱ्या नेत्यांचे चांगलंच टेन्शन आहे. महाविकास आघाडी असो किंवा महायुती यांच्याकडून जागा वाटप जाहीर झाल्यानंतर काही ठिकाणी तिकीट न मिळालेल्या इच्छुक उमेदवारांनी बंडखोरी करत शेवटच्या दिवशी उमेदवारी दाखल केली.

महायुती आणि महाविकास आघाडी एकमेकांसमोर जरी लढत असेल तरी इच्छुक मात्र अधिक होते. त्यामुळे विधानसभा निवडणुका अत्यंत रंगतदार झाल्या आहेत. दोन्हीकडून इच्छुक उमेदवारांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे.

आज २९ ऑक्टोबर विधानसभा उमेदवारी दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. ४ नोव्हेंबर उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. या दरम्यान सर्वात मोठा सण दिवाळी येणार आहे. असे असले तरी सर्वच पक्षांचे नेते मात्र बंडोबांना थंडोबा करण्यात व्यस्त असणार आहेत.

यंदाच्या दिवाळीमध्ये महायुती व महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांकडे एकच महत्त्वाचे काम टार्गेट म्हणून केले जाणार आहे ते म्हणजे बंडखोरांना थंड करून उमेदवारी मागे घेण्यास लावणे. महायुती मधून काही नेत्यांवरती बंडखोरांची नाराजगी दूर करत चर्चा करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. आघाडीमधील सर्वच पक्षातील प्रमुख नेत्यांकडे त्यांच्या नाराजांना समजावण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळेच या नेत्यांची दिवाळी कुटुंबीयांसोबत नसून तर बंडखोरांच्या घरी जाऊन नाराजी दूर करण्यातच जाणार आहे.

**भाजप नेते गोपाळ शेट्टी यांची बंडखोरी**

बोरिवली विधानसभा मतदार संघातून भाजप नेते गोपाळ शेट्टी हे नाराज असून त्यांनीही आज अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. या मतदारसंघातून संजय उपाध्याय यांना भाजपने उमेदवारी दिली आहे. तर आता शेट्टी यांनी बंडखोरी करत उमेदवारी अर्ज दाखल केला.

**भाजप प्रवक्ते अतुल शहा यांची बंडखोरी**

भाजपचे माजी आमदार अतुल शहा यांनी बंडखोरी केली आहे. शायना एनसी यांना मुंबादेवीतून शिवसेनेचे तिकीट मिळाल्यानंतर आता अतुल शहा अपक्ष म्हणून निवडणूक लढवणार आहेत. अतुल शहा आज उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. नाराजी व्यक्त करत त्यांनी पक्षाने आपल्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला आहे. महायुतीत मुंबादेवीची जागा शिवसेनेच्या कोट्यात गेली असून शिंदे गटाने येथून शायना एनसी यांना उमेदवारी दिली आहे. अशा परिस्थितीत अतुल शहा यांनी बंडखोरी केली आहे. अतुल शहा हे भाजपचे प्रवक्ते आहेत.

**ठाकरेंच्या पदाधिकाऱ्यांची बंडखोरी**

अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघात उद्धव ठाकरे गटात बंडखोरी दिसून आली. माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी जिल्हाप्रमुख व इतर पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल केला. या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने अभिषेक कळमकर यांना उमेदवारी दिली आहे.

याशिवाय, राज्याच्या अनेक मतदारसंघात बंडोबांनी विद्रोह केला असून, कुणी ऐनवेळी पक्षांतर केले तर काहींनी अपक्ष उमेदवार म्हणन नामांकन सादर केल्याचे दिसून आले.

## अखेर नवाब मलिक राष्ट्रवादीचे उमेदवार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते नवाब मलिक यांनी शिवाजीनगर मानखुर्द विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या नंतर माध्यमांशी त्यांनी संवाद साधला.

मला पक्षाकडून एबी फॉर्म मिळाला तर पक्षाकडून आणि नाही मिळाला तर अपक्ष म्हणून आपण निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी जाहीर केले होते. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांना अखेरच्या क्षणी एबी फॉर्म मिळाला असून आता पक्षाचे अधिकृत उमेदवारी म्हणून ते निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

या मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने देखील उमेदवार देण्यात आला आहे. मात्र माज्या विरोधक कोण उमेदवार आहेत, कोण नाही? कोण कोणासोबत आहे? कोणता नेता आहे? हे मला माहित नाही. त्याची चिंता करण्याची आवश्यकता नाही. मी या मतदारसंघातून निवडणूक लढणार असून माझा विजय निश्चित असल्याचा दावा देखील नवाब मलिक यांनी केला आहे.



## शक्तीप्रदर्शनासह अनेकांचे उमेदवारी अर्ज दाखल

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मंगळवार हा अखेरचा दिवस होता. आज राज्यभरात महायुती, महाविकास आघाडी, वंचित, बसपा, मनसे आणि अन्य पक्षातील उमेदवारांसह शेकडो अपक्ष उमेदवारांनीही नामांकन भरले.



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात आज उमेदवारी अर्ज दाखल केला. ते संगमनेर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. थोरात गेली अनेक वर्ष संगमनेर मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत.



भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. त्या आधी त्यांनी मोठे शक्तीप्रदर्शन केले. या वेळी उपमुख्यमंत्री फडणवीस यांचीही उपस्थिती होती.

डोंबीवली मतदारसंघातून बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी त्यांनी मोठे शक्तीप्रदर्शन केले.

आमदार रवी राणा यांनी महायुतीचे उमेदवार म्हणून बडनेरा येथून नामांकन भरले.

## शरद पवारांनी बदलला मोहोळमध्ये उमेदवार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :

विधानसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आज शेवटचा दिवस होता. काही ठिकाणी मोठ्या घडामोडी घडत असून उमेदवार बदलले जात आहेत. यामध्ये काँग्रेसने कोल्हापूरमध्ये उमेदवार बदलला आहे, तर दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसने (शरद पवार) मोहोळ मतदारसंघात उमेदवार बदलला आहे.

शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून सिद्धी रमेश कदम यांना देण्यात आलेली उमेदवारी रद्द करण्यात आली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी अचानक सिद्धी कदम यांची उमेदवारी रद्द करत त्यांच्या ऐवजी मोहोळमधून राजू खरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आलं आहे.

दरम्यान, मोहोळ तालुक्यातील काही महाविकास आघाडीच्या नेत्यांनी शरद पवार यांची भेट घेऊन सिद्धी कदम यांच्या उमेदवारीबाबत नाराजी व्यक्त केल्याचं बोललं जात आहे. त्यानंतर मोहोळमध्ये उमेदवार बदलण्यात आल्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगण्यात येते.

## माजी मुख्यमंत्र्यांचा नातू कारंजातून मैदानात



■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २९ :

महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्त्वपूर्ण नाईक घराण्यातील ययाती मनोहरराव नाईक विधानसभा निवडणुकीसाठी कारंजा मतदारसंघाच्या मैदानात उतरले आहेत. ययाती नाईक यांनी समनक जनता पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत निवडणूक अर्ज सादर केला.

सर्वाधिक काळ राज्याचे मुख्यमंत्रिपदी राहिलेले वसंतराव नाईक यांचे चूलत नातू तथा त्याच परिवारातील दुसरे मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांचे पुतणे यवतमाळ जि.प.चे माजी उपाध्यक्ष ययाती मनोहरराव नाईक यांनी समनक जनता पक्षाच्यावतीने कारंजा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी आपली उमेदवारी दाखल केली. ययाती नाईक यांचे लहान भाऊ आमदार इंद्रनील नाईक हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून पुसद मतदारसंघातून निवडणूक लढवित आहेत. ययाती नाईक यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे उमेदवारी मागितली होती. मात्र, त्यांना पूसदमधून उमेदवारी मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी कारंजा मतदारसंघातून अर्ज दाखल केला.

## शिंदे गटाच्या शायनावर भाजपची आगपाखड

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :



मुंबादेवी विधानसभा मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुतीने शायना एनसी यांना उमेदवारी दिली आहे. त्यावर भाजपचे स्थानिक पदाधिकारी अतुल शाह यांनी आक्षेप घेतला आहे. निवडणूक म्हणजे संगीत खुर्ची आहे का? असा खडा सवाल त्यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे.

अतुल शाह हे मुंबादेवी येथील भाजपचे माजी नगरसेवक आहेत. त्यांनी उमेदवारी मिळण्यापूर्वी भाजपतून सत्ताधारी शिवसेनेत प्रवेश करणाऱ्या शायना एनसी यांच्यावर टीका केली आहे.

अतुल शाह म्हणाले, एखाद्या व्यक्तीने मतदारसंघात ५ वर्षे काम केल्यानंतर दुसऱ्याच कुणाला तरी तिकीट दिले जाते. हा काय संगीत खुचीर्चा खेळ आहे का? कुणालाही मतदारसंघावर थोपणे योग्य आहे का? मुंबादेवी मतदारसंघात भाजपचे अस्तित्व नव्हते, तेव्हा मी याठिकाणी कामाला सुरूवात केली. नगरसवेक म्हणून निवडून आलो. मी तन - मन - धन अर्पण करून २४ तास पक्षासाठी काम केले. त्यानंतरही मला उमेदवारी नाकारली गेली. येथे नेतृत्वाची चूक झाली असून त्यांनी चूक सुधारावी, असेही ते म्हणाले.

महासागर
२०२४
दिवाळी विशेषांक

■ राजकारण : डॉ. भालचंद्र कांगो, भागा वरखडे, भाष्कर खंडागळे यांचे विश्लेषण
■ आरोग्य : आरोग्यापुढचे धोके आणि वाढते अनारोग्य
डॉ. सतिश सोनवणे, डॉ. अभिजीत वैद्य, डॉ. संपत केदारे, डॉ. कुंदन गायकवाड, प्रा. शिला गाडे, डॉ. राकेश शेट्टी यांची अत्यंत उद्बोधक माहिती.

पैसा नेमका किती हवा? पैशाचे महत्व विशद करणारा परिसंवाद

■ पर्यावरण : निसर्ग सूड उगवतो काय?
डॉ. मधुकर पाचुलकर, पर्यावरण तज्ज्ञ, वैजयंती कुळकर्णी, पर्यावरण अभ्यासक, डॉ. किरण कुळकर्णी, पर्यावरण तज्ज्ञ यांची अभ्यासपूर्ण माहिती.

■ ग्राहक : ग्राहकांना सावधान करणारा श्रीराम झंवर यांचा अभ्यासपूर्ण लेख

: मधल्या पिढीच्या समस्या : मेघा ईनामदार, स्वाती पेशवे

: मराठी गझलेतील नवी वळणे : गझलकार भुषण कटककर

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शंभरी : वासुदेव कुळकर्णी यांचा वाचनीय लेख

: मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि रोजगाराचे संकट : वरिष्ठ पत्रकार मिलींद किर्ती यांचे विश्लेषण

४ वाचनीय कथा

■ भरगच्च आणि दर्जेदार साहित्याचा नजराणा ■

:मुल्य: रू.१२५/-

वितरकांनी आपली मागणी आजच नोंदवावी, जेणेकरून तेवढ्या प्रती पाठविता येतील.

पुरण शुंकर ८८८८६४७७५३

नागपूर

# महासागर वृत्तसागर

■ बुधवार, दि. ३० ऑक्टोबर २०२४ ■

## नामांकन भरण्यापासून अनिस अहमद वंचित?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :



काँग्रेसचे माजी मंत्री तथा वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिस अहमद हे आज उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी नामांकन सादर करण्यापासून वंचित झाल्याची माहिती आहे. निर्धारीत वेळेपेक्षा विलंबाने पोहचल्याने त्यांना उमेदवारी अर्ज सादर करता आला नसल्याचे समजते.

अनिस अहमद यांनी यापूर्वी राज्यात मंत्रीपद भुषविले आहे. यावेळी त्यांनी मध्य नागपूरमधून उमेदवारीची मागणी केली होती. तथापि, त्यांना पक्षाने उमेदवारी नाकारली. परिणामी, कमालीचे नाराज झालेले अनिस अहमद यांनी दोन दिवसांपूर्वी वंचित बहुजन आघाडीची वाट धरली . वंचितकडून त्यांना अधिकृत उमेदवारी सुद्धा देण्यात आली . आज मंगळवारी ते नामांकन भरणार होते.

दरम्यान, रॅलीसह जिल्हाधिकारी कार्यालयात पोहचले . परंतु, त्यांना २ मिनीटे उशिर झाल्याने अर्ज घेण्यात आला नाही . याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत घासाघिस आणि प्रक्रिया सुरू होती . त्यामुळे नंतर अर्ज स्वीकारला की नाही? याबाबत अधिकृत माहिती मिळाली नाही.

## ठाकरे, राऊत, शेळके, पांडव, पेठेसह अनेकांचे शक्तीप्रदर्शन

# उमेदवारी अर्ज दाखल

### संविधान चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत भव्य रॅली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी दाखल करण्याचा मंगळवार शेवटचा दिवस होता. शेवटच्या दिवशी नागपूर शहरातील सर्व विधानसभा जागांसाठी महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी अर्ज दाखल केले. उमेदवारीपूर्वी सर्वच उमेदवारांनी जोरदार शक्तीप्रदर्शनही केले.

नागपुरात विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी महाविकास आघाडीत उत्साह दिसून आला. महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी त्यांच्या समर्थकांसह शक्तिप्रदर्शन करीत नामांकन दाखल केले.



संविधान चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत निघालेल्या या रॅलीत कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. काँग्रेसकडून नितीन राऊत यांनी उत्तर नागपुरातून, विकास ठाकरे यांनी पश्चिम नागपुरातून, बंटी शेळके यांनी मध्य नागपुरातून, गिरीश पांडव यांनी दक्षिण नागपुरातून, तर शरद पवार गटाकडून पूर्व नागपुरातून दुनेश्वर पेठे यांनी उमेदवारी दाखल केली आहे.

उमेदवारी अर्ज भरण्यापूर्वी सर्व उमेदवार संविधान चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. या मेळाव्यात काँग्रेससह उद्धव ठाकरे शिवसेनेचे आणि राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे अनेक नेते व कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजू पारवे यांचा पद्धतशिर गेम?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :



उमरेड विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राजू पारवे यांचा महायुतीने पद्धतशिरपणे गेम केल्याची चर्चा रंगली आहे . भाजपाने आज मंगळवारी सकाळी आणखी दोन उमेदवारांची घोषणा केली . त्यात मीरा भाईंदर विधानसभा मतदारसंघातून माजी आमदार नरेंद्र मेहता यांना उमेदवारी दिली असून, उमरेड राखीव मतदारसंघातून सुधीर पारवे यांना संधी दिली आहे.

२०१९ च्या निवडणुकीत सुधीर पारवे भाजपाचे उमेदवार होते. त्यावेळी काँग्रेस उमेदवार राजू पारवे यांनी त्यांचा पराभव केला होता. पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस पक्षाच्या विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा देऊन राजू पारवे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केला होता. राजू पारवे यांनी शिवसेनेच्या तिकिटावर यंदाची लोकसभा निवडणूक रामटेक मतदारसंघातून लढली. मात्र, त्यांना पराभवाचे तोंड पहावे लागले.

राजू पारवे शिंदे गटात गेल्याने उमरेडमधून त्यांना विधानसभेची उमेदवारी दिली जाईल, असे मानले जात होते. खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तसे संकेतही दिले होते . परंतु, महायुतीच्या जागा वाटपात उमरेड मतदारसंघ भाजपाला सोडण्यात आला आणि सुधीर पारवे यांची वर्णी लागली. परिणामी, राजू पारवे स्पर्धेतच नाहीत . त्यांना लोकसभेचे आमिष कुणी दाखविले? काँग्रेस सोडण्यामागचे कारण काय? हे प्रश्न अद्यापही अनुत्तरीत आहेत. मात्र, राजू पारवेंचा गेम केला गेल्याची चर्चा मतदारसंघात आहे.

## शहरातील सर्व सहाही जागा जिंकू



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मंगळवारी भाजपच्या उमेदवारांच्या नामांकनात सहभागी झाले. नामांकनादरम्यान फडणवीस यांनी नागपूर शहरातील सहाही जागांवर विजयाचा दावा केला.

काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल करताना फडणवीस म्हणाले की, गेल्या वेळी काही मते आणि खोट्या विधानामुळे आम्ही दोन जागांवर मागे पडलो होतो, मात्र यावेळी आम्ही पूर्ण ताकदीने लढणार असून, काँग्रेसचा सफाया करू. यासोबतच निवडणुकीत पूर्ण ताकदीनिशी प्रचार करण्याचे आवाहनही त्यांनी महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना केले.

## लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

लातूरच्या एका तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून शहरातील एका तरुणीचे लैंगिक शोषण केले आणि नंतर लग्नास नकार दिला. बेलतरोडी पोलिसांनी लखन महादेव मुसळे (२३) रा. लातूर विरूद्ध गुन्हा नोंदवून अटक केली.

पीडित तरुणी एका पॅथॉलॉजी लॅबमध्ये काम करते. दोन महिन्यांपूर्वी पीडितेने लखनच्या मोबाईलवर संपर्क करून त्याला उत्पादनाची माहिती दिली. त्यानंतर लखनने पीडितेशी चॅटिंग करून मैत्री केली. मैत्रीचे प्रेमात रुपांतर झाले. लखनने तिच्यासमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला. पीडितेनेही लग्नासाठी होकार दिला. लखनने पीडितेला सांगितले की, तो नोकरीसाठी नागपूरला येत आहे. तो पीडितेच्या घरीच थांबला.

या दरम्यान त्याला मिहानच्या कंपनीत सुरक्षा रक्षकाची नोकरी मिळाली. लवकरच लग्नाचे आश्वासन देऊन लखनने पीडितेशी लैंगिक संबंध प्रस्थापित केले. अनेक दिवसांपासून तो तिचे शोषण करीत होता. पीडितेने त्याच्यावर लग्नासाठी दबाव टाकला असता स्पष्ट नकार दिला. पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून लखनला अटक केली.

## राजाराम पांडे यांचा भाजपात प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. २९ :

तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार) गटाचे नागपुर जिल्हा (ग्रामीण) चे उपाध्यक्ष राजाराम पांडे यांनी आमदार समीर मेघे यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश केला . भाजपा पदाधिकारी अंबादास उके यांच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात त्यांनी कमळ हाती घेतले.

पांडे यांनी शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पार्टीच्या उपाध्यक्ष पदाचा व प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याचे प्रसिध्दी पत्रक काढून जाहीर केले होते. राजाराम पांडे यांच्यासह भाजपात प्रवेश घेणाऱ्यांमध्ये चंकी पांडे, ब्रजपाल सिंग, संजीव यादव,परेश पाल, विवेक तिवारी,विक्की तिवारी,मुन्ना राजभर,राम सपकाळ,अनुराग तिवारी, रामकिशोर अहिरवार, रवी पाटीदार, प्रियंका पाटीदार, शेखर बोदलखंडे, रुपेश( बंटी) भिसेन, गणेश नवघरे, दलजीत सिंह सिब्बल, करण टेकाम, विश्वास गेडाम, नितीन गेडाम, मंगेश टेकाम शेषवंता टेकाम आदींचा समावेश आहे. या वेळी अंबादास उके, सुरेश काळबांडे, विनोद ठाकरे, कैलाश गिती, चेतनलाल पांडे, अनिल शर्मा, जिवन शुक्ला, चंद्रशेखर राऊत, दादाराव मसराम उपस्थित होते.

## सायबर गुन्हेगारांच्या टोळीकडे तब्बल १६५८ बँक खाती

### ५ कोटीपेक्षा अधिकची रक्कम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

राजस्थानच्या अलवर गावातील बहुतांश युवक सायबर गुन्हेगारीत सहभागी आहेत. येथील सायबर गुन्हेगारांनी देशातच नव्हे तर विदेशातील लोकांचीही फसवणूक केली आहे. प्रत्येक युवक वेगवेगळ्या सायबर गुन्ह्यात पटाईत आहे.

बनावट फेसबुक आयडी, फेसबुक प्रोफाईल, सीमकार्ड आणि बँक खाते पुरविणारे पथक अशी वेगवेगळी कामे त्या युवकांना वाटून दिले आहेत. एक बनावट फेसबुक आयडी तयार करुन दिल्यानंतर सायबर गुन्हेगारांची मुख्य टोळी युवकांना दोन हजार रुपये देत होती.

त्या फेसबुक आयडीवरुन सायबर गुन्हेगार देशातच नव्हे तर विदेशातीलही नागरिकांची फसवणूक करीत होते. अशा आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगारांच्या टोळीचा उलगडा नागपूर पोलिसांनी केला. बनावट फेसबुक खात्याच्या प्रकरणाचा तपास करीत असताना नागपूर पोलिसांना आंतरराष्ट्रीय सायबर गुन्हेगारांची टोळी गवसली.

या टोळीतील आरोपींनी देशभरात शेकडो लोकांना फसविले. त्यांच्या विरोधात देशभरात २२० तक्रारी असून त्यांची १६५८ बँक खाते सक्रिय आहेत. फसवणूक करणाऱ्या सायबर गुन्हेगारांच्या आंतरराष्ट्रीय टोळीला नागपूर पोलिसांनी अटक केली. टोळीच्या विरुद्ध देशभरात २२० तक्रारी आहेत.

विशेष म्हणजे यातील बहुतांश बँक खाते भाड्यावर घेतल्याचेही तपासात समोर आले. पोलिसांनी टोळीचा प्रमुख सलीम खान (२४, रा. अलवर) याला अटक करुन नागपुरात आणले आहे, अशी माहिती अशी माहिती पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

सलीम खान या सायबर गुन्हेगाराच्या टोळीविरूध्द केरळ, गुजरात, दिल्ली, महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश, तामिलनाडू या राज्यात फसवणूक केली आहे. यासह अन्य राज्यातही राज्यात तक्रारी आहेत. महाराष्ट्रात १६ तक्रारी असून नागपूर शहरात दोन तक्रारी आहेत.

## २ वर्षांपासून बेपत्ता महिलेला शोधून काढले

### कोलकाताच्या रुग्णालयात गवसली
### एमआयडीसी पोलिसांची कामगिरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

गत दोन वर्षांपासून बेपत्ता असलेल्या मनोरुग्ण महिलेला शोधून काढण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी तिला कोलकाता येथून ताब्यात घेत कुटुंबीयांच्या स्वाधिन केले. प्रमिला हरीराम टाके (64) रा. बागानी लेआऊट, जयताळा असे त्या महिलेचे नाव आहे.

प्रमिला ही मानसिक आजारी आहे. औषध घेण्यासाठी जात असल्याचे सांगून ती घरून निघाली होती. बराच वेळ होऊनही ती घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शोध घेवून नंतर एमआयडीसी पोलिसात ती बेपत्ता असल्याची तक्रार नोंदविली. मिसिंग पथकाच्या एएसआय उषा कोंडलवार यांनी तपास सुरू केला. प्रसार माध्यम आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून नागपूर आणि महाराष्ट्रातच नाहीतर आसपासच्या राज्यांमध्येही प्रमिलाचे फोटो पाठविण्यात आले.

दोन वर्षांच्या प्रयत्नानंतर प्रमिला कोलकाताच्या खडकपूर येथे राजीवनगर रुग्णालयात असल्याची माहिती मिळाली. सामाजिक संस्थेच्या मदतीने प्रमिलाला नागपुरात आणून कुटुंबीयांच्या स्वाधिन करण्यात आले.

## दिवाळीच्या खरेदीसाठी बाजारात तोबा गर्दी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

दिवाळीला सुरूवात झाली असून, दिवाळीच्या खरेदीसाठी नागपूरच्या बाजारात ग्राहकांच्या उड्या पडत आहेत. शहरातील महाल, ईतवारी, गांजा खेत, गोळीबार चौक, सीताबर्डी, सदर आणि अन्य भागातील बाजारपेठा ग्राहकांनी फुलून गेल्याचे दिसून येते.

दिवाळीनिमित्त कपडे खरेदीवर अधिक भर असतो . कापडाच्या दुकानात गर्दी आवरण्यासाठी ग्राहकांना टोकन दिले जाते आणि नंबर आला की बोलावले जाते. या गर्दीने रस्तेही ओसंडून वाहत असून, ठिकठिकाणी वाहतूक कोंडी होवू लागली आहे.



■ नागपूर : दिवाळीचा पहिला दिवस म्हणून धनत्रयोदशीच्या दिवशी सोने खरेदीला उधाण येते. नागपूर शहरासह संपूर्ण विदर्भात स्वर्णलंकारासाठी प्रसिद्ध असलेल्या रोकडे ज्वेलर्सच्या दुकानात महिलांची तोबा गर्दी उसळली होती. रोकडे ज्वेलर्सच्यावतिने घोषित केलेल्या योजनेनुसार लक्ष्मीनगर येथील दुकानात सोडतही काढण्यात आली.

## थेट हात रिक्षा चालवत दाखल केला ओपुल तामगाडगे यांनी उमेदवारी अर्ज

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक), आक्रमण युवक संघटना नागपूर जिल्हा, मूलनिवासी विद्यार्थी संघ, ऑल इंडिया पँथर सेना अशा अनेक संघटनेचे दक्षिण पश्चिम मतदारसंघाचे उमेदवार ओपुल तामगाडगे यांनी थेट हातरिक्षा चालवून नामांकन अर्ज दाखल केला. तत्पूर्वी, संविधान चौकात डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

उमेदवारी अर्ज सादर केल्यानंतर ओपुल तामगाडगे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. दीक्षाभूमीचे अस्तित्व नष्ट करणाऱ्यांचा बदला घेण्याकरिता, मनुवाद्यांना धडा शिकवण्याकरिता, लाखो बेरोजगारांना रस्त्यावर आणून ठेवणाऱ्या सरकारला धडा शिकवण्याकरिता आपण निवडणुकीच्या रणांगणात उतरल्याचे ते म्हणाले.

हजारो विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप रद्द करून तोच पैसा लाडक्या बहिणीच्या खात्यात जमा करणे, गरजेच्या खाण्यापिण्याच्या वस्तू महाग करणे हे सत्ताधाऱ्यांचे षडयंत्र असून, दक्षिण पश्चिम मतदारसंघाकडे सर्रास दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे ते म्हणाले . ओपुल तामगाडगे यांच्या नामांकन रॅलीमध्ये बेरोजगार, विद्यार्थी हातरिक्षा चालक, कामगार, मोलमजुरी करणाऱ्या महिला आणि सामान्य गृहिणी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



## बावनकुळेंच्या ताफ्यातील वाहने एकमेकांवर आदळली

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

उमेदवारी अर्ज भरण्याचा मंगळवार हा शेवटचा दिवस असल्याने अर्ज भरण्यासाठी सर्वांची एकच धावपळ उडाली. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बानकुळे यांनाही मंगळवारी अर्ज भरायचा होता. प्रदेशाध्यक्ष असल्याने त्यांच्या प्रचार ताफ्यात मोठ्या संख्येने वाहने होती. त्यापैकी पाच वाहने परस्परांवर धडकली.

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा २९ ऑक्टोबर हा शेवटचा दिवस आहे. दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची वेळ आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना त्यांच्या कामठी विधानसभा मतदारसंघात पक्षाने उमेदवारी दिली आहे. अर्ज भरणार असल्याने सकाळपासूनच पक्षाकडून त्याची तयारी सुरू करण्यात आली होती. प्रदेशाध्यक्ष अर्ज भरणार म्हणून मोठे शक्तीप्रदर्शन करण्यासाठी कार्यकर्ते कामाला लागले. गावोगावातून कार्यकर्त्यांना बोलवण्यात आले.

खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अर्ज भरण्यासाठी नागपुरात आले. बावनकुळे यांचा उमेदवारी अर्ज भरण्याकरिता जाणाऱ्या कार्यकर्त्यांच्या ताफ्यातील चार ते पाच गाड्या एकमेकांवर आदळल्या. सावनेर मार्गावरील अंबिका बारजवळ ही घटना घडली. त्यात भाजपचे तीन कार्यकर्ते जखमी झाले.. जखमींना सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांच्या मदतीने जिवतोडे हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले आहे.

बावनकुळे कामठी मतदारसंघातून चौथ्यांदा निवडणूक रिंगणात उतरले आहेत. २०१९ मध्ये त्यांना पक्षाने उमेदवारी नाकारली होती. मात्र त्यानंतर त्यांना विधान परिषदेवर पाठवण्यात आले. त्यांच्या नेतृत्वाखाली २०२४ ची विधानसभा निवडणूक लढवली जात आहे. त्यामुळे यावेळी कामठी मतदारसंघातील बावनकुळे यांची लढत अत्यंत प्रतिष्ठेची ठरणार आहे. या मतदारसंघात काँग्रेसने सुरेश भोयर यांना रिंगणात उतरवले आहे. भाजपसाठी हा मतदारसंघ प्रतिष्ठेचा मानला जात आहे.

# वाडीतील वृत्तपत्र विक्रेत्यांनी केला दिवाळी स्नेह मिलन समारोह

## वृत्तपत्र विक्रेते म्हणजे प्रसार माध्यमांच्या महत्वाचे घटक मानसिंग ठाकूर यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, २९ :
अनुकूल,प्रतिकूल परिस्थितीतही सातत्याने ग्राहकांच्या घरापर्यंत वर्तमानपत्र पोहोचवणारे वृत्तपत्र विक्रेते हे प्रिंट मीडियासाठी महत्वाचे घटक असल्याचे मनोगत वाडी वृत्तपत्र विक्रेता संघाच्या वतीने आयोजित वृत्तपत्र विक्रेते दिवाळी स्नेहसंमेलन कार्यक्रमात व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानसिंग ठाकूर, गजानन तलमले, प्रमुख मार्गदर्शक प्रा. सुभाष खाकसे, वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष दीपक राऊत उपस्थित होते.

वृत्तपत्र विक्रेते संघटनेचे दीपक राऊत यांनी प्रास्ताविकेत सांगितले की गेल्या काही वर्षांपासून दिवाळी स्नेहसंमेलन आयोजित करून वाडी, डिफेन्स, आठवी मैल, लावा आदी भागातील वृत्तपत्र वितरण करणाऱ्या कामगारांच्या संघटनेचा उपक्रमाचा उद्देश मांडून मिठाई आणि भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात येतो.



या नंतर उपस्थित अतिथी मानसिंग ठाकूर, गजानन तलमले, विजय वानखेडे, प्रा.सुभाष खाकसे, दिलीप तराळेकर, नरेशकुमार चव्हाण, ऋषीकुमार वाघ, विकास बनसोड, प्रवीण सिंह, नेमचंद राऊत, आचल लोखंडे,विलास माडेकर यांच्या हस्ते वृत्तपत्र विक्रेत्यांना टी-शर्टपुष्पगुच्छ व मिठाईचा डबा देऊन सत्कार करण्यात आला.

पत्रकार अरुण कराळे यांनी या उपक्रमाचे स्वागत करून प्रत्यक्ष वृत्त पत्र विक्रेते दिवाळी निमित्त पत्रकारांचे जो सन्मान करतात त्याचे कौतुक या वेळी करणे गरजेचे आहे असे सांगितले. मदन रामटेके यांनी मधुर आवाजात गायलेल्या गीताने सर्वांना मंत्र मुग्ध केले. सर्व वृत्तपत्र विक्रेत्यांनी दर सोमवारी वृत्तपत्रांचे वाटप करताना एक सारखा पोशाख परिधान करण्याचाही निर्णय घेण्यात आला.. कार्यक्रमाचे संचालन सचिव नागेश बोरकर यांनी तर आभार विजय वानखडे व राजेश मुन यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी , गणेश राऊत, नितीन सव्वाशेरे, राजेश मुन, सचिन हरगोडे, यांनी सहकार्य केले. वृत्तपत्राचे एजेन्ट संजय चवने, नितीन देशमुख, वाडी वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे पदाधिकारी नितीन सव्वाशेरे, जागेश्वर खोब्रागडे, पप्पू टेम्भरें यांनी विशेष परिश्रम घेतले. ज्ञानवंत कोकाटे, पंकज पानतावणे, नीलेश चौधरी, अमित काळे, लक्ष्मण सहानी, संदीप वानखेडे, सचिन हरगोडे, संजय भगत, नितीन आगरकर, गौरव टेंभरे, विनोद टेंभेकर, विक्की नरनवरे, पियुष चिंचुलकर, मदन रामटेके,किशोर करवाडे, रितेश ठाकरे, विलास काळे, अमित रामटेके, व मोठ्या संख्येने वृत्तपत्र विक्रेते उपस्थित होते.



(नागपुर रेल्वे स्टेशन गेट नं .८ वर संत्रा विक्रेता अर्जून सोनकर यांची दुकाण ठरत आहे ग्राहकांना आकर्षनाचे केंद्र )

# साई इंटरनॅशनल स्कूलमध्ये पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यात आली



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, २९ :
साई इंटरनॅशनल स्कूल, रामटेक यांनी शाळेच्या आवारात अतिशय अनोख्या पद्धतीने पर्यावरणपूरक दिवाळी साजरी केली. नर्सरी ते इयत्ता ८वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्सवाचा आनंद लुटला. विद्यार्थ्यांनी भाषणे केली आणि पर्यावरणपूरक दिवाळी उत्सवाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी निबंध लेखन, पत्रलेखन, पोस्टर मेकिंग, रांगोळी, दिया सजावट आणि इतर अनेक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. साई इंटरनॅशनल स्कूलच्या बालवाडी शाखेने त्यांच्या वर्ग शिक्षकांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली स्पॉट ग्रीटिंग्ज मेकिंग उपक्रमाचा आनंद लुटला.

प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांनी दिवाळी सन संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रकाश टाकला आणि पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्यामागील उद्दिष्टे आणि उद्दिष्टेही स्पष्ट केली. शाश्वत भविष्यासाठी हरित दिवाळी या संदर्भात त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना आवाहन केले. उत्सवानंतर कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावा. शाळेचे संचालक डॉ.व्ही.बी.नागपुरे यांनी शाळेच्या प्रयत्नांचे कौतुक केले आणि पर्यावरणपूरक दिवाळी उत्सवानिमित्त सर्व सहभागींना शुभेच्छा दिल्या.

# काटोल विधानसभा क्षेत्रात निवडणूक निरीक्षक यांचा पाहणी दौरा

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, २९ :
राज्यात विधान सभेच्या होणाऱ्या निवडणूक करिता मतदान केंद्राला निवडणूक निरीक्षक नवीन चंद्रा सिंग (आयएएस ) यांनी विधानसभा क्षेत्रातील विविध मतदान केंद्र व चेक पोस्ट येथे मंगळवारला भेटी देऊन बारकाईने पाहणी केली. निवडणूक निरीक्षक नवीन सिंग यांना काटोल व सावनेर विधानसभा क्षेत्राची निरीक्षक म्हणून प्रमुख जबाबदारी दिली आहे.

विधान सभेच्या दि २० नोव्हेंबरला निवडणुका होत आहे. त्याकरिता नियुक्ती काही निवडणूक केंद्राला निरीक्षकांनी भेटी देऊन निवडणूक केंद्र तेथील पिण्याचे पाणी, स्वच्छता गृह,दिव्यांग मतदार करिता रॅम्प, सुरक्षितता, संबंधित सुविधा असल्याची खात्री माहिती जाणून घेतली. उणीव असल्यास सूचना



निरीक्षक नविनकुमार सिंग यांनी केली निवडणूक केंद्राची पाहणी विविध केंद्राला दिल्या मार्गदर्शक सूचना

दिल्या. त्यांनी नागपूर मार्गांवरील पेटकल डोंगरी, कोंढाळी, चंदनपार्डी, पारडसिंगा, नरखेड तालुक्यातील पिलापूर व गोंदणी आंतर राज्य चेक पोस्ट आदी ठिकाणी सुद्धा भेट दिली.याप्रसंगी नरखेड तहसीलदार उमेश खोडके, नायब तहसीलदार भागवत पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी तथा जावेद इकबाल, मंडळ अधिकारी सुरज सादतकर, तलाठी दुणेदार, राजेंद्र सरोदे, पोलीस कर्मचारी उपस्थित होते. निवडणूक सुरक्षित, नियोजित व्हावे याकरिता त्यांचा दौरा असल्याची माहिती महसूल अधिकारी यांनी दिली. कोंढाळीला केंद्रीय निवडणूक निरीक्षण अधिकारी यांची भेट आज मंगळवार दी २९ नोव्हेंबरला लाखोटीया भुतडा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कोंढाळी येथील शाळेत विधानसभा निवडणुका ४८ निमित्य निरीक्षक पथकासह दिल्ली येथून जिल्ह्यात सकाळी पोहचले.त्यांनी शाळेला भेट दिली. शाळा परिसर बाबत प्रशंशा केली. काही सूचना दिल्या. यावेळी शिक्षण विभाग, महसूल विभाग,साहाय्यक निवडणूक अधिकारी, सुरक्षा अधिकारी उपस्थित होते

# वडधामन्यातील विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा भाजपात पक्ष प्रवेश





■ महासागर प्रतिनिधी
वाडी, २९ :
वडधामना येथील विविध पक्षाचे शेकडो महिलापुरुष कार्यकर्त्यांनी आमदार समीर मेघे यांचे नेतृत्वात भाजपात पक्ष प्रवेश केला.यावेळी हिंगना विधानसभा संयोजक नरेश चरडे, वाडी मंडळ अध्यक्ष आनंदबाबु कदम,वडधामनाचे सरपंच धिरज आंबटकर, जिल्हा मंत्री राजुताई भोले, भाजपा ओबीसी महीला आघाडीच्या अध्यक्ष ज्योती भोरकर उपस्थीत होते. योगीराज आंदे, संजीव शुक्ला,श्रीकीशन चचाने,आदित्य शर्मा,ऊमेश रायपुरकर, चंद्रशेखर देवूळकर चैतन्यश्वर सोनबावने, नरेंद्र ठाकरे, चंद्रकांत मसराम,ललन शर्मा,मुकेश शर्मा, संतोष शर्मा, हरीदास ऊकरे,अमीत सिंग,यादव टेकाडे, मनोज पाल, प्रमोद गजभिए, ईश्वर सोनुले, संजय पाटिल, शामकिसन चचाने, राजकुमार आदे, सरीता सोनवाने, निकीता ठाकरे,पूष्पा आदे, सुनीता शर्मा, छाया चचाने,पुजा सोनुले, खिलेश्वरी शाहु,रितु तिवारी,पुनम शर्मा, मिना साहुसकर आदींनी पक्षप्रवेश घेतला.

# पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा : मनपा आयुक्त

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, २९ :
नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी नागपूर शहरातील जनतेला दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या असून पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचे आवाहन केले आहे.
दिवाळीत फटाके वाजविताना ते जास्त आवाज करणारे आणि जास्त धुर सोडणारे नसावेत याची काळजी घ्यावी. दिवाळी हा आनंदाचा सण आहे. सण साजरा करताना पर्यावरणाचा विचार अवश्य करा. खूप जास्त आवाज आणि जास्त धूर यामुळे पर्यावरणाचा संतुलन बिघडतो शिवाय



प्राण्यांना इजा पोहोचते. आपल्या परिसरात, जवळपास स्वच्छता रहावी, ही देखील आपली जबाबदारी आहे. त्यामुळे दिवाळीचा सण साजरा करताना आपल्या जबाबदारीचा विसर पडू देऊ नका पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा, असे देखील आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले आहे.

# रेल्वेतील वाढते अपघात आणि रेल्वे रूळांशी छेडछाड करण्याच्या घटनांबाबत जनजागृती करणे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, २९ :
रेल्वे संरक्षण दल, नागपूर विभागामार्फत रेल्वे रूळांशी छेडछाड आणि रेल्वेतील वाढत्या अपघातांना (अनपेक्षित घटना) आळा घालण्यासाठी मोहीम राबवली जात आहे. रेल्वे रूळ ओलांडताना मोबाइल फोनचा निष्काळजीपणे वापर करणे, रेल्वे कर्मचाऱ्यांकडून रेल्वे रूळांवर काम करताना मोबाइल फोनचा अनावश्यक वापर आणि हेडफोन/इअरबड इत्यादी वापरून गाणी ऐकणे यामुळे अनपेक्षित घटनांमध्ये वाढ होत आहे. याला



प्रतिबंध करण्यासाठी रेल्वे संरक्षण दल, नागपूर विभागातर्फे अनधिकृतपणे रुळ ओलांडणाऱ्यांविरुद्ध जनजागृती मोहीम राबवली जात असून, रेल्वे कायद्यांतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. सन २०२४ मध्ये आतापर्यंत अनधिकृतपणे रेल्वे रूळ ओलांडणाऱ्या एकूण १२३६ जणांना पकडण्यात आले असून त्यांच्यावर रेल्वे कायद्यान्वये कायदेशीर कारवाई करण्यात आली.

# गोआधारित अर्थव्यवस्था पुनर्स्थापित करा डॉ. प्रशांत बोकारे

**भारतीय उत्कर्ष मंडळात धेनूपूजन संपन्न**

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, २९ :
भारतीय उत्कर्ष मंडळ गोसंवर्धन समितीच्या वतीने खापरी येथे सवत्स धेनु पूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, सतीश गोयल, नितीन पाटील, अतुल वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती.
डॉ. बोकारे यांनी आपणच व्यवसायाच्या माध्यमातून देशाची अर्थव्यवस्था दृढ केली पाहिजे, असे सांगितले. अतुल वैद्य यांनी आयुर्वेदाची आधुनिक संशोधनांशी सांगड घालून नवीन प्रयोग करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. प्रकृती स्वास्थ्यासाठी मानवाने गोपालन व गोसेवा करणे महत्त्वाचे आहे, असे नितीन पाटील यांनी वक्तव्य केले. याप्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वैदिक मंत्रोच्चारात गोपूजन व आरती करण्यात आली. या कार्यक्रमाच्या



निमित्ताने नव्याने तयार करण्यात आलेल्या आयुर्वेदिक च्यवनप्राशचे वितरण व विमोचन करण्यात आले. प्रास्ताविक गोरक्षण गोसंवर्धन समितीचे सदस्य अभय गोखले यांनी केले तर भारतीय उत्कर्ष मंडळाचे सहसचिव मकरंद कानिटकर यांनी आभार मानले. भारतीय उत्कर्ष मंडळाचे अध्यक्ष जयंत मुलमुले, सचिव अतुल मोहरीर, गोरक्षण गोसंवर्धन समितीचे अध्यक्ष राजदिप सगदेव, मंडळाचे सर्व सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीमंतिनी कुळकर्णी यांनी केले. कार्यक्रमाला नागपूर शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता



**सुमन भैय्याजी जथे**

यांच दुःखद निधन बय वर्ष ७४ गुरुकृपा, रहीवासी /२०, झाडे ले आऊट, भरत नगर, नागपूर येथील श्रीमती सुमन भैय्याजी जथे यांचे अल्प आजाराने मंगळवार दिनांक २९ ऑक्टोबर रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले - श्रीकांत भैय्याजी जथे, विजय भैय्याजी जथे, केशव भैय्याजी जथे आणि त्यांचा मोठा आप्त परिवार आहे. अंत्यसंस्कार अंबाझरी दहन घाटावर पार पडला.

# पिपळा बेसा कॅम्पस राज्यात प्रथम क्रमांकावर आहे

**स्वच्छतेबरोबरच आकर्षक दिवे लावले जात आहेत, प्रशासकाच्या आदेशाने विकासावर भर**

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा -पिपळा, २९ :
हिंगणा -पिपळा, नगर पंचायत बेसा-पिपळा परिसर राज्यात प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी विकास कामे जोरात सुरू आहेत. जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार रस्ते, गटारी, नाले तसेच परिसर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी सर्व विभागप्रमुख पूर्ण ताकदीने कामाला लागले आहेत. सर्व प्रमुख रस्त्यांवर सजावटीचे हायमास्ट दिवे बसविण्याचे काम सुरू झाले आहे. आता हे संकुल रात्रीच्या वेळी चमकणाऱ्या दिव्यांनी स्वच्छ आणि सुंदर दिसू लागले आहे. हे पाहता, नवीन नागपूर कॅम्पसच्या सौंदर्याची ओळख लोकांना देत असल्याचे दिसते. परिसरात सुरू असलेली विकासकामे पाहून नागरिकांतून आनंद व्यक्त होत आहे. वर्ष झाले आहे. ग्रामपंचायत असताना या संकुलातील नागरिकांना अनेक समस्यांनी ग्रासले होते. भरत नंदनवार यांनी नगर पंचायतीचा दर्जा मिळताच प्रशासकाचा पदभार स्वीकारताच त्यांनी न.प.बेसा पिपळा परिसराला राज्यात प्रथम क्रमांकाचे स्थान दिले.

पण आणायला सांगितले होते. आता कॅम्पसमध्ये विविध प्रकारच्या विकासकामांमुळे लोकांच्या समस्या सुटत आहेत. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत आहे. प्रशासक भरत नंदनवार यांनी या प्रतिनिधीशी बैठकीत चर्चा करताना सांगितले की, या संकुलातील अनेक रस्ते अतिक्रमणांनी वेढले आहेत.



काही लोकांनी रस्त्यांवर कायमस्वरूपी अतिक्रमण केले आहे. पण वाहतूक अवघड होती. अतिक्रमणामुळे रस्ते अपघातांना निमंत्रण देणारे बनले आहेत. त्या रस्त्यांवरील टक्के अतिक्रमणे हटवून रस्ते रुंदीकरणाचे काम सुरू आहे. उर्वरित १० टक्के अतिक्रमण पूर्णपणे हटविण्यात येणार आहे. मोठे रस्ते बांधल्यानंतर अतिक्रमणमुक्त परिसर दिसेल आणि अपघाताची भीती राहणार नाही, असे सांगण्यात आले.

**प्रथम क्रमांक प्राप्त करण्याचे ध्येय: प्रशासक**

नगर पंचायतीचे काम हाती घेताच त्या संकुलाला राज्यात प्रथम क्रमांकावर नेण्याचे उद्दिष्ट साध्य केले आहे. विकासकामांसोबतच हा परिसर स्वच्छ व सुंदर बनविण्याबरोबरच लोकांच्या समस्या सोडविण्याच्या माझ्या कर्तव्यातून मी जवळपास मुक्त झालो आहे. तसेच विकासकामे होत असल्याने आ. असो, कॅम्पस स्वच्छ आणि सुंदर दिसत आहे. अशाच विकासकामांना जनतेने पाठबळ दिले तर हे संकुल राज्यात पहिल्या क्रमांकावर दिसेल. बेसा नगर पंचायत संकुल विकासाच्या वाटेवर बेसा कॅम्पसमधील रस्ते, गटर लाइन, पाण्याच्या लाईन, पावसाच्या पाण्याचे नाले, सुका व ओला कचरा वेगळा करण्याची प्रक्रिया, एकच प्लास्टिक वापरणाऱ्या व विक्री करणाऱ्यांवर कारवाई करून प्लास्टिकचा वापर थांबवणे, प्रत्येक रस्त्यावर रोपे लावणेमेरी वसुंधरा अभियानाबाबत जनजागृती करणे, अशा अनेक विषयांवर जनजागृती करून विकासकामांवर भर दिला जात आहे. या संकुलातील सर्व डब्यांमधून दररोज २० वाहने कचरा उचलण्याचे काम करत आहेत. याशिवाय स्वच्छता कर्मचारी दैनंदिन साफसफाईच्या कामात गुंतलेले आहेत. विशेष म्हणजे दिवाळीचा सण लक्षात घेऊन साफसफाईचे काम जोरात सुरू आहे. आता अनेक परिसर स्वच्छ आणि सुंदर दिसत आहेत आणि संपूर्ण परिसर सुशोभित पथदिव्यांनी उजळून निघाला आहे. दिवाळीच्या सणासोबतच सांब यांचे आरोग्य उत्तम आरोग्यदायी राहो व सर्वांना दिवाळीच्या आनंदात जावो हीच सदिच्छा घेऊन विकासकामांना सुरुवात करण्यात येत आहे. विकासकामात सर्वांनी सहकार्य केल्यास आपल्या बेसा परिसराला राज्यात प्रथम क्रमांक मिळेल, असे प्रशासक नंदनवार यांनी सांगितले

**सर्व विभाग प्रमुखांचे सहकार्य मिळत आहे**

प्रशासक नंदनवार यांच्या आदेशावरून प्रशासकीय अधिकारी अजय वाघमारे, मोहित राजनकर, आरोग्य अभियंता पूजा जाधव, अभि. नितीन इमले, नागरी रचना अभियंता अभिजीत हांडे, विजय सुरवसे, तुषार सेलवट, लेखा विभागाचे विष्णू गायकवाडमनोज कावळे, आस्थापना विभागाचे भूषण दिवटे, विद्युत अभियंता डॉ. विवेक धकाते यांच्यासह सर्व विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे त्यांना पूर्ण सहकार्य मिळत असून ते पूर्ण जबाबदारीने कामात गुंतले आहेत.

## पश्चिम नागपूर अपक्ष महिला उमेदवार अलकाताई प्रशांत पोपटकर नामांकन दाखल



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर , २९ :
पश्चिम नागपूर ५६ मधून अपक्ष महिला उमेदवार म्हणून अलकाताई प्रशांत पोपटकर नामांकन भरणारअसल्याची माहिती पत्रकारांना दिली. जनशक्ती वर्षेस धनशक्ती महिला शक्ती निवडणुकीच्या रिंगणात यापूर्वी अलकाताई ह्या आम आदमी पार्टी नागपूर सचिव म्हणून कार्यरत होत्या तसेच पार्टीने त्यांना निवडणूक लढविण्याचे परमिशन दिली आहे असे सुद्धा पत्रकारांना सांगितले.

# ‘नोटा’ ला मतदान करबनं..

## महायुती, आघाडीकडून भ्रमनिरास
## हलबा समाज कमालीचा आक्रमक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समाविष्ट करण्याचा विषय रेंगाळत असल्याने आधीच संतप्त असलेला हलबा कोष्टी समाज आता मध्य नागपूरमधून समाजातील कुणालाच उमेदवारी मिळाली नसल्याने अधिकच आक्रमक झाला आहे. या निवडणुकीत महायुती किंवा आघाडीमधील कोणत्याच उमेदवाराला मतदान न करता ‘नोटा’ हे बटन दाखवून रोष व्यक्त करण्याचा निर्णय समाजाच्या सभेत घेण्यात आला आहे.

राज्यातील २८ ते ३० विधानसभा मतदारसंघात हलबा समाजाचे मत आहे. परंतु, भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षाकडून हलबा समाजाचा एकही उमेदवार दिला गेला नसल्याने हलबा समाज संतापला आहे. समाजाच्या विविध संघटना व सर्व राजकीय पक्षाची तातडीची बैठक झाली. त्यात या दोन्ही पक्षाला मतदान न करता स्वतंत्र उमेदवार उभा करून मतदानाचा निर्णय झाला.

महाराष्ट्र विधानसभेत आमदार विकास कुंभारे हे हलबा समाजचे एकमेव प्रतिनिधी आहेत. येत्या निवडणूकीतही समाजाच्या अस्तित्वाचा प्रश्न असल्याने किमान एक हलबा आमदार कायम असावा, अशी समाजाची भूमिका आहे.




यामुळेच समाजाला उमेदवारी न देणाऱ्यांच्या विरोधात मतदान करू, असा इशारा हलबा समाजाकडून दिला गेला.

यंदा मध्य नागपुरात काँग्रेसकडून सुरवातीला अॅड. नंदा पराते आणि रमेश पुणेकर यांच्या नावाची चर्चा होती. तर भाजप कडूनही विद्यमान आमदार विकास कुंभारे, दीपक देवघरे, दीपराज पार्डीकर यांच्या नावाची चर्चा होती. परंतु काँग्रेसने दोन दिवसापूर्वी बंटी शेळके यांना तर भाजपने प्रविण दटके यांना उमेदवारी जाहिर केली. त्यानंतर हलबा समाजातील सगळ्याच पक्षातील पदाधिकाऱ्यांसह विविध हलबांशी संबंधित संघटना संतापल्या. त्यानंतर तातडीने जुनी मंगळवारी येथ बैठक झाली.

ऐनवेळी सर्वजण उपस्थित राहणे शक्य नसल्याने विदर्भातील सर्वच प्रमुख नेत्यांना व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जोडण्यात आले होते. त्यात हलबाबहुल मतदारसंघ असल्याने मध्य नागपूर लढायचे आणि जिंकूनही आणायचे असा ठाम निर्णय घेण्यात आला.

इतर मतदारसंघात हलबा समाजाचा उमेदवारी नाकारणाऱ्या एकाही पक्षाला मतदान न करता नोटाचे बटन दाबून मतदानाचा निर्णय घेतला गेला. त्यामुळे येत्या निवडणूकीत हलबा समाजाचे मतदान प्रत्यक्षात कुणाला होणार? याकडे आता सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

### दीपक देवघरे किंवा रमेश पुणेकर उमेदवार

बैठकीत दीपक देवघरे आणि रमेश पुणेकर यांचे नाव समोर आले. मंगळवार अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने दोघांनीही अर्ज दाखल करायचा. निर्णय प्रक्रियेत विदर्भातील नेत्यांना जोडून घेणे आवश्यक असल्याने २ तारखेपर्यंत एका नावावर शिक्कामोर्तब करायचे आणि दुसरा उमेदवार नामांकन परत घेईल, असा निर्णय घेण्यात आला.

दोन्ही उमेदवारांनीही त्यावर सहमती दर्शविली आहे. विदर्भातील अन्य जिल्ह्यांमध्ये हलबांची संख्या मोठी असली तरी निवडून येण्याएवढी संख्या नाही, यामुळे ‘नोटा’ मतदान करून पक्षांना विरोध दर्शविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# पाण्याने जळतात दिवे!



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

भारतात सण, उत्सव कोणताही असो, बाजारात चलती असते ती चायनामेड वस्तुंची. मग ते दिवाळीतले फटाके असोत, वा आणखी काही. यंदाच्या दिवाळीत मात्र पाण्याने जळणा?या या दिव्यांचीच अधिक चर्चा आहे.

दिवाळीच्या पूर्वी जशी घराची साफसफाई केली जाते, तसेच दिवाळीत घराची सजावट देखील केली जाते. यात विजेच्या माळा आणि दिवे या दोन प्रमुख गोष्टी आहेत. पारंपरिक पद्धतीने दिवाळी साजरी करायची तर मातीच्या दिव्यांशिवाय पर्याय नाही. मात्र, हल्ली पारंपरिक दिवाळीसोबतच सजावट देखील तितकीच महत्त्वाची झाली आहे. अशावेळी घरात एसीसारख्या वस्तु असल्यामुळे दिवे लावता येत नाहीत.

घरात दिवे तर लावायचेच आहेत आणि मग पर्याय काय, तर पाण्याने जळणारे दिवे. यावेळी दिव्यांचा हा नवा प्रकार बाजारात आला आहे. एक दिवा २० ते २५ रुपयांना मिळतो, ज्याला तेल लागत नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यात पाणी टाकले तरी ते लागतात.

यामध्ये एक सेन्सर वापरण्यात आला आहे जो पाण्याच्या संपर्कात येताच जळू लागतो. दिवाळीला सुरुवात झाली असताना बाजारात ग्राहकांची मोठी गर्दी होत आहे. या खरेदीत हे अनोखे दिवे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले आहेत. हा अप्रतिम दिवा जो कोणी पाहतो तो थक्क होतो.

या दिव्यासाठी तुम्हाला तेल किंवा माचिसची गरज नाही. त्यात पाणी टाकताच ते जळू लागते. हा इलेक्ट्रॉनिक दिवा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. यावर्षी हे दिवे प्रथमच दिसून येत आहेत, त्यामुळे फार कमी लोकांना याची माहिती आहे. पण पाहणा?या ग्राहकाला पहिल्यांदा विश्वास बसत नाही. जर तुम्ही स्वतः पाणी ओतले आणि दोन-तीन वेळा दिवा लावला तर तुमचा विश्वास बसेल.

एका दिव्याची किंमत २० ते ३० रुपयापर्यंत आहे. पाणी टाकताच विद्युत प्रवाह येतो आणि दिवा पेटतो. तो पूर्णपणे सुरक्षित आहे. पाण्याने जळणारा हा दिवा यावेळी सर्वांच्याच सजावटीत भर घालणार असल्याचे लोकांचे म्हणणे आहे. यामुळे मुले जळणार नाहीत किंवा आग लागणार नाहीत. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हा दिवा देखील सर्वोत्तम पर्याय आहे. एकदा पाणी टाकल्यानंतर दोन ते तीन तास तो जळतो, असे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. पारंपरिक मातीचे दिवे तर लावले जातातच, पण सजावटीसाठी या दिव्यांचा उपयोग नक्कीच होतो.

# पॉवर ग्रिड कॉर्पोरेशनचा दक्षता जागरुकता सप्ताह



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शनाखाली महारत्न कंपनी पॉवर ग्रीड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या नागपूर येथील प्रादेशिक मुख्यालयामार्फत राष्ट्राच्या समृद्धीसाठी अखंडतेची संस्कृती या थीमसह दक्षता जनजागृती सप्ताह साजरा केला जात आहे.

या मालिकेत दिनांक २८ ऑक्टोबर रोजी दक्षता जनजागृती सप्ताहाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी पॉवरग्रिड पश्चिम क्षेत्र-१ चे मुख्य महाव्यवस्थापक (प्रभारी) एस. सुब्रमण्यम यांनी होते. यावेळी, एम. श्रीनिवास राव, प्रधान उपमहाव्यवस्थापक, दक्षता विभाग, पॉवरग्रिड, पश्चिम क्षेत्र-१, यांनी दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यामागची भूमिका आणि महत्त्व विशद केले.

या कार्यक्रमात विभागीय मुख्यालय पी. परिमंडळ-१ चे सर्व अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. कार्यक्रमादरम्यान मुख्य महाव्यवस्थापक (प्रभारी) पं. सेक्टर-१ एस. सुब्रमण्यम यांनी सभागृहात उपस्थित सर्व लोकांना सचोटीची शपथ दिली. याप्रसंगी अनेक अधिकारी उपस्थित होते.

# २ ई-रिक्षा चोर गजाआड

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

शहराच्या वेगवेगळ्या भागातून ई-रिक्षा चोरी करणाऱ्या दोन आरोपींना गुन्हे शाखा युनिट 5 च्या पथकाने अटक केली आहे. मोहम्मद जसीम जिमल हुसेन (19) रा. यशोधरानगर चौक आणि मंथन विशाल भावे (19) रा. यादवनगर, भीम चौक, अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

गत 25 ऑक्टोबरच्या रात्री फियार्दी मुमताज अली इरशाद अली (50) रा. वांजरा यांनी त्यांची ई-रिक्षा घरापुढे उभी केली होती. मध्यरात्रीला अज्ञात आरोपीने त्यांची ई-रिक्षा चोरी केली.

त्यांच्या तक्रारीवरून यशोधरानगर पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. गुन्हे शाखा युनिट 5 चे पथकही घटनेचा समांतर तपास करीत होते. तांत्रिक तपास आणि खब?याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर जसीम आणि मंथन यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी मुमताजचा रिक्षा चोरी केल्याची कबुली दिली. सखोल चौकशीत आरोपींनी आणखी एक ई-रिक्षा चोरी केल्याची माहिती दिली. दोघांनाही अटक करून दोन्ही ई-रिक्षा जप्त करण्यात आले. दोन्ही आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीसाठी यशोधरानगर पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आले.







■ नागपूर : दिवाळीच्या काळात घरोघरी रोषणाई करण्याची पद्धत आहे. सोबतच आतिषबाजीही केली जाते. दिवाळीला सुरूवात झाली असून, नागपूर येथील बाजारपेठा फुलल्या आहेत. विद्युत दिव्यांच्या दुकानाबरोबरच फटाक्यांच्या दुकानातही प्रचंड गर्दी दिसून येत आहे.

## पश्चिम नागपुरात बंडखोरी?
# नरेश बर्डेंचे समर्थक संतप्त



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :

पश्चिम नागपुरातून भाजपमधील बंडखोरीचा आवाज सातत्याने वाढत आहे. आधी संदीप जोशी, नंतर दयाशंकर तिवारी आणि आता नागपूर शहर भाजप उपाध्यक्ष नरेश बर्डे यांच्या समर्थकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

नरेश बर्डे यांना पश्चिम नागपुरातून तिकीट न दिल्याने नरेश बर्डे समर्थक त्यांच्या घरासमोर जमले आणि त्यांनी नाराजी व्यक्त केली. सुधाकर कोहळे यांची कामे करू नका, असा जाहीर इशारा देत बर्डे यांच्या घरासमोर मोठ्या संख्येने कार्यकर्ते जमा झाले. या काळात कॅम्पसचे वातावरण गरम झाले.

पश्चिम नागपूर विधानसभेतून भाजपने सुधाकर कोहळे यांना उमेदवारी दिली आहे. यामुळे बर्डे समर्थक संतापले आहेत. पक्षासाठी एवढे काम करूनही त्यांच्या नेत्याला उमेदवारी दिली नाही. पक्षाने नरेश बर्डे यांना किंवा पश्चिमेतील कुणाला तरी उमेदवारी द्यावी, अशी मागणी होती. सुधाकर कोहले सारखे बाहेरचे पार्सल परत घ्यावे, अन्यथा कोहळेंच्या विजयासाठी एकही कार्यकर्ता काम करणार नाही, असा इशारा दिला आहे.

# धन्वंतरी जयंती सोहळा आणि पुरस्कार वितरण



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

धन्वंतरी जयंती उत्सव समिती च्यावतीने हॅटिल द्वारकामाई नागपूर येथे धन्वंतरी जयंती उत्सव व राष्ट्रीय आयुर्वेद दिन साजरा करण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. श्रीमंत राजे, डॉ. मुधोजी राजे भोसले तर अध्यक्षस्थानी शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, नागपूरचे डीन डॉ. सुभाष राऊत तसेच विशेष अतिथी म्हणून सिव्हिल सर्जन डॉ. निवृत्ती राठोड उपस्थित होते.

या कार्यक्रमात धन्वंतरी जीवन गौरव पुरस्कार वर्धा आणि नागपूर शहरातील सुप्रसिद्ध नेत्रतज्ञ डॉ. विनोद अडालखिया, लसिक आय सर्जरी सेंट्रल इंडियाचे संस्थापक व माजी गव्हर्नर डॉ. मधुकर खेरडे यांना प्रदान करण्यात आला. नागपूर शहरातील फिजिशियन आणि लॉयन्सचे सक्रिय सदस्य डॉ. धन्वंतरी कवच शासनाच्या आयुर्वेद महाविद्यालयाचे डीन डॉ. सुभाष राऊत यांना प्रदान करण्यात आला.

धन्वंतरी कला व सांस्कृतिक क्षेत्र पुरस्कार डॉ. शिवरतन शेटे (सोलापूर) धन्वंतरी वैद्यकीय व व्यवसाय क्षेत्र पुरस्कार डॉ. नामदेव किसनजी दोरखंडे, नागपूर, धन्वंतरी वैद्यकीय, संशोधन व संशोधन क्षेत्र पुरस्कार डॉ. विजय पोतदार (नांदेड) आणि धन्वंतरी पुरस्कार डॉ. जैस्वाल, डॉ. कविता खोंड, डॉ. रायभान डोंगरे, डॉ.संध्या वाघ, डॉ.सत्यम सुपारे, डॉ.वैशाली गणोरकर, डॉ. नकुल मरकाम, डॉ. सीमा देवेंद्र बहटकर, डॉ.आशिष थटेरे, डॉ.जया ढाणे, डॉ. अभिषेक त्रिवेदी आणि डॉ. प्रणिता बोरकर यांना प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक लॉयन्स क्लब नागपूर आयुर्वेदच्या अध्यक्षा डॉ. मृणालिनी थटेरे यांनी केले. संचालन डॉ. संजय थटेरे यांनी केले तर डॉ. संतोष धामेचा यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लायन्स क्लब नागपूर आयुर्वेद व जीएसी माजी विद्यार्थी संघटनेच्या सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले.

# पुणे-नागपूर प्रवास भाडे पाच हजारांच्या घरात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :

दिवाळीच्या काळात एसटी आणि रेल्वे फुल्ल असल्याचा फायदा खासगी बसचालक घेत आहेत. परिवहन विभागाच्या नियमाप्रमाणे एसटी तिकीट दराच्या तुलनेत ५० टक्के अधिक दर घेण्याची मुभा खासगी बसचालकांना दिली आहे.

प्रत्यक्षात एसटीच्या तुलनेत दुप्पट तर काहीवेळा तिप्पट दर आकाराला जात असल्याच्या प्रवाशांच्या तक्रारी आहे. परंतु याकडे आरटीओकडून दुर्लक्ष केले जात आहे.

दिवाळीच्या तोंडावर पुणे, हैद्राबाद, नाशिकसह इतरही भागातून नागपुरात येणा?या प्रवाश्यांची खासगी ट्रॅव्हल्सकडून सर्रास आर्थिक लूट केली जात आहे. दिवाळी संपल्यावर परतीच्या प्रवासात तर दर जवळपास तिप्पटच होतात. दरम्यान, आता दिवाळीपूर्वीच भाडे मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पुण्याहून नागपूर, अकोला येण्यासाठी खासगी बसचे दर दुप्पट झाले आहेत. गैर सिझन असलेल्या काळातील विमान प्रवासाचे भाडे बससाठी लागत असल्याचा अनुभव येत आहे.

सध्या नागपूर- पूणे दरम्यान ५ हजार रुपयांपर्यंतचे भाडे काही ट्रॅव्हल्स कंपन्यांकडून आकारले जात आहे. तर हैद्राबादसाठीही ३ हजार रुपयांहून जास्त रक्कम आकारली जात आहे. ही पोलखोल होऊ नये म्हणून ऑनलाईन बुकींगमध्ये प्रथम सीट नसल्याचे ट्रॅव्हल्सकडून कळवले जाते. त्यानंतर वेळेवर येणाऱ्यांकडून रोखीने पैसे घेऊन अवास्तव रक्कमही आकारली जात असल्याचे प्रवाशी सांगतात.



### परतीचा प्रवास आणखी महाग

दिवाळी संपल्यानंतर परतीचा प्रवास आणखी महाग होतो. कोणत्याही परिस्थितीत नोकरी निमित्ताने पुण्याला जावे लागते. त्या वेळी एसटी आणि रेल्वेचे आरक्षण फुल्ल असते. त्यामुळे पुणे गाठण्यासाठी प्रवाशांना खासगी बसवर अवलंबून राहावे लागते. अशा वेळी खासगी बसचालक दिवाळीत जो दर आकारतात, त्यात आणखी ५०० ते एक हजार रुपयांची प्रवास भाड्यात वाढ केली जाते, असे प्रवाश्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान पुण्याहून नागपूर, अकोलासह मार्गातील शहर, गावात सुटणाऱ्या खासगी बस चालकांकडून बुकिंग फुल्ल असल्याचे सांगून अधिकचे भाडे वसूल केले जात आहे. हा धक्कादायक प्रकार सर्वश्रूत असतानाही आरटीओकडून दुर्लक्ष होत असल्याचा प्रवाश्यांचा आरोप आहे.

दिवाळीमध्ये अतिरिक्त खासगी बस धावतात. अनेक बसचालक गाड्या दुसऱ्यांकडून भाडेतत्वावर घेतात. त्यामुळे अशा गाड्यांचे तिकीट दर अन्य बसच्या तुलनेत अधिक असते. पुण्यातून विदर्भात दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात प्रवासी प्रवास करतात.

अनेक खासगी बसचालक ३०० किलोमीटरहून अधिक दूरच्या प्रवासासाठी धावणाऱ्या बसच्या दरात मोठी वाढ करतात. तुलनेत साध्या बससाठी (सीटिंग) कमी दरवाढ केली जाते.

दिवाळीला सुरुवात झाली आहे. त्यामुळे विलंबाने प्रवासाचे नियोजन केल्याने पुण्याहून सुटणाऱ्या खासगी बस आत्ताच बुक झाल्या आहेत. रेल्वेचे तिकीट मिळत नसल्याने प्रवाश्यांना नाईलाजाने महागड्या तिकीटावर ट्रॅव्हल्समधून यावे लागत आहे.